IRBK-0100171

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय काव्य

दा क्र १७१

IRBK-0100171

IRBK-0100171

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणे.

[ स्थापना-आषाढ शु. १ शके १८३२ ]

(१) मंडळाचे हेतु :—

(१) संशोधनाचें काम वर्षानुवर्षे सारखें व्हावें ह्मणून तीन चार संशोधक या च कामीं नेमणूक करून त्यांचा योगक्षेम चालविणें.

(२) आपल्या महाराष्ट्रांत च अजून कित्येक ऐतिहासिक घराणीं अशीं आहेत कीं त्यांच्याकडील कागदपत्रांचा आपल्यास कांहीं च शोध नाहीं. तो शोध लावून ते कागदपत्र मिळविणें.

(३) मराठी भाषेच्या उत्पत्तीपासून तों शके १७४० पर्यंत मराठींत जें अनेकविध सारस्वत निर्माण झालें त्यापैकीं सहस्रांशाची फार तर आपल्यास माहिती झाली आहे. बाकीचें जें सारस्वत अज्ञातवासांत पडलें आहे तें प्रकाशांत आणणें.

(४) एतद्विषयक सर्व संदर्भग्रंथांचा संग्रह करणें.

(५) इतिहासाच्या साधनांचे खंड व काव्यग्रंथ प्रकाशित करणें.

(६) व्यक्तिशः सभासदांकडे जो संग्रह झाला आहे व यापुढें मंडळाच्या प्रयत्नानें जो होणार आहे तो अग्नीपासून सुरक्षित ठेवण्यासाठीं सरस्वतीमंदिर बांधणें.

(७) संशोधनात्मक निबंध व टांचणें त्रैमासिक, षण्मासिक अगर वार्षिक वृत्तरूपानें प्रकाशित करणें.

हीं व या च धोरणाचीं इतर कामें विस्तृत प्रमाणावर व्हावींत असा मंडळाचा हेतु आहे.

(२) मंडळाचे सभासद होण्याविषयीं नियम पुढीलप्रमाणें आहेत.

(१) मंडळास दरसाल ३०० किंवा अधिक रुपये देणारे "**आश्रयदाते**" होत.

(२) दरसाल १२५ अथवा अधिक रुपये देणारे "**हितकर्ते**" होत.

(३) दरसाल २५ अगर अधिक रुपये देणारे "**सभासद**" होत.

( वरील तिन्ही वर्गांच्या हातीं मंडळाची व्यवस्था राहील )

(४) दरसाल किमान १२ रुपये देणारे "**साधारण सभासद**" होत

(५) दरसाल किमान ६ रुपये देणारे "सहानुभाविक सभा..."

(६) दरसाल किमान ३ रुपये देणारे "चहाते" होत.

पहिल्या चार वर्गाच्या सभासदांना मंडळाकडून प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांची निराळी किंमत पडणार नाहीं. सहानुभविक सभासदांस ते ग्रन्थ निम्म्या किंमतीस मिळतील.

(३) मंडळाची विनंतिः—आपल्या इतिहासाची व वाङ्मयाची आस्था बाळगणाऱ्या सर्व विद्वानांस व धनिकांस, श्रीमंतांस व सरदारांस, इनामदारांस व जहागीरदारांस, संस्थानिकांस व महाराजांस आमची अशी नम्र पण प्रेमाग्रहाची विनंति आहे कीं, त्यांनीं वरील वर्गांपैकीं कोणत्या हि वर्गात आपलें नांव दाखल करून सरस्वतीच्या या पवित्र कार्यास स्वकर्तव्य म्हणून यथाशक्ति अवश्य मदत करावी.

भा. इ. सं. मंडळाचे कार्यालय, शनवार पेठ, पुणें-शहर. } खंडेराव चिंतामण मेहेंदळे चिटणीस.

# मंडळामार्फत प्रसिद्ध झालेले ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १ | अहवाल शके १८३२ चा किंमत ... ... ... | |
| २ | ,, ,, १८३३ चा ,, ... ... ... | रु. ५ |
| ३ | ,, ,, १८३४ चा ,, ... ... ... | रु. ५ |
| ४ | प्रथम-संमेलन-वृत्त .. ... ... ... | ०१२ |
| ५ | सुबंत-विचार (लेखक रा. वि. का. राजवाडे) .. (दामले यांचे व्याकरणावर टीकात्मक निबंध) | रु. २ |
| ६ | मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १२ वा. ... (चिंतो विठ्ठल रायरीकर यांच्या दप्तरांतील अत्यंत महत्त्वाचा पत्रव्यवहार या पुस्तकांत संग्रहित केला आहे. संशोधक रा. वि. का. राजवाडे) | १८८ |
| ७ | महाराष्ट्रीय-सारस्वत, ग्रन्थ प्रथम, श्रीमुकुन्दमुनिकृतं महाभाष्यम् किं. .. | ८८ |
| ८ | ,, ग्रन्थ दुसरा, ग्रन्थराज (श्रीदासोपंतकृत) | ८८ |
| ९ | ,, ,, तिसरा, स्फुट प्रकरणें ... | ०१६ |

टपाल खर्च निराळा.

१० शके १८३५ चें वार्षिक वृत्त छापत आहे.

चिटणीस भा. इ. सं. मंडळ, ४५६ शनवार पेठ, पुणें-शहर.

IRBK-0100171

IRBK-0100171

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
अ. क्र. ...४७१.. नों दि ...............
वि. ....काव्य.................
ग्रंथ ... ०१२८ 2

श्रीरामसमर्थ

# प्रस्तावना

## दासोपंतांचा थोडासा परिचय

**धन्य धन्य दासोपंत । जयाचे लक्षावधी ग्रन्थ ।**
**भक्तिज्ञानवैराग्ययुक्त । न भूतो न भविष्यति ॥**

श्रीसमर्थांच्या पूर्वी होऊन गेलेल्या दासोपंतांविषयीं सुमारें अकरा वर्षांमागें नांवापलिकडे महाराष्ट्रास कांहीं माहिती नव्हती. लक्षावधी ग्रन्थरचना करणाऱ्या या महा कवीची ओळख महाराष्ट्रास प्रथम इतिहाससंशोधक रा. रा. विश्वनाथपंत राजवाडे यांनीं करून दिली. ही केवढ्या आश्चर्याची गोष्ट आहे कीं, ज्याच्या इतकी कविता मराठींत च काय पण अन्य कोणत्या हि भाषेंत कोणी केली असेल कीं काय अशी शंका आहे, अशा प्रासादिक कवीविषयीं महाराष्ट्राच्या ठिकाणीं अकरा वर्षांपूर्वींपर्यंत इतकें औदासीन्य असावें ! आणि अजून तरी काय, या संतकवीचें चरित्र लिहिण्याची वेळ आली आहे, असें वाटत नाहीं. दासोपंतांच्या ग्रन्थाविषयीं केवळ कांहीं अटकळ व्हावी इतकी माहिती आपणांस झाली आहे, परंतु त्यांच्या चरित्राला उपयोगी पडतील अशा कागदपत्रांचा व इतर साधनांचा अजून व्हावा तसा मुळीं च शोध झाला नाहीं. तेव्हां दासोपंतांचें चरित्र, संकलित कां होईना, पण सांगावें असें मनांत आलें तरी तसें करण्यास मार्ग नाहीं.

पूर्वी " महाराष्ट्रकवि " मासिकांत दासोपंतांचें एक अपूर्ण ओवीबद्ध चरित्र आलेलें आहे, तें सुप्रसिद्ध श्रीधरस्वामी नाझरेकरकृत आहे, अशी कोणाची प्रथम कल्पना होती, पण त्या कल्पनेवर खुद्द मासिक पुस्तकाचे कर्ते रा. भावे यांचा हि भरंसा बसला नाहीं व मला जी माहिती मिळाली आहे त्यावरून त्या चरित्रांत सत्यापेक्षां कल्पनेचा च भाग जास्त आहे व तें चरित्र जुनें नसून अगदीं च अलिकडचें आहे असें ह्मणण्यास हरकत वाटत नाहीं. हें येथें नमूद करण्याचा माझा हेतु एवढा च आहे कीं आपणांस केवळ सत्याची चाड आहे, आपणांस इतिहास पाहिजे आहे, नुसती कल्पना नको आहे, आणि ह्मणून दासोपंतांच्या चरित्राचा शोध करण्याचा प्रयत्न, पुढें मागें कोणी करणार असेल तर, त्यानें त्या चरित्रामुळें फसून जाऊं नये. अंबाजोगाईस व इतरत्र दासोपंतांच्या चरित्राचीं साधनें अजून मिळण्यासारखीं आहेत.

तथापि आतांपर्यंत जीं थोडीशीं साधनें उपलब्ध आहेत त्यांच्या आधारानें दासोपंतांचें त्रोटक चरित्र सांगून आपण या प्रस्तावनेंत मुख्यतः त्यांच्या प्रस्तुत ग्रन्थाचा च थोडासा विचार करूं. दासोपंतांचा जन्म शके १४७३ च्या भाद्रपद वद्य ८ स झाला. वैराग्य उत्पन्न व्हावें असें त्यांच्यावर लहानपणीं च प्रसंग आल्यामुळें त्यांचें चित्त भक्तिरंगांत रंगून गेलें. भक्तिप्रेमांत व भगवद्गुणानुवर्णनांत त्यांचा सारा काळ जाई. त्यांची उपासना श्रीदत्तात्रयाची होय. त्यांच्या उपासनेंतील श्रीदत्तात्र-

याची मूर्ति अजून अंबाजोगाईस आहे व तिची च प्रतिमा या ग्रन्थाच्या आरंभीं दिली आहे. दासोपंतांची परंपरा अशीः—

दासोपंत
|
दत्ताजीपंत
|
दासोपंत
|
विश्वंभर
|
दासोबा
|
दत्ताजी
|
देवाजी
|
विश्वंभर
|
गुरुबोवा
|
अवधूत
|
अत्रिवरद
|
विश्वंभर

दासोपंत अंबाजोगाईस असत व तेथें त्यांच्या वंशजांचीं, एक धाकटें देवघर व दुसरें थोरलें देवघर, अशीं दोन घरें आहेत. अनेक ग्रन्थ व शिष्यपरंपरा मागें ठेऊन शके १५३७ च्या माघ वद्य ६ स दासोपंतांनीं आपला अवतार संपविला. त्यांची समाधी अंबाजोगाई येथें च आहे.

धाकट्या आणि थोरल्या देवघरांत मिळून दासोपंतांनीं आपल्या वंशजांसाठीं व राष्ट्रासाठीं जी संस्कृतप्राकृत ग्रन्थसंपत्ति ठेविली आहे तिची यादी येथें देतों.

गीतार्णव
गीतार्थबोध
अवधूतराज
ग्रंथराज
प्रबोधोदय पूर्वार्ध.
,, उत्तरार्ध
स्थूलगीता.
वाक्यवृत्ति ( गद्य )
पंचीकरण (पासोडीवर लिहिलेलें)
पदार्णव
दत्तात्रयमाहात्म्य
गीताभाष्य
सार्थगीता
अवधूतगीता.
अनुगीता.
दत्तात्रयसहस्रनामस्तोत्र.
,, दशनामस्तोत्र.
,, द्वादशनामस्तोत्र.
,, षोडशनामस्तोत्र.
,, शतनामस्तोत्र.
सिद्धदत्तात्रयस्तोत्र.
षड्गुरुयंत्र
षोडशदलयंत्र.
अत्रिपंचकप्रधानयंत्र

शिवस्तोत्र.
गुरुस्तोत्र.
षोडशस्तोत्र.
सीतज्वरनिवारणस्तोत्र.
भक्तिराजकवच
वज्रपंजरकवच.
सहस्रनामटीका.
दत्तात्रयनामावळी.
दश, द्वादश व शत नामावळी
मंगलमूर्तिपूजा.
वाचकीपूजा.
महापूजा.
मानसिकपूजा.
वेदोक्तपूजा.
वैदिकपूजा.
यंत्रपूजा.
नामामृतस्तोत्र.
गीतस्तोत्र.
प्रबंधस्तोत्र.
गीतप्रबंधस्तोत्र.
सिद्धमालामंत्रस्तोत्र.
उपकालस्तोत्र.
षोडशअवतारस्तोत्र.
षोडशअवतारप्रादुर्भावस्तोत्र

०मि ६२२



आगमनिगम. षोडशअवतारध्यानस्तोत्र.
वेदपादाख्यस्तोत्र. दशोपनिषद्भाष्य.

या संपत्तीपैकीं अति अल्प अंश प्रकाशांत आला आहे. " महाराष्ट्रसारस्वत " ह्मणून मागें एक मासिक पुस्तक निघालें होतें त्यांत फक्त दासोपंतांचीं १३९४ पदें मिळून पृष्ठें ३७६ छापलीं गेलीं आणि महाराष्ट्राच्या अनास्थेमुळें मासिक बंद पडलें. गीतार्णवांपैकीं अध्याय पहिला पृष्ठसंख्या १६४, अध्याय दुसरा पृष्ठसंख्या ३१६, अध्याय बारावा पृष्ठसंख्या ५८ व अध्याय तेरावा अपूर्ण, पृष्ठसंख्या १६६ इतका भाग "महाराष्ट्र कवीनें" प्रकाशित करून " कवि " विराम पावला. ह्मणजे दासोपंतांची कविता प्रकाशित करण्याचा जो थोडासा प्रयत्न झाला त्यायोगें १०८० पृष्ठें कविता छापून प्रसिद्ध झाली; व हल्लीं हि दोन्ही घरांत जी संपत्ति आहे तेवढी सर्व प्रसिद्ध करावयाची ह्मणजे आणखी निदान दहा पंधरा हजार पृष्ठें सहज लागतील. आपल्या पूर्वजांचा हा अपूर्व व अलौकिक ठेवा आपल्या हातीं केव्हां येईल याविषयीं महाराष्ट्रास कितपत तळमळ लागली आहे याची कल्पना आपणांस झाली च आहे.

दासोपंतांनीं च स्वत: आपल्या या प्रचंड कवितासमुद्राचें सार काढून तें "ग्रन्थराज" ह्या लहानशा ग्रन्थांत सांठविलें, तें आज अखिल महाराष्ट्रास सादर करण्याचा योग आला आहे.

माझी महाराष्ट्रीय वाचकांस अशी विनंति आहे कीं प्रत्येकानें एकवार हा लहानसा ९६ पृष्ठांचा ग्रन्थ मननपूर्वक वाचावा ह्मणजे दासोपंतांची एकंदर कविता वाचल्याचें श्रेय येणार

आहे. मात्र ग्रन्थ वाचण्यास सुरवात करण्यापूर्वी त्यापासून आपण आपला फायदा करून घेण्याचा संकल्प करून जो बोध आपणांस होईल तो आचरणांत उतरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, नाहीं पेक्षां दासोपंतांनीं दिलेलें दूषण आपणांस लागेल.

दिवा रात्रौ करितां श्रवण । सोडूं न शकती जे अवगुण ।
ते महानदीचे पाषाण । ऐसें जाण पां ॥ ८X६७

हा असला शब्द आपणावर येऊं नये ह्मणून

करणी करूं प्रवर्तावें । हें चि मुख्य ॥ ८X७३

साधु पुरुष आपआपल्या ग्रन्थांचें जें वर्णन करीत असतात, तें शब्दशः खरें असतें. त्यावर विश्वास ठेवून जो कोणी वागतो तो आपलें कल्याण करून घेतो.

श्रीसद्गुरूचे चरण । हृदईं बळकट धरून ।
कानडें ना मऱ्हाटें वचन । आइकावें तयाचें ॥ ८/१०६
जेणें होतो ब्रह्मसाक्षात्कारु । तो चि जाणावा बीजमंत्रु ।
तेणेवीण वाग्व्यापारु । संस्कृत जें ॥ १०७ ॥
तें भूस जाणावें निकण । कासया करावें कंडण ।
उपनतां चि तें वारेन । सर्व जाये ॥ १०८ ॥
ब्रह्मज्ञानाचा विचारु । तेथें शब्दाचा काइसा व्यापारु ।
यालागीं तो पामरु । पंडितु नव्हे ॥ १०९ ॥
ह्मणोनि हें प्राकृत । परंतु तत्वज्ञान घनामृत ।
जतन करावें अत्यंत । ग्रंथाचेनि आकारें ॥ ११० ॥
श्रीदिगंबरानुचरु ह्मणे । आतां पुरे पुरे बोलणें ।
ग्रंथें ग्रंथराजें येणें । सिद्धांतु भोगावा ॥ १११ ॥

## प्रस्तावना

असा हा ग्रन्थ आणखी कोणी वाचोत न वाचोत, परंतु श्रीसमर्थसांप्रदायिकांनीं तो अवश्य वाचावा अशी माझी इच्छा आहे, कारण हा ग्रन्थ श्रीसमर्थांनीं हि स्वतः वाचला होता. आपल्या पूर्वीं झालेले सर्व लोकमान्य ग्रन्थ श्रीसमर्थांनीं वाचले होते याविषयीं मला शंका नाहीं, तथापि या ग्रन्थापुरती तरी कोणाला हि शंका न वाटावी अशीं प्रमाणें, जो कोणी दासबोधाचा वाचक हा ग्रन्थ वाचील त्यास सहजच आढळणार आहेत. ग्रन्थराजांतील अशीं कांहीं प्रमाणें आपण येथें देऊं.

( १ ) रोकडा ब्रह्मसाक्षात्कारु । करूं जाणे तो सद्गुरु ।
मोक्षाचा नाहीं उधारु । जयाप्रती ॥ १-३३

( २ ) तया अवचट निधान ।
सांपडे निक्षिप्त अपार धन ॥ १-६३

( ३ ) तेणें चि आनंदें सगद्गदितु । कंठु जाला बाष्पयुक्तु ।
शब्दु न फुटे काष्ठवतु । पडला भूमंडळीं ॥१×८३॥
देखोन तया सप्रेमळा । गुरु कृपया उचंबळला ।
पूर्णचंद्रें वोसंडला । सागरु जयापरी ॥ ८४ ॥

( ४ ) ग्रंथावरूनि ज्ञान होय ।
तरी कां सेवावे गुरूचे पाय ॥ २×९७
किंवा ४×१८६

( ५ ) मौन धरा ह्मणतां वचन । तें चि बोलावें ॥ ३६

( ६ ) शरीर आपुलें मानावें । तरी तें सर्वथा नव्हे ।
बहुतांचें हें स्वभावें । होय ह्मणौनि ॥ ३/१३८

( ७ ) ऐसे संसारसांते आले । ते अवघे चि नागवले ।
सर्वा प्रकारीं ठकले । उपचारतीचिना ॥ ३/९६९

(८) कवण मातापितर कवणा। कन्या पुत्र हे विकल्पना।
काहीं संमंधु चि असेना। परस्परा जीवांतें॥ ३/१८९.

(९) वैद्यें नाडिका पाहिली। रोगाची परीक्षा केली।
परंतु प्रतीति आपुली। तेथें अनारिसी॥ ४/८८
प्रतिज्ञेसीं देईजे मात्रा। आणि ते गुण नेदी शरीरा।
ते औषधींचा पसारा। तो काय करावा॥ ८९॥

पण या हि पेक्षां विशेष पटण्यासारखी गोष्ट ह्मणजे ग्रन्थराजाचें सबंध तिसरें प्रकरण होय. तिसऱ्या दशकाच्या पहिल्या पांच समासांत श्रीसमर्थांनीं प्रपंचाचें जें चित्र रेखाटलें आहे, त्याची कल्पना ग्रंथराजाच्या तिसऱ्या प्रकरणावरून त्यांना सुचली, असें दिसतें. दासोपंतांनीं बाळपणचें वर्णन केलेलें नाहीं, परंतु पुढें विवाहानंतर अपत्य व्हावें अशी उभयतांस इच्छा होणें, प्रथम कन्या मग पुत्र होणें, पुत्रसुख, स्त्रीपुत्रादि प्रपंचांतील माणसें आपलें च सुख कसें पहातात, त्यामुळें याला देशांतराला जावें लागतें, तेथें हा द्रव्यार्जन कसें करतो, पुन्हा घरच्या आठवणी होऊन हा घरीं येतो, आणलेलें द्रव्य संपल्यावर यानें पुन्हा द्रव्य मिळविण्यास जावें अशी स्त्रीपुत्रादिकांना कशी इच्छा होते, हा पुन्हा कसा जातो, पुढें हा ह्मातारा होतो, मुलगे याला बाहेर काढतात इत्यादि ग्रन्थराजांतील कथाभाग वाचीत असतां कोणाला हि श्रीमत् दासबोधाची आठवण होईल. श्रीसमर्थांनीं केलेलें वर्णन जास्त विस्तृत जास्त स्वाभाविक व जास्त हृदयंगम आहे हें उघड आहे, पण त्या वर्णनाला ग्रन्थराजाचें हें तिसरें प्रकरण निमित्त झालें आहे,

ही गोष्ट खरी. प्रपंचाच्या कष्टप्रद स्थितीचें वर्णन करून मुमुक्षूचें चित्त परमार्थाकडे लावावयाचें हा दोन्ही ठिकाणीं एक च हेतु असल्यामुळें, प्रपंचाचें वर्णन झाल्यावर दासोपंतांनीं हि हें शरीर आपलें नाहीं, तर काळाचें आहे, असा थोडक्यांत कथाभाग आणून श्रोत्यांच्या अंतःकरणावर विरक्तीचा ठसा उमटवून त्यांचें मन भक्तिमार्गाकडे वळविलें आहे. यासंबंधाचे उतारे द्यावयास वास्तविक नकोत, असें वाटतें.

असा हा श्रीसमर्थांच्या वाचण्यांत आलेला व त्यांना हि आवडलेला ग्रन्थराज ग्रन्थ होय. ग्रन्थ अत्यंत लहान आहे, पण त्यांत तत्वज्ञान पूर्ण भरलें आहे. तत्वज्ञानाचीं गूढ प्रमेयें जरी समजण्यास कठीण असलीं तरी परमार्थमार्गांत आपला प्रवेश व्हावा असें ज्या जीवाला वाटत असेल त्यानें आरंभ कसा करावा याचा जो उपदेश दासोपंतांनीं केला आहे तो प्रत्येकास समजण्यासारखा आहे. तो समजून तदनुरूप आचरण करण्याचा संकल्प जीव करील तर तरेल यांत शंका नाहीं.

आपण हल्लीं आपला काळ जसा कंठीत आहोंत तो मार्ग व्यावहारिक दृष्ट्या कदाचित् स्वार्थाचा असेल परंतु लौकिक हित तें च आत्महित आहे असें नव्हे, हें मनाला पटून आपण स्वहित साधलें पाहिजे, अशी इच्छा होणें हें च महद्भाग्य होय.

मी कवणाचा माझें कवण । करितों हें काय आचरण ।
केवळ हित तें कासेन । माझें असे ॥ ३-१८८

असा विचार तरी सर्वांना च कोठें सुचतो. आपण आपलें

आयुष्य व्यर्थ दवडीत आहोंत, नुसत्या करमणुकींत, देहाचे चोज करण्यांत, बायकापोरांचे लळे पुरविण्यांत, इष्टमित्रासमवेत मनरंजन करण्यांत आयुष्याचा नाश झाला तितका पुरे, आतां कांहीं तरी स्वहिताचा मार्ग अवलंबिला पाहिजे अशी उत्कट इच्छा ज्या दिवशीं ज्या जीवाला होईल तो दिवस त्या जीवाचा भाग्याचा होय. असा जीव स्वहिताच्या मार्गाला लागला ह्मणून समजावें.

अशी तळमळ ज्या जीवाला लागेल त्यानें काय करावें?

( १ ) अशा जीवानें प्रथम स्वतःस एकांताची गोडी लावून घ्यावी. एकांताची महती फार आहे. श्रीसमर्थांनीं हि ती परोपरीनें प्रगट केली आहे. ज्याला एकांत मानवतो त्याला सर्वांच्या आधीं परमार्थमार्ग दिसतो ह्मणून समजावें. एकांतापासून पुष्कळ आघात टळतात. वायफळ वटवट करण्याची सवय असल्यास मोडते, नसल्यास लागत नाहीं. शुष्क शब्दवाद करणें तरी एक व्यसन च आहे. तें पुष्कळांना असतें. परमार्थाला तें मोठें विघ्न च होय. तें व्यसन एकदा जडलें ह्मणजे टाकणें मोठें कठीण असते.

शब्दवादीं लागे मन। मग तें गोडी धरी जाण।
काढितां सहसा तेथून। न धरी परती॥ ७-३१

ह्मणून प्रथम एकांताची गोडी मनाला लावली पाहिजे. एकांताच्या योगानें आपला अभ्यास हळुहळु वाढत च जातो.

( २ ) मनाला एकांत प्रिय वाटूं लागला ह्मणजे तें मन

वा० क्र०१०४
४२९



विचारारूढ सहज च होतें. कामक्रोधादि हे आपले वैरी आहेत, त्यांचा प्रवेश हि हृदयमंदिरीं होऊं देतां कामा नये हा विचार एकांतप्रिय मनाला आपोआप सुचतो.

आत्मविवेका आश्रयावें । देहाभिमाना सांडावें ।
कामक्रोधें नेदावें । विटाळूं मन ॥ ३-१८७

असें सहज च त्या मनाला वाटूं लागतें दुर्जयाच्या संगाचा त्याला वीट येतो, त्याच्या वासनांचा क्षय होतो. त्याचा आहार-विहार युक्त होऊं लागतो.

( ३ ) मनाची इतकी प्रगती झाली म्हणजे, मग तें निर्मळ मन शुद्ध, पवित्र, निर्जन अशा प्रदेशांत देहाला नेऊन त्याकडून एकादें प्रिय असें आसन घालवीत जाईल. सिद्धासन म्हणा, पद्मासन म्हणा किंवा असें च एकादें सुखदायक आसन आवडून त्या आसनाची गोडी मनाला लागणार. पवित्र प्रदेश, एकांत वेळ, आसनस्थ देह व बाह्यवृत्तिशून्य मन इतकी अनुकुलता असल्यावर, मन अंतर्मुख होऊन आत्मचिंतनांत रमूं लागावें, यांत काय आश्चर्य आहे !

जवं जवं अदेखणें बाहेरी । तवं तवं देखणें होय अंतरीं ॥ ९/३९ ॥

( ४ ) बाह्य व्यापार सुटून श्रीसद्गुरुचरित्रचिंतनाचा ध्यास घेतलेलें मन नियमबद्ध होऊन दिवसानुदिवस श्रीगुरु-कृपेला पात्र होत जावें हें अगदीं स्वाभाविक आहे. श्रीसद्गुरूंनीं सच्छिष्याचा इतका हि अंत कधीं पाहिला असेल असें वाटत नाहीं. सद्गुरु फार कोमल मनाचे असतात. शिष्यापेक्षां गुरु च फार अधीर झालेले असतात. ते कृपाळुपणें शिष्याचें

अल्प धारिष्ट पाहितात, तेवढें धारिष्ट शिष्याचे ठिकाणीं असलें ह्मणजे मग सद्गुरूंना धीर निघत नाहीं. शिष्याच्या अनन्यभक्तीनें आकळलेला सद्गुरु

मग तो प्रसन्न होईल । अधिकारें तत्व उपदेशील ।
वचन येक सांगैल । उपदेशाचें ॥ ३–१९३ ॥

( ५ ) असें तें एक वचन ह्मणजे अद्वैतप्रतिपादक महावाक्य होय. तो महावाक्याचा उपदेश श्रीसद्गुरुमुखानें होण्यास जीव अधिकारी झाला ह्मणजे यापरतें आणखी निराळें स्वहित काय साधावयाचें उरलें ?

इत्यादि रीतीनें गहन तत्वांचा उपदेश ग्रन्थराजानें सुलभ रीतीनें केला आहे. तो मुळावरून श्रवण करण्याची बुद्धि प्रत्येकाला झाली पाहिजे, अशी इच्छा प्रगट करून खुद्द दासोपंतांनीं च केलेली प्रार्थना करून आपण उपसंहार करावा हें योग्य होय.

देवा तुझेनि स्मरणें । ग्रंथु रचिला म्यां अज्ञानें ।
तो तुझिये भक्तीकारणें । उपयुक्त हो ॥ ८–८५ ॥
दिगंबरानुचरु ह्मणे । साधुजनीं कृपा करणें ।
आरुषें येथीचीं वचनें । संपादावीं ॥ ८६ ॥
ग्रन्थकर्ता मी अचतुरु । नेणे काव्यमुद्राप्रकारु ।
येथीचा पारमार्थिकु विचारु । तो चि पाहावा ॥ ८७ ॥

## उपसंहार

या ग्रन्थाच्या आह्मांस एकंदर चार प्रती मिळाल्या. दोन अंबाजोगाईस मिळाल्या व दोन श्रीदासविश्रामधामकर्ते आत्मा-

राम महाराज यांच्या मठांत येक्केहाळीस मिळाल्या. त्यांना अनुक्रमें ॐ, श्री, रा, म, अशा संज्ञा दिलेल्या आहेत. प्रथम हातीं ॐ प्रत आली व तिजवरून आह्मी नकल केली होती, ह्मणून प्रस्तुतचा ग्रन्थ ॐ प्रतीवरून छापला आहे व इतर प्रतींतील महत्त्वाचे पाठभेद टिपांत दिले आहेत. कोणत्या हि प्रतीच्या शेवटीं शक दिलेला नाहीं, तथापि अंतर्बाह्य प्रमाणावरून ॐ प्रत शक १६५० नंतरची, श्री प्रत दासोपंतकालीन शक १५०० चे सुमाराची, रा प्रत अदमासें १६०० तील व म प्रत १६८० तील असावी, असें वाटतें.

अंबा जोगाईचे रा. रा. श्रीधर अवधूत ऊर्फ आबासाहेब मोहरीर देशपांडे यांच्या मार्फत तेथील प्रती मिळाल्या. रा. आबासाहेब हे दासोपंतांचे विशेष अभिमानी असून त्यांचे कडून दासोपंतांचे इतर हि कांहीं ग्रन्थ मिळाले आहेत. ईश, केन, कठ ह्या तीन उपनिषदावर दासोपंतांचें जें भाष्य आहे तें छापण्याचें काम आनंदाश्रमाचे व्यवस्थापक रा. रा. हरि नारायण आपटे यांनीं स्वीकारलें आहे. हीं तीन उपनिषदें छापलीं गेलीं ह्मणजे पुढील उपनिषदें व दासोपंतांचे इतर संस्कृत-प्राकृत ग्रन्थ मिळण्याचा बरा च संभव आहे. तूर्त महाराष्ट्राच्या पदरांत ग्रन्थराज पडत आहे, इतकें खरें.

आषाढ व. ६<br>शके १८३६ } शंकर श्रीकृष्ण देव

1198

# श्रीगुरुस्तवन

पद

अरे मनसा रे रे मनसा काये भ्रमसी काह्या भ्रमसी ।
भ्रमरु होउनि राहीं अवधूतपदांबुज ।
अरे श्रीदत्तपादांबुज सहज सुगंध तेथिचा घेई ॥ १ ॥
पादतळ वो रातोत्पळ वो गुणअन्वित गुणसंसेवित ।
संभावित सुरसंपूजित नित्य सेवीन माये ॥ ७ ॥
गंध तुळसीपुष्पीं रमसी कइ कइ मना चंचळ न्हसी ।
श्रीचरणीं चंचळ न्हसी जाणोनि स्वहीतसोये ।
दिगंबरें येकेंवीण अरे श्रीदत्तें येकेंवीण ।
सर्वथा व्यर्थ चि सकळ होये ॥ २ ॥



## ॥ श्रीदत्तात्रय ॥

## दासोपंतांचें देवघर—अंबाजोगाई



ओत्सा. छेगा पुणे

[library stamp, illegible]

# ॥ श्रीग्रन्थराज ॥

## ॥ प्रकरण पहिलें ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीमदादिगुरुदत्तात्रेयाय नमः ॥

जय जया जी कमलनयना । कृष्णमूर्ति गुणनिधाना ।
योगीमानसरंजना । देवदेवा ॥ १ ॥
अनाथांचा तूं पैं नाथु । मुक्तां मुमुक्षांचा स्वार्थु ।
तुझें नामस्मरण परमार्थु । साधकांतें ॥ २ ॥
स्वभक्तजनचिंतामणी । ब्रह्मानंदाची तूं खाणी ।
ज्ञानविज्ञानाची लावणी । कृपा तुझी ॥ ३ ॥
सकळां विद्यांचें भांडार । वेदवेद्य विज्ञानसार ।
अज अव्यय अक्षर । परब्रह्म तूं ॥ ४ ॥
तुझेनि नामस्मरणें । सकळ सुखाचें पारणें ।
अविवेक उपसंहरणें । हों चि लागे ॥ ५ ॥
नामामृतशब्दश्रवणें । उरावें येणें अंतःकरणें ।
श्रोतां श्रूय चि होणें । परंतु अनारिसें[1] ॥ ६ ॥
न लगे असतिया कुंभा । मग तद्भावें नभ नभा ।
लागे प्रभेतें प्रभा । आळंगी काये ॥ ७ ॥
वेद्य वेदना भावें तेवी । काय मानावें शिव शिवी ।
अखंडतेची पदवी । ते ऐसी आहे ॥ ८ ॥

---

१ वेगळें, भिन्न.

भेदाची वाउगी कल्पना । तेथें अभेदा कैंची संभवना ।
आरोपु मिथ्या अधिष्ठाना । वियोगु चि नसे ॥ ९ ॥
सर्पबुद्धि ते चि जाये । दोरीं दोरत्व सिद्ध आहे ।
नामस्मरणें गति होये । जडातें तैसी ॥ १० ॥
तुझीया रूपाचें ध्यान । तें आगळें समाधीहून ।
येथीची जाणती खूण । प्रेमवंत ते ॥ ११ ॥
ऐसा तूं सद्गुरुनाथा । आदि गुरो श्रीअवधूता ।
परमात्मया विश्वंभरिता । नमो तूंतें ॥ १२ ॥
करूनि तूंतें अभिवंदन । बोलों पाहे येक वचन ।
जेणें तुझां ठाईं मन । समरस होये ॥ १३ ॥
भक्ति[1] उपयुक्त आसक्तां । योगाभ्यासियां विरक्तां ।
ऐसें वचन श्रीअवधूता । बोलों पाहातुसें ॥ १४ ॥
तरी मातें कृपा करावी । अहंबुद्धि ते पै मारावी ।
मग स्वांसें[2] चेतवावी । देवदेवा ॥ १५ ॥
ऐसी संप्रार्थना करूनि । प्रारंभु ग्रंथारंभणी ।
कीजतु असे येथूनि । ह्मणे दिगंबरानुचरु ॥ १६ ॥
सांड्रुनियां वाग्विस्तारु । ग्रंथातें नेदिता पसरु ।
बोलिजैल तो प्रकारु । योगसंपत्तीचा ॥ १७ ॥
प्रथम गुरु तो कैसा । कैसी तयाची पूर्ण दशा ।
ते संक्षेपें चि विदुषां । प्रति बोलिजैल ॥ १८ ॥
मंत्रमार्गी येक निपुण । उपदेशिती यंत्रादि साधन ।
क्रिया तंत्र परम गहन । प्रसंशिती जे ॥ १९ ॥
ते गुरुत्वें मानावें । परंतु सद्गुरु तैसे[3] न ह्मणावें ।
ईश्वरावतार स्वभावें । तारक जे ॥ २० ॥

---

१ " भक्तां " पाठांतर श्री. म. २ " स्वांशेंते " श्री. ३ " तयास " म.

जे उपदेशिती भेदु । अन्य मतेसी विरोधु ।
ब्रह्मात्मविषयीं बोधु । दुर्लभु जयां ॥ २१ ॥
कां वेदविरुद्धें मतें । उपदेशिती शिष्यांतें ।
ते असद्गुरु निरुतें[1] । जाणावें वर्म ॥ २२ ॥
दृष्टि वेधें वेधिती । कां हाठयोगु उपदेशिती ।
ते सद्गुरु मानिती । अविवेकी जन ॥ २३ ॥
दृष्टीचें लक्ष मानून । लक्षिती निरालंब गगन ।
तेथें आभास आन आन । उमटों[2] लागती ॥ २४ ॥
व्यापक अथवा येकदेशी । स्वरूप लक्षिती आकाशीं ।
जें मत वेदशास्त्रासी । मिळे चि ना ॥ २५ ॥
ऐसीं नाना मतें निर्मूळें । वेदविरुद्धें सकळें ।
सांगती ते आंधळे । न होती सद्गुरु ॥ २६ ॥
अंधें अंधु वागविजे । तै दोघीं अडीं पडिजे ।
सद्गुरु नेणोनि येरां भजिजे । ते तैसें होये ॥ २७ ॥
असद्गुरूचें लक्षण । थोर तेथीची येकी खूण ।
जें प्रथम आधीं मी कवण । हें चि न कळे ॥ २८ ॥
विशेषें मुद्रा दांभिक । रजःप्रवृत्ती ते अधिक ।
क्रोधु बहुसालु पादार्थिक । वासना भोगाची ॥ २९ ॥
अर्थ स्वार्थें उपदेशिती । अधिकारिया विद्या वंचिती ।
ज्ञान विकरां घालिती । ते न होती सद्गुरु ॥ ३० ॥
आतां सद्गुरु ते कवण । जे शांत उदार सर्वज्ञ ।
सकळा अर्थीं निर्वासन । दंभें सुटले ॥ ३१ ॥
आत्मज्ञानाची कळा । संपूर्ण हृदयीं निर्मळा ।
कामु क्रोधु भस्म जाळा । जयां पुरुषांचा ॥ ३२ ॥
रोकडा ब्रह्मसाक्षात्कारु । करूं जाणे तो सद्गुरु ।
मोक्षाचा नाहीं उधारु । जयाप्रती[3] ॥ ३३ ॥

---

१ खरें, निश्चयपूर्वक. २ "उपजों चि" श्री.म. ३ "जयापाशीं" म.

जयाचेनि संनिधानें । शिष्यें सर्वज्ञ होणें ।
तया सद्गुरूचीं चिन्हें । किती वर्णावीं ॥ ३४ ॥
बोलिलीं लक्षणें गुरूचीं । आतां बोलिजती शिष्याचीं ।
प्रथम अनधिकारीयां जडांचीं । प्रकट करूं ॥ ३५ ॥
सांगितलें तैसें तें न करी । वारिलें तें वळें चि करी ।
केलें न सांगे[1] अहंकारी । गर्ववंतु ॥ ३६ ॥
बाह्य व्यापारीं आसक्तु । मन जयांचें अत्यंतु ।
लवार्ध नव्हे स्वस्थु । तो शिष्यु वर्जावा ॥ ३७ ॥
सर्वांपक्षीं व्यग्रता । सर्वत्र सदा दुश्चितां[2] ।
निरोपणीं असावधानता । जया शिष्यातें ॥ ३८ ॥
आइकतां कांहीं निरूपण । आणिक अर्थीं लागे मन ।
तैं निकुरें[3] हिं करून । शरीर चाळितां ॥ ३९ ॥
सहसा नये ठाया । केलें निरूपण जाये वाया ।
तत्वज्ञान हें शिष्या तया । नये उपदेशूं ॥ ४० ॥
आइकत असतां श्रवण । लागती जयाचे नयन ।
निद्रा दाटीं[4] डोलायमान । शरीर होये ॥ ४१ ॥
व्यवहार वाद श्रवण । निद्रा नवचे तेणेंविण ।
तुटों नेदी अनुसंधान । तिये कथेचें ॥ ४२ ॥
ऐसा तो शिष्यु न करावा । केला चि तरी न मनावा ।
आतां मानी तै तो जाणावा । सद्गुरु नव्हे ॥ ४३ ॥
परावयाची निंदा । जयातें आवडे सदा ।
वर्मवादु तो विनोदा । सारिखा प्रकाशी ॥ ४४ ॥
दिवा रात्रीं तें चि मनन । उच्चारी[5] परावे अवगुण ।
तयाप्रति हें ज्ञान । फळे चि ना ॥ ४५ ॥

---

१ " संगे " श्री. रा. २ " दुचिता " श्री. रा. ३ निश्चयानें ४ " दाटे " म ५ " विचारी " श्री म.

निर्मूळु पक्षु आश्रयी । आणि तो चि प्रतिष्ठी आग्रही ।
तयाप्रति हें कांहीं । न बोलिजे ज्ञान ॥ ४६ ॥
परावें जें नव्हे ह्मणे । तें बळें चि खरें करणें ।
माईक मिथ्या हें निजमनें । मानिलें ही ॥ ४७ ॥

ऐसा आग्रही क्रोधी मूर्खु । वादी पाषांडी निंदकु ।
जयाचां देहीं शोकु । तो शिष्यु न करावा ॥ ४८ ॥

विषयभोगीं आसक्तु । धरी दुष्टाचा सांगातु ।
परमार्थी अनासक्तु । तो शिष्यु वर्जावा ॥ ४९ ॥
आवडी नाहीं शरीरीं । मावेचें भजन करी ।
बाधी जो कंटकापरी । सळे हृदईं ॥ ५० ॥

अवगुणाचा परम राशी । बोलतां अनर्थु जेणेसीं ।
तयाप्रति हे काइसी । अध्यात्मविद्या ॥ ५१ ॥

जाणिवेचिनि माजलेपणें । मर्यादा उलंघिली जेणें ।
कां आंगबळें चि न मने । दुसरें जया ॥ ५२ ॥
वादी कपटी कामातुरु । खोटा वंचकु कातरु ।
केवळु जो मतिचोरु । तो अनुग्रहावाना ॥ ५३ ॥
मूर्खांचीं सांगतां लक्षणें । कल्पें न सरे बोलणें ।
आतां सच्छिष्याचीं लक्षणें । प्रकट करूं ॥ ५४ ॥

विषयांचा ठाईं विरक्तु । गुरुभजनीं परमासक्तु ।
रजतमदोषविगतु । नाहंवादी ॥ ५५ ॥
आस्था हृदईं अपार । स्वास्था चित्तीं निरंतर ।
अंतःकरण तें मंदिर । महाप्रज्ञेचें ॥ ५६ ॥
नव्हे निंदकु आळसी । साधनीं प्रीति जयासी ।
ब्रह्मविद्या हे तयासी । सुफळ होये ॥ ५७ ॥

निश्चळ निर्मळ निराकुळ । मन हें जयाचें केवळ ।
भागीरथीचें जळ । पवित्र जैसें ॥ ५८ ॥

तो ज्ञानाधिकारी जाणावा । सद्गुरुनाथें उपदेशावा ।
ब्रह्मसाक्षात्कारु करावा । तयातें रोकडा ची ॥ ५९ ॥
ऐसा कवणी येकु अधिकारी । भ्रमला नरु संसारीं ।
तो कवणे येके अवस्वरीं । पूर्वपुण्यवशें ॥ ६० ॥
सर्वज्ञा गुरुतें पावला । स्वरूप जाणता जाला ।
अंतःकरणीं निवाला । तो प्रकारें कवणें ॥ ६१ ॥
कवणी येकु दरिद्री । भ्रमतां भ्रमतां संसारीं ।
परिग्रहपाळणभारीं । दुःखद असतां ॥ ६२ ॥
तया अवचट निधान । सांपडे निक्षिप्त अपार धन ।
तितुलेनि तेणें मन । तयाचें कैसें ॥ ६३ ॥ *
कामधेनु चिंतामणी । आणि आयासें चि वांचूनी ।
कां सुरतरु आंगणीं । दरिद्रासी ॥ ६४ ॥
तैसें सद्गुरूचें दर्शन । जालें अनायासें चि करून ।
तयाचें आनंदातें मन । कैसें न पवावें ॥ ६५ ॥
अर्थलाभ कोटी अनंता । न पावती जेणेंसी समानता ।
जया गुरुदर्शनाची आस्था । तो हें जाणे ॥ ६६ ॥
स्वर्गसुखाची कुरवंडी । गुरुदर्शनसुखावरी फुडी ।
तया संतोषाची केवढी । महिमा सांगावी ॥ ६७ ॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर । ययांचे सगुण अवतार ।
प्रतियुगीं अपार । देखिले जीवीं ॥ ६८ ॥
मग तयातें तेणें करून । जालें संसारविछेदन ।
जैसें तैसें चि आत्मज्ञानें । अविद्या हे ॥ ६९ ॥

---

१ " कन्हणी " श्री रा. २ " अवसरी " श्री. रा. ३ " कन्हणें " श्री. ४ " कन्हणी " श्री. रा. ५ "संतुष्ट" रा. * " नाकीं मरणशीळा अमृत । पावे जसें अकस्मात । तेणें तयाचें हर्षयुक्त । मानस जैसें ॥ ६४ ॥ " अशी एक जास्त ओवी श्री. रा. म. या तिन्ही प्रतींत आहे. ६ " फुडी " श्री. रा. फुडें=निश्चयानें. ७ " नव्हे चि " म. ८ " आत्माज्ञान " श्री. प्रतींत कोणी तरी मागाहून केलेलें दिसतें.

अवतारसंगें वर्ततां । न तुटे संसारु दीर्घ व्यथा ।
ह्मणोनि गुरुसंगु तो समस्तां । दुर्लभु सदा ॥ ७० ॥
येका गुरूचें अदर्शन । येर सर्व देवदर्शन ।
पूर्वीं दुर्लभ ह्मणौन । कवणासी होतें ॥ ७१ ॥
अनादि संसारबंधन । तयाचें नव्हे चि छेदन ।
तें चि पूर्वीं गुरुदर्शन । जालें जया ॥ ७२ ॥
ते जीत चि जीवन्मुक्त[1] । जन जाले ब्रह्मीभूत[2] ।
तयाचे चुकले आघात । जन्ममरणाचे हे ॥ ७३ ॥
ह्मणोनि संसारिकां कहीं । पूर्वीं हें संप्राप्त चि नाहीं ।
आणी हे दुर्लभ पुढें हि । दर्शन गुरूचें ॥ ७४ ॥
दर्शनाउपरी दर्शन । पुनरपि नाहीं मागुतेन ।
निर्मूळ होय जीवपण । तैं जन्मु चि कैंचा ॥ ७५ ॥
जन्मुमरण आतां नाहीं । ऐसा पुण्य काळु पावे जंई ।
तैं चि सद्गुरूचा पाईं । हे दृष्टी पडे ॥ ७६ ॥
का गुरुदर्शनाचें फळ । जन्मुमरण होये निर्मूळ ।
माया अविद्या मृगजळ । जाय वितळोनियां ॥ ७७ ॥
ह्मणौनि येकुदां चि हे जीवातें । जोडे अपारें सुकृतें ।
मागें नव्हतें पुढें मागुतें । दुर्लभ जे कां ॥ ७८ ॥
शिष्यु मानी अंतःकरणीं । तें आजि घडलें मजलागूनी ।
तरी सभाग्यु आतां मजहूनी । कवणु दुजा ॥ ७९ ॥
आजि जालों कृतकृत्य । आजि मी पुरत्रयीं समर्थ ।
संसारवैरी मूर्छित । पडिला आजि माझा ॥ ८० ॥
ऐसा आनंदें भरितु । शिष्यराजु प्रेमवंतु ।
लागता जाला त्वरितु । गुरुचियां चरणीं ॥ ८१ ॥
पुनःपुनः नमस्कार । करूं चि लागला अपार ।
तयें प्रेमार्णवीं जळचर । चित्त बुडालें ॥ ८२ ॥

---

१ " ब्रह्मभूत " श्री. रा. म. २ " जीवन्मुक्त " श्री. रा. म.

तेणें चि आनंदें सगद्गदितु । कंठु जाला बाष्पयुक्तु ।
शब्दु न फुटे काष्ठवतु । पडला भूमंडळीं ॥ ८३ ॥
देखोनि तया सप्रेमळा । गुरु कृपया उचंबळला ।
पूर्णचंद्रें वोसंडला । सागरु जयापरी ॥ ८४ ॥
कीं वन भ्रमोनि आली । वछ देखोनि हुंबरली ।
धेनु अमृतें पान्हायिली । द्रवती धारा ॥ ८५ ॥
तैसा करुणेचा जळधरू । उभा राहोनि श्रीसद्गुरु ।
उचलूनि शिष्यु कुमरु । आळंगिला हृदईं ॥ ८६ ॥
ह्मणे रे बापा लळवेडा । तूंतें काईसा भेऊ येव्हढा ।
हृदयस्थ काय तें मजपुढां । प्रकट करी ॥ ८७ ॥
ऐसा शब्दें आश्वासिला । मग तो बोलता जाला ।
शिष्यु मतिप्रेमळा । करी स्तवन ॥ ८८ ॥
जय जया जी करुणाकरा । ब्रह्मानंद जळधरा ।
श्रीगुरो कृपासागरा । सत्यमूर्ति ॥ ८९ ॥
अनाथबंधो भगवंता । विज्ञानबीजा अनंता ।
सर्वात्मया विश्वंभरिता । सद्गुरुस्वामी ॥ ९० ॥
तुझेनि श्रीपाददर्शनें । तुटलीं गुणाचीं बंधनें ।
आतां इतुलियावरी पुसणें । तें उरलें चि नाथी ॥ ९१ ॥
तथापि बोलावें देवेंसीं । हा चि विषयो वर्ते मानसीं ।
तरी यये अर्थी निमित्तासी । केलें पाहिजे ॥ ९२ ॥
तरी अनादि जीव तें बंधन । तया बंधाचें कैसें ज्ञान ।
तें मातें उमजऊन । देवें सांगावें ॥ ९३ ॥
आणि मोक्षु ह्मणिजे तो कैसा । सांगावा असे जैसा तैसा ।
हा ऐसा विषयो मानसा । उपजला जी ॥ ९४ ॥

इति श्रीदिगंबरानुचरविरचिते । ग्रन्थराजनामग्रन्थे । गुरुशिष्यसंवादे । गुरुशिष्यलक्षणविवरणं नाम प्रथमं प्रकरणम् ॥ १ ॥

# ॥ प्रकरण दुसरें ॥

## ॥ श्रीमद्योगिराजाय नमः ॥

मागां संपलें प्रकरण । तेथें संपादलें निरोपण ।
गुरु शिष्य दोघेजण । संवादु करिती ॥ १ ॥
शिष्यें आक्षेपु येकु केला । बंधु आणि मोक्षु पुसिला ।
तें आइकोनि हांसिनला । सद्गुरु तो ॥ २ ॥
गुरु बोलती संतोषें । शिष्यशिरोमणी परियसें ।
तुंवा पुसिलें अज्ञानवशें । सत्य सत्य ॥ ३ ॥
परंतु आह्मीं बोलतां । भाव ते सांडावी सर्वथा ।
सत्य मिळे परमार्था । तें चि बोलावें ॥ ४ ॥
तुंवा जो केला प्रश्नु । बंधु कवणु मोक्षु कवणु ।
तरी तो प्रश्नु विचारूनु । सिद्धांतें पाहातां ॥ ५ ॥
बंधु ह्मणिजे तो कैसा । तरी जाण वंध्यापुत्रा ऐसा ।
अंकुर आला आकाशा । तो कां नेणसी ॥ ६ ॥
अग्नीची शिखा पिळिजे । तेथें रसु जयापरि लाहिजे ।
तैसा चि बंधु पाहिजे । तंव तो कळों ये ॥ ७ ॥
वायोचा वायो संचला । रूप गुण तेथीचा निवाडिला ।
मग तो दृष्टी पाहिला । तंव बंधा ऐसा ॥ ८ ॥
पुसतासि बंधाचें लक्षण । तरि ऐसें तयाचें मिथ्याभान ।
आतां मोक्षस्वरूप येथून । पुसावें चि नलगे ॥ ९ ॥
नसतया पुरुषाचें मरण । तया मरणाचें साचारपण ।
चित्रदीपीं वाती लाऊन । लक्षा आणावें ॥ १० ॥
नसतया ग्रामाची । सीमा संज्ञा तेथींची ।
बंधु चि वाऊ तैं मोक्षाची । निर्धारणा कें ॥ ११ ॥

अंवसेचेनि पूर्ण चंद्र । कीं मध्यरात्रौ दिवाकरें ।
बंध मोक्ष हे चतुरें । पाहावे दृष्टी ॥ १२ ॥
ययां दोहींचें जाणपण । जयाचां ठाईं वर्तमान ।
तयाचिये योग्यतेलागून । उपमा चि नसे ॥ १३ ॥
गुंजें दीपु लाविला । सूर्यों पालवें माल्हविला ।
तेणें पुरुषार्थु केला । तो काय सांगावा ॥ १४ ॥
ऐसें आइकोनि बोलणें । शिष्यराजु तो काय ह्मणे ।
देवा बंध मोक्ष प्रकारें येणें । मिथ्या हे जैं ॥ १५ ॥
तरी बंधु[1] ना मोक्षु[2] ऐसा । जीवु तो जाणावा कैसा ।
हें सत्य परम पुरुषा । मातें निरोपावें ॥ १६ ॥
गुरु बोलती वचन । आतां पुसतासि जीवपण ।
तरि तयाचें स्वरूप कवण । सत्य सांगावें ॥ १७ ॥
सूर्यों अस्तमाना जाये । अस्तमान तें कैसें आहे ।
अपरदिनीं जो पाहे । प्रातःकाळीं ॥ १८ ॥
तें स्वरूप तया जीवाचें । जाण बापा जाण साचें ।
तें मत नव्हे आमुचें । तें जीउ तो कैसा ॥ १९ ॥
दोरु अवघा उकळिला । मग पीलु पीळातें चि भरिला ।
मग तयाचा दोरु जाला । तो हस्त किती ॥ २० ॥
साच बुझ अभिप्राउ । जीवत्व ह्मणिजे तें वाउ ।
तयाचा ठाईं भाउ । ठेविती जे ॥ २१ ॥
धिग्य जाणीव तयांची । सकळ युक्ति अनुमानाची ।
नेणती चि केवळ सत्याची । सोये जे कां ॥ २२ ॥
बंध मोक्ष दोन्ही वाउ । तैसा चि जीवत्वाचा अभाउ ।
सत्याचा जाणतां भाउ । ऐसा आहे ॥ २३ ॥
तंव शिष्यु बोले निरुतें । तरी संसारु हा कवणातें ।
जन्ममरण ईश्वरातें । ऐसें तंव न घडे ॥ २४ ॥

---

१ "बद्धु" श्री. २ "मुक्तु" श्री. रा.

श्री ग्रंथ संग्रहालय



श्रीगुरु बोले सर्वज्ञु । ईश्वरु बोलतासि तो कवणु ।
संसारु तो किंलक्षणु । येणें जन्ममरणेंसीं ॥ २५ ॥
स्वप्नीं देखिलें निजमरण । आणि पाडें तेणें चि संभवन ।
तयां दोहीं भावाचें द्रष्टेपण । आपणा खरें ॥ २६ ॥
मरणशीळु चि आत्मा होता । तरी कृतकर्मभोगु नसता ।
यापरी मरण चि वृथा । तैं उपजणें कें ॥ २७ ॥
एवं कल्पना चि मात्र ह्मणौन । जाण आत्मयां जन्ममरण ।
अजा अव्यया नित्या लागून । निरंतर हें ॥ २८ ॥
जन्ममरण हे कल्पना । तेथें कवणु संसारु कवणा ।
अवस्थाजनिता भाना । नित्यत्व नसे ॥ २९ ॥
स्वप्नीं भान देखिलें । जागृतीं तें काय जालें ।
कवणें सत्य मानिलें । सांग पां तें ॥ ३० ॥
तैसे चि जागृतीचें भान । मोडी तयातें स्वप्न ।
दोन्ही अवस्था क्षीण । सुषुप्तीं होती ॥ ३१ ॥
जो तूं ह्मणतासि संसारु । तो अवस्थाजनित समग्रु ।
भ्रमु दिसे गोचरु । अनित्यु तो ॥ ३२ ॥
जंवं नाहीं यथार्थ ज्ञान । मी कवणु हें वेदन ।
तंवं जीवत्व आणि जन्ममरण । सोसिजे जनीं ॥ ३३ ॥
ईश्वरत्व हि तंवं चि तें । जंवं नेणिजे आपणातें ।
जाणतां तत्त्व यथार्थें । कैंचा संसारु ॥ ३४ ॥
जीवत्व अविद्याकल्पित । माईक ईश्वरत्व तद्वत ।
भान हें अवस्थाजनित । प्रपंचु मिथ्या ॥ ३५ ॥
येथें सत्य येक अधिष्ठान । तयाची शुद्धी चि नेणोन ।
येर असाच तें पुसोन[1] । काज काई ॥ ३६ ॥
प्रपंचाची कैसी स्थिती । संहारु आणि उत्पत्ती ।
हे प्रश्न चि गोविती । जिज्ञासांतें ॥ ३७ ॥

---

१ "सांगोन" श्री.

भेदु सत्य कीं अभेदु । जीवा ईश्वराचा बोधु ।
हा शाब्दिकु ज्ञानवादु । पुरे आतां ॥ ३८ ॥
बंध मोक्ष हें विवरण । कार्य कैसें कारण ।
ऐसेनि ज्ञानें करून । विश्रांती न पवसी ॥ ३९ ॥
निर्मळ जें आत्मज्ञान । तें चि सत्याद्वय ब्रह्मदर्शन ।
जेथें जीवपण आणि ईश्वरपण । उडालीं दोन्हीं ॥ ४० ॥
प्रपंचाची व्यवस्था । ते पुसावी चि नलगे सर्वथा ।
सत्य स्वरूप तत्वता । कळोनि गेलें ॥ ४१ ॥
बंध मोक्ष भेदाभेद । हा खुंटला अवघा वादविवाद[1] ।
यालागीं आत्मज्ञान शुद्ध । तें चि पुसावें ॥ ४२ ॥
जाणपणाचिया कळा । आत्मज्ञानेंवीण विकळा ।
दृष्टी नाहीं तो डोळा । सुंदरु जैसा ॥ ४३ ॥
प्राणेंवीण शरीर । दीपकेंवीण मंदीर ।
मनुष्यहीन नगर । न शोभे जैसें ॥ ४४ ॥
घ्राणेंवीण वदन । गळसरीवीण अलंकरण ।
वायां गेलें सुंदरपण । कामिनीचें ॥ ४५ ॥
शस्त्रपरिग्रहो जाला । तो धैर्येंवीण वायां गेला ।
क्षत्री कुळवंतु भला । परंतु न शोभे ॥ ४६ ॥
आपणातें चि जो नेणे । तयाचें काय तें जाणणें ।
वर्णु नाहीं तें सोनें । मानी कवण ॥ ४७ ॥
षड्रस अन्न वोगरिलें । परि घालावें तें मुख न कळे ।
तेथें काय तेणें जालें । सार्थक कांहीं ॥ ४८ ॥
ह्मणौनि कांहीं न पुसें । आधीं स्वरूप जाण कैसें ।
मग पुसावें तें अनायासें । जाणसील तूं चि ॥ ४९ ॥
ऐसें श्रीगुरूचें वचन । शिष्यराजें करूनि श्रवण ।
नमस्कारिले चरण । तया स्वामीचे ॥ ५० ॥

---

१ "हे कुंठले अवघे चि वादव्यवाद ।" श्री.

शिष्यु बोले जी देवा । प्रश्नु तो कैसा करावा ।
हा अभिप्राऊ अघवा । नेणें चि मी ॥ ५१ ॥
म्या आपणा समर्पावें । समर्पूनि उगें चि असावें ।
पुसणें चि तें पुसावें । भक्तीचें आंग ॥ ५२ ॥
जाणीव धरूनि अंतरीं । जो गुरूतें प्रश्नु करी ।
पुसे कीं सांगे हें इतरीं । निर्धारें नेणिजे ॥ ५३ ॥
सांडूनि अधिकारु आपुला । प्रश्नु करी जो मना आला ।
न पाहिजे तो अनुग्रहिला । तेणें सद्गुरुनाथें ॥ ५४ ॥
करूनि आत्मनिवेदन । शिष्यें कां बोलावें वचन ।
परंतु अविवेकी मन । हें नव्हे तैसें ॥ ५५ ॥
ह्मणौनि जीव देवनाथा । अपराधी मी सर्वथा ।
उपसाहि[1]जोजी आतां । अज्ञानु मी ॥ ५६ ॥
इछा ते देवें कीजे । अज्ञातें कर्तव्य माझें ।
हें आइकोनि सद्गुरुराजें । साधु ह्मणितलें ॥ ५७ ॥
गुरु बोलती परियसें । पुसावें तें काय कैसें ।
हा विवेकु सर्वथा नसे । अज्ञानाप्रती ॥ ५८ ॥
तो काय पुसैल । किती शास्त्र जाणैल ।
काय युक्ति करील । अनुभवाप्रती ॥ ५९ ॥
घिसा चतुरु अपाडेंसीं । तो लोहो चि संघटी त्रासीं ।
माणीक मोतीं तयापासीं । न नेती चतुर ॥ ६० ॥
पय पा[2]णी निवडावें । हें राजहंसु चि जाणे बरवें ।
येरां वायसांचा नव्हे । लागु तेथें ॥ ६१ ॥
तेवि शास्त्रकाराचिया युक्ति । स्वानुभवीं काजा न येती ।
वेदवाक्य ये अर्थी । बोलिजैल ॥ ६२ ॥
श्रुतिः ॥ आत्मा वाऽरे द्रष्टव्यः ॥

---

१ "उपसाहिजे तें" रा. व "उपसाहिजो तें" श्री. २ "पानीय" श्री. रा.

आपुला आत्मा देखावा । आइकावा अभ्यासावा ।
वेदीं गुरुवादु बरवा । तो ऐसा असतां ॥ ६३ ॥

श्रुतिः ॥ न चक्षुषा पश्यति कश्चनैनं ॥ छ ॥

ऐसें हे वेदवचन । आत्मा ने देखिजे दृष्टीकरून ।
तया दोहीं वचना समाधान । कैसें करावें ॥ ६४ ॥
तरी आत्मज्ञानीं आस्थाहीन । केवळ संसारी मूर्ख जन ।
जया प्रत्यक्षावांचून । सत्य न मने ॥ ६५ ॥
तयातें आस्था उपजावी । आत्मज्ञानीं श्रद्धा होआवी ।
ह्मणौनि वेदें हें बरवी । युक्ति विचारिली ॥ ६६ ॥
आत्मा देखावा सर्वथा । आत्मदर्शनें सर्वज्ञता ।
येणें बोलें विवेकमुक्तां । आवडी उपजविली ॥ ६७ ॥
ते चि आस्थायुक्त जाले । आत्मा पाहों प्रवर्तले ।
तयांप्रति वेद बोले । जगद्गुरु जो ॥ ६८ ॥

श्रुतिः ॥ न चक्षुषा पश्यति कश्चनैनं ॥ छ ॥

आत्मा पाहों अपेक्षिजे । तरी तो दृष्टीं न देखिजे ।
दृश्य दर्शन सांडिजे । निर्धारीं जयाचां ॥ ६९ ॥
ऐसें आइकतां वचन । कुंठित जालें अज्ञान ।
आतां आत्मविवेकाचें अनुसंधान । सांडितील ते ॥ ७० ॥

श्रुतिः ॥ मनसैवानुद्रष्टव्यं ॥ छ ॥

ह्मणौनि तेणें वेदपुरुषें । बोलिलें वचन ऐसें ।
आत्मा हा दृष्टीं न दिसे । तो जाणावा मनें ॥ ७१ ॥
जन आस्थावंत जाले । मनें जाणों प्रवर्तले ।
बाह्य प्रपंचें सुटले । ऐसे होत्सांते ॥ ७२ ॥

श्रुतिः ॥ यतो वाचो निवर्त्तन्ते । अप्राप्य मनसा सह ॥

मग तयांप्रति ऐसें वचन । आत्मा नेणवे मनें ह्मणौन ।
वेदपुरुषु निरूपण । करिता जाला ॥ ७३ ॥

मनातें आत्मा प्रकाशी । मन न प्रकाशी आत्मयासी ।
तरि शब्द चि प्रमाण ऐसी । भावना धरावी ॥ ७४ ॥

श्रुतिः ॥ अयमात्मा ब्रह्म ॥ छ ॥

ऐसें हें वेदाचें वचन । शब्दु चि मानावें प्रमाण ।
आप्तवाक्य ह्मणौन । यथार्थ हें ॥ ७५ ॥

श्रुतिः ॥ तमेतं वेदानुवचनेन ॥ छ ॥

ऐसें हें वेदाचें वचन । शब्दप्रमाणीं हे चि प्रमाण ।
तें अनुवादणें आन । ययाचें चि असे ॥ ७६ ॥

श्रुतिः ॥ यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह ।
नानुध्यायाद्बहून् शब्दान् वा[1]वेद ॥ छ ॥

नेणोनि वाचा प्रवर्तली । ऐसी हे वेदाची बोली ।
घालागीं शब्दप्रवृत्ति सग[2]ळी । सांडावी आत्मवंतीं॥७७॥
ऐसें वेदवचन आयिकोनि । साधन योगवंतीं जनीं ।
आत्मा अज्ञेयु ह्मणू[3]नी । आस्था सोडावी ॥ ७८ ॥

श्रुतिः ॥ अयमात्मा ब्रह्म । विज्ञानमयः । आत्मज्योतिः ॥ छ ॥
तमेव धीरो विज्ञाय ॥ ॥ एतदक्षरमविदित्वा गार्गि ॥

ऐसें हें वेदाचें वचन । आत्मा स्वसंवेद्यु ह्मणौन ।
आणि आत्मसाक्षात्कार ज्ञान । अवश्य पाहिजे ॥ ७९ ॥
ऐसें वचन आइकोनि । साधक प्रवर्तले साधनीं ।
ते साधनयोगु मागुतेनि । कैसा भजती ॥ ८० ॥
सांडूनि देखणें दृष्टीचें । मना आणि बुद्धीचें ।
सांडूनि तेवि चि करणाचें । सकळ व्यापार ॥ ८१ ॥
स्वरूपें स्वरूप आपुलें । जाणावयालागि प्रवर्तले ।
ते स्वसंवेद्यत्वें राहिले । ऐसें असतां ॥ ८२ ॥

श्रुतिः ॥ तत्केन कं पश्येत् ॥ छ ॥

---

१ "वाचो विग्लापनं हि तत्" । असें पाहिजे. २ "आगळी" श्री. रा. ३ "मानूनि" श्री.

ऐसें हें वेदाचें वचन । आइकोनि सांडिती तें ही स्फुरण ।
मग सहजस्थिती आपण । निष्ठा करिती ॥ ८३ ॥
सहज असतां आत्मस्थिति । जाणणें तें असे चि पुडती ।
तेणें असंभावना स्फूर्ति । होय कां जंवं ॥ ८४ ॥

श्रुतिः ॥ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म । प्रज्ञा प्रतिष्ठा प्रज्ञानं ब्रह्म ॥
अयमात्मा ब्रह्म विज्ञानमयः । आनंदं ब्रह्मणो विद्वान् ॥

ऐसें तंवं हें वेदवचन । ययाचें करितां श्रवण ।
आत्मा ब्रह्म चिदानंदघन । सहज असे ॥ ८५ ॥
ऐसा निश्चयो परमु जाला । मोक्षीं अभिमानु उपजला ।
तो ही क्रमें चि छेदिला । तेणें वेदपुरुषें ॥ ८६ ॥

श्रुतिः ॥ एकमेवाद्वितीयं ब्रह्म । सर्वं खल्विदं ब्रह्म ॥
नेह नानास्ति किंचन ॥ एतदेतदक्षरं ॥ ७ ॥

ऐसें वेदवाक्य आइकतां । मुक्तां बद्धां येकरूपता ।
तेणें चि अनुभवें पाहतां । सिद्ध जाली ॥ ८७ ॥
जीवेश्वर भेदहीन । सर्व ब्रह्म निरंजन ।
ऐसें जाणतां विषम दर्शन । उडोनि गेलें ॥ ८८ ॥
ऐसे केवळ संसारिक । ते केले वेदें आत्माभिमुख ।
देखों प्रवर्तले सकळैक । आत्मयांतें ॥ ८९ ॥
ते दृष्टीवरूनि काढिले । मनाचां ठाइं ठेविले ।
स्थूळेसीं वेगळे केले । इतुलेनिचि ॥ ९० ॥
प्रपंचाभावदर्शनें । आवरूनि ठेलें मनें ।
तें ही मनाचें पाहाणें । सोडविलें क्रमें चि ॥ ९१ ॥
ते ही मनाची वृत्ति सांडिली । स्वसंवेद्यता आपुली ।
अभ्यासवंती आश्रयिली । ऐसें असतां ॥ ९२ ॥
तें ही स्वरूपानुसंधान । सांडवूनि स्वसंवेद्यतेचें स्फुरण ।
सहजात्मभावें करून । आणिले निष्ठे ॥ ९३ ॥

सच्चिदानंदमय । दाऊनि स्वस्वरूप ज्ञेय ।
कार्यकारणोपाधिद्वय । मिथ्या केलें ॥ ९४ ॥
सर्वत्र सर्वदा सर्व सम । प्रकाशिलें अद्वय ब्रह्म ।
येणें प्रकारें सुवर्म । सांगितलें जर्डा ॥ ९५ ॥
ऐसें सिद्ध चि वेदवचन । परंतु येके सद्गुरुवांचून ।
ब्रह्मात्मसाक्षात्कारज्ञान । तें नव्हे सर्वथा ॥ ९६ ॥
ग्रंथावरूनि ज्ञान होय । तरि कां सेवावे गुरूचे पाय ।
ह्मणौनि सच्छास्त्र हि काजा नये । गुरुवांचूनि ॥ ९७ ॥
सत्य सद्गुरूचें महिमान । तें येक ईश्वरेंसीं चि समान ।
तेथें कायसें जाणपण । शास्त्राचें तयां ॥ ९८ ॥
पुष्प ठेऊनि वासु गुंफणें । पयावेगळी गोडी करणें ।
ऐसें हे कवण जाणे । माणूस पां ॥ ९९ ॥
डोळा ठेऊनि संचला । न होतां आडळु[1] बुबळा ।
तेथींची दर्शनकळा । ते चि नेइजे ॥ १०० ॥
मरणीं देहो सांडिजे । तैसें जीत चि निवडिजे ।
जीवत्व मारूनि जीजे । प्रसादें गुरूचेनि ॥ १ ॥
नाडळत बुद्धि मना । दोहींचा आत्मा देखणा ।
अरूपु अगुणु जाणवेना । तो निवडावा कीं ॥ २ ॥
असतां यये शरीरीं । पाहावें ब्रह्मांडाबाहेरी ।
ऐसें दूरदर्शन संसारीं । दाता सद्गुरु ॥ ३ ॥
दृश्य हें प्रपंचभान । व्योमीं ठेवावें आच्छादून ।
सोमासूर्यातें लोपून । स्वयें चि तपावें ॥ ४ ॥
द्वारपणें आपुलें पाहातां । मरण तें दिसे मरतां ।
सद्गुरूचिया उपदेशितां । ऐसें होये ॥ ५ ॥
चौदा भुवनेंसीं गगन । आपुलां हृदंई[2] घेऊन ।
यया व्योमाचें प्रावरण । करावें कीं ॥ ६ ॥

---

१ स्पर्श. २ "उदरीं" श्री. रा. म.

दृष्टी दृष्टी देखणी । तिचें बुबळ लक्षूनि ।
न फोडितां दर्शनीं । प्रकाशु नव्हे ॥ ७ ॥
लक्षाचा लाभु आहे । तेथें पाहे तो न पाहे ।
पाहण्यां पाहतें खाये । पाहे मग ॥ ८ ॥
सुवर्णाची शुद्ध कळा । कसूनि पाहे अवलीळा ।
ते व्योमाची पाठीं डोळां । कसवटी धरी ॥ ९ ॥
अभावा पालवीं खिरे । देखणें तें माघारें ।
करी तैं बा रे । दावी प्रळयो ॥ ११० ॥
आकाशाचिया दोंदावरी । बैसला तो काय करी
अनंता ब्रह्मांडांची दोरी । सांडी तोडूनि ॥ ११ ॥
मांस नसतां मेदिनी । प्रत्यक्ष उडघावी गगनीं ।
नातरी गुरूचां चरणीं । लागावें कां ॥ १२ ॥
हरोनि चंद्राचें चांदिणें । व्योमें केलें आंगउटणें ।
तें सूर्यो तेणें ग्रहणें । आछादिला ॥ १३ ॥
दिवसातें रात्रि भेटे । मंडळ मंडळा झगटे ।
नेणणें ऐसें वाटे । परि जाणणें तें ॥ १४ ॥
सदैव सुदिनु जाला । राहो मंडळीं बुडाला ।
सद्गुरूचा देखिला । ग्रहणकाळु जो ॥ १५ ॥
ऐसा तो सद्गुरुनाथु । भाग्यें जोडे श्री अनंतु ।
तरी च हा परमार्थु । आपणा जोगा ॥ १६ ॥
नातरी चित्रीचें धन । कीं रायाचें राजभुवन ।
पाहावें चि दृष्टीवांचून । न करावी सत्ता ॥ १७
सद्गुरूची प्रसन्नता । ते चि येकी जोडी नसतां ।
येरां भाग्या पाहातां । पारु नाथी[1] ॥ १८ ॥
तें अल्पायुषिया सुताचें । धन सर्पदंशिताचें ।
काजा न ये जयाचें । तयातें कांहीं ॥ १९ ॥

1 "नाहीं" श्री. म.

जालां हि उत्र्याळु कष्टीं । न थरे तो वोलां काष्टीं ।
तैसें साधिलें हि सेवटीं । बुडे ज्ञान ॥ १२० ॥
ममत्वेंविण पान्हा । जैसा धेनुतें फुटेना ।
आणीक वत्सें नाना । लावितां हि ॥ २१ ॥
तैसा जो भक्तु पूर्वींचा । तो चि प्रियु होये सद्गुरूचा ।
हेवा करूं नये तयाचा । अपरीं जनीं ॥ २२ ॥
प्रसन्नतेवांचूनि जाण । जालें हि गुरुदर्शन ।
भिडा चाडा निरोपण । करितां हि तें ॥ २३ ॥
नेदी आपुलिया फळातें । ह्मणौनि गुरुदास्य मुख्य येथें ।
ब्रह्मात्मज्ञानप्राप्तीतें । साधन असे ॥ २४ ॥
आधीं तयाचें लक्षण । मजपासाव करीं श्रवण ।
केवळ कृपेचें साधन । भजन कैसें ॥ १२५ ॥

इति श्री दिगंबरानुचर विरचिते । ग्रंथराजनाम ग्रंथे । गुरुशिष्य संवादे । बंधमोक्षविवरणं नाम द्वितीयं प्रकरणं समाप्तम् ॥ ६ ॥

---

## ॥ प्रकरण तिसरें ॥

### ॥ श्रीमायायुक्तावधूतायनमः ॥

केवळ मोतियांचें पाणी । करूनि परिमळाघसणी ।
चंदन देवालागूनि । पूजनीतें ॥ १ ॥
माणिकाची दीप्ति घेइजे । मग तयाचें वज्र कीजे ।
पांचा दीपीं वोवाळिजे । सद्गुरूतें ॥ २ ॥
सुमनु देठु नाकळा । रूपांशु करूनि वेगळा ।
शुद्धपरिमळाची माळा । श्री आदिगुरुतें ॥ ३ ॥
पीयूषाची गोडी । विरजों घातलें परवडी ।
तया नवनीताची आवडी । योगिराजातें ॥ ४ ॥

कासया ऐसें नव्हे । गळे अभावी पालवें ।
तें द्रव्य समर्पावें । लीलाविश्वंभरातें ॥ ५ ॥
साखरेची शुद्ध गोडी । ते हि परंतु पाखुडी ।
सुभक्तु असे तो आवडी । सद्गुरूची जाणे ॥ ६ ॥
प्रकृतीचे स्वभाव गुण । सर्वदा तीसी अभिन्न ।
आतां तयांचें परिशोधन । करावें कीं ॥ ७ ॥
सांडूनि रज तम दोन्ही । सत्वांचा हि निर्मळपणी ।
काढावी खोडी खावणी । ऐसें ना आहे ॥ ८ ॥
दंभें दर्पें अभिमानें । आंगीं असतेनि तमोगुणें ।
कैसें देवातें स्मरणें । पूजणें पा ॥ ९ ॥
शौचेविण केलें स्नान । वरी संध्या जपु अनुष्ठान ।
तें उफराटें अपवित्रपण । वाढविलें होये ॥ १० ॥
संगु चि जेथें असुखाचा । दृष्टि वेधु तामसाचा ।
कुत्सरा कपटिया निंदकाचा । सद्गुरूतें ॥ ११ ॥
तेणें जें कांहीं केलें । तें स्वादुल विषें घोळिलें ।
वमनपात्रीं वोगरिलें । षड्रस अन्न ॥ १२ ॥
योगु दुर्गंधाची खाणी । तें चि बैसे चंदनी ।
तैचे श्रीगंध चि देखोनी । कांटाळिजे मनें ॥ १३ ॥
दुधें धूतलें इंद्रावण । कासया करावें तपन ।
पुढें फळाचें समर्पण । तैसें आहे ॥ १४ ॥
सुरंग रंगलें काळें । वरी हरित ना पिवळें ।
चित्र नुमटे गेलें । कापड वायां ॥ १५ ॥
यातिदोषें विटाळली । सुगरणी अपाडें सोविळी ।
ते उफराटें विटाळी । तेणें पवित्रपणें ॥ १६ ॥
नाना पातकां प्रसवतें । नाना पातकीं जोडलेते ।
गुण आंगीं आइते । घेऊनियां ॥ १७ ॥

पुण्याचें कीजे आचरण । शिवा सद्गुरूचें भजन ।
तें पापातें चि कारण । आपण होये ॥ १८ ॥
क्रोधाचेनि उन्मेषें । अवलोकितां रूप कैसें ।
मातलें चि तया न दिसे । विहिताविहित ॥ १९ ॥
अहंभावाचा आवेषु । तेणें परिचर्या प्रेमरसु ।
गदळला तो सुरसु । पुडती नव्हे ॥ २० ॥
दंभाचेनि हातें । पूजन कीर्तन रितें ।
देवो तो भक्ता तेथें[1] । वसेचिना ॥ २१ ॥
चाळी माळेचे मणिगण । हृदईं अपार कुटिळपण ।
तें केलें तें हि स्मरण । व्यर्थ होये ॥ २२ ॥
शब्द ते बाण अनिवार । ऐसें वर्माचें उत्तर ।
तयाचें स्मरण निरंतर । नोपेक्षिती गुरु ॥ २३ ॥
ह्मणौनि काम क्रोध सांडावे । मद मछर दंडावें ।
हृदय निर्मळ करावें । आपुलें आधीं ॥ २४ ॥
मग सद्गुरूतें जावें शरण । करावें सत्वगुणें भजन ।
वैराग्यसामग्रीधन । अपार असावें ॥ २५ ॥
वैराग्य ह्मणिजे तें कैसें । चित्त देऊनि परियसें ।
जेणेंविण सिद्धि नसे । निष्ठा साधकाची[2] ॥ २६ ॥
वैराग्यभेदप्रकार । बोलोनि येक चतुर ।
परंतु तेणें आपुलें शरीर । माखों नेदिति ॥ २७ ॥
अजागळस्तन दोहे । ऐसा नरु तो सत्य होये ।
जो वैराग्य बोलोन पाहे । आपणाकडे ॥ २८ ॥
परावे गुण दोष वाखाणी । वैराग्या ठेवी खोडी खावणी ।
तुसधी बोलांची उभवणी । करूं जाणे ॥ २९ ॥

---

१ " देव तो भोक्ता तेथें " श्री. " देवो तो भक्तांचेथें " रा.
२ " साधनाची " श्री. रा. म.

ज्ञानें चि मोडी क्रियातंत्र । वैराग्य ज्ञानें चि समग्र ।
सिद्ध दशेचें उत्तर । ज्ञानें चि संपादी ॥ ३० ॥
ज्ञानें चि खंडी साधन । तत्वांचें जाणे विवरण ।
तेथें असंगतात्मतत्वज्ञान । प्रकट करी ॥ ३१ ॥
ऐसा शाब्दिकु आणि कुशळु । शरीरीं कामु प्रबळु ।
इंद्रियें घालिती गोंदळु । आपुलालां धर्मी ॥ ३२ ॥
त्यागु नाहीं विषयांचा । वेळाइतु परिग्रहाचा ।
सागरु अवगुणरसाचा । निःप्रांतु जो ॥ ३३ ॥
तो योगी ज्ञानी ना विरक्तु । केवळु संसारासक्तु ।
तैसिया विरक्तांची मातु । येथें काइसी ॥ ३४ ॥
नित्य अनित्य जाणावें । कर्म ह्मणिजे तें करावें ।
जाणतां तें सिद्धि पवे । ऐसें कैसेन ॥ ३५ ॥
जाणतां विधुविधान । घडे संध्या स्नान कीं भोजन
मौन धरा ह्मणतां वचन । तें चि बोलावें ॥ ३६ ॥
तैसा पाहिजे योगु । तरी करावा विषयपरित्यागु ।
नसावा परिग्रहसंगु । प्रथमावस्थे ॥ ३७ ॥
संग्रामाचिया वार्ता । संग्रामु नव्हे त्याकरितां ।
तेथें क्रिया धैर्य निपुणता । तिनी पाहिजेती ॥ ३८ ॥

श्रुतिः ॥ एतं वैतमात्मानं विदित्वा ब्राह्मणाः पुत्रै-
षणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च
व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति ॥ छ ॥
न कर्मणा न प्रजया धनेन ॥ छ ॥

यये अर्थी प्रमाण । ऐसें हें वेदाचें वचन ।
परिग्रहपरित्यागेंवांचून । योगु न सधे ॥ ३९ ॥
जालियां शुद्ध आत्मज्ञान । वैराग्ययोगेंकरून ।
तन्निष्ठ करूनि मन । नित्य असावें ॥ ४० ॥
जाला हि आत्मसाक्षात्कारु । अयोगी अविरक्तु नरु
तया पडे अंधकारु । हृदयाचां ठाइं ॥ ४१ ॥

योग नाशले ते येणें चि । ज्ञान फळे अवैराग्यें चि ।
समाधी बुडे दशेची । मातु काइसी ॥ ४२ ॥
स्वहित आपुलें तें नाहीं । जन मोहूनि काज काई ।
पांडुरोगियाचां देहीं । वातपुष्टी[1] जैसी ॥ ४३ ॥
अनादि जीऊ संसारी । कव्हणाचा मित्रु ना वैरी ।
शुभें अशुभें कर्मे करीं । पावे शरीरें ॥ ४४ ॥
मग शरीराचेनि संगें । स्वजन परजन लागे ।
ममत्व उठी वाउगें । तें चि बंधन ॥ ४५ ॥
येकला जातां येतां । केलीं कर्मे तीं भोगितां ।
संसारबंधन ममता । मध्यें ते कैसी ॥ ४६ ॥

श्रुतिः ॥ आत्मैवेदमग्र आसीत् । एक एव सोऽकामयत ।
जाया स्यादथ प्रजायेयाथ वित्तं मे स्यादथ कर्म कुर्वीयेति ॥

उपजतां आपणु येकला चि । शरीर तें भोगार्थ मात्र चि ।
केली क्रिया पूर्वी चि । सारावी ते ॥ ४७ ॥
तेथें कामु येकु वैरी । पुरुषा उपजे शरीरीं ।
स्त्रीची वासना करी । तेणें पुरुषु ॥ ४८ ॥
कंडु उपजे शरीरा । तो अपेक्षी वैश्वानरा ।
कांडोळूं लागे खरखरां । मर्कटापरी ॥ ४९
शंकाते उठोनि जाये । इतरा लाभातें न पाहे ।
उभा चि रक्के नाहे । ऐसें असतां ॥ ५० ॥
सुख चि मानी शरीरीं । तें चि साहे तें चि करी ।
तो संतोषु भोगावरी । मानी जैसा ॥ ५१ ॥
तैसा कामें भूतला[2] । जायेतें अपेक्षिता जाला ।
अनावरु प्रवर्तला । मनोधर्मु तयाचा ॥ ५२ ॥
विवेकीं अधिकारु नाथी । असिला तें न बैसे चित्तीं ।
बैसला तो कामाप्रती । किंकरु होये ॥ ५३ ॥

---

१ " धातुपुष्टी " रा. २ " भुलला " भ.

शरीरीं ग्रहो संचरे । मग तया विवेकु जो स्फुरे ।
तो तदनुसारु चि वा रे । शिष्यशिरोमणी ॥ ५४ ॥
आश्रमधर्मावांचून । न घडे वैदिक धर्म साधन ।
मोक्षाचे उपाय साधारण । वांचूनि तेणें ॥ ५५ ॥
ऐसा चि स्फुरे तैं विचारु । ना तरी पशु ऐसा तो नरु ।
उपाऊ न चले प्रकारु । मग दारा मेळवी ॥ ५६ ॥
परम लाभु अंतःकरणीं । ते चि कृतकृत्यता मानी ।
मग तया आइणी । पुरवितां कामाची ॥ ५७ ॥
देखोनि जनाची रंजना । उपजे पुत्राची वासना ।
विश्रांती न वटे मना । आश्रमीं तयां ॥ ५८ ॥
येकी वासना आपुली । शरीरीं होती पहिली ।
आतां दुसरी हि लागली । स्त्रीची पुरवणें ॥ ५९ ॥
सुखाचें न वटे अन्न । आश्रमु निद्रा जीवन ।
निरंतर लागलें ध्यान । बाळकाचें ॥ ६० ॥
तीर्थें दानें तपें व्रतें । पुत्रार्थ करिती सुकृतें ।
देवदेवाळयें बहुतें । तीर्थें न्हाती ॥ ६१ ॥
ऐसी करितां सोसणी । कन्या जाली निदानीं ।
तथापि तयांचे मनीं । विश्रांती न वटे ॥ ६२ ॥
पुत्रेंवीण आपुला । संसारु वाया गेला ।
ह्मणती दुःखाचा जाला । आश्रमु हा ॥ ६३ ॥
आशेचां सागरीं वाहातां । मानसपर्वत उलंघितां ।
पुत्रु जाला अवचितां । तया दोघांतें ॥ ६४ ॥
वदन पुत्राचें देखोनि । कृतकृत्यता मानिती मनीं ।
परमानंदु अंतःकरणीं । पूर्णु जाला ॥ ६५ ॥

---

१ या चरणाऐवजीं "वर्तूं लागला" असा चरण म. प्रतींत आहे.
२ "कर्म" म. ३ "मनीं" म.

म. ग्रं. सं. ग्रंथ, ग्रंथालयाचा ग्रंथक्र.
ग्रं. क ........ क्र. नि ........
वि. ........ क. ........



थोरें स्नेहें वाढविती । देखोनि क्रीडाप्रवृत्ति ।
हर्षवंतें होती । दोघे हि जणें ॥ ६६ ॥
मुखींचा ग्रासु काढूनि । घालिती त्याचां वदनीं ।
प्राणातें वोवाळिती प्राणी । आशावंते ॥ ६७ ॥
आतां हो कैं वाढेल । कैं आश्रमा योग्य होईल ।
आपुलें आपण चालवील । आश्रमादिक हें ॥ ६८ ॥
ऐसें क्रमितां अपार । दिन भरले संवछर ।
उपनयनाचा विचार । करिती जाली ॥ ६९ ॥
उपनयनाची पाठीं जाण । आव्ययवधानेंकरून ।
कन्या येकाची पाहोन । विवाहो केला ॥ ७० ॥
परिग्रहो जाला अपारु । आतां पाळणाचा विचारु ।
तो अर्थसाध्यु समग्रु । ऐसें असतां ॥ ७१ ॥
इछा उपजली वित्ताची । कल्पना अर्थसाधनाची ।
अर्थी चि प्रीति समस्तांची । ऐसें जालें ॥ ७२ ॥
स्त्रीवासना आपुली चि । पुत्रवासना ते दोघांची ।
अर्थवासना सकळांची । ऐसें जालें ॥ ७३ ॥
अर्थाचां ठाईं आसक्तें । पोषैती वासनावंतें ।
अवघीं चि कर्मीं ययातें । प्रेरितीं जालीं ॥ ७४ ॥
स्त्री बोले अवधारा । तुह्मीं जावें देशाउरां[1] ।
दिवसां दों चौंचा चारा । जंवं असे घरीं ॥ ७५ ॥
पुत्र बोले उपाऊ । करावा कांहीं व्यवसाऊ ।
टाकावा येकाध्रा ठाऊ । उद्यमाचा ॥ ७६ ॥
दिवसु उगवतां चि पुरे । कडकडां खातीं कुमरें ।
शंकूं लागले सोयरे । इष्टमित्र ॥ ७७ ॥
घरची बोलती कठिण । न वटे तें सुखाचें अन्न ।
मग मुहूर्तमात्र पाहोन । बाहेरीं चि पाळिती ॥ ७८ ॥

---

१ "पोरसें तीं" श्री. रा. २ देशावरी.

जे वेळीं[1] तो बाहेरीं पडला। ते वेळीं[1] समस्तां संतोषु जाला।
मग तो विदेशा चालिला। येकटु चि ॥ ७९ ॥
आंगीं साहे शीत उष्ण। मारी निद्रा भूक ताहन।
केवळ भूमीवरी शयन। करूं प्रवर्तला ॥ ८० ॥
ऐसा तो मार्गु क्रमूनि। पावला येके स्थानीं।
मग अर्थप्राप्तीलागूनि। करी क्रिया ॥ ८१ ॥
वेदांशास्त्रांचा विकरा। पंडितपणें तो पसारा।
तेथें तया वाग्व्यापारा। उसंतु चि नसे ॥ ८२ ॥
बहुतांचे हरिले मान। वादें प्रतिवादें करून।
वृत्तीचें केलें खंडण। बहुतांचियें ॥ ८३ ॥
विद्येचेनि अपूर्णपणें। आंगबळेंसीं उठणें।
वर्म कर्म बोलणें। तें तयावरी ॥ ८४ ॥
विद्याबळें वादबळें। शरीरबळें कौटिल्यबळें।
जेणें आंगें द्रव्य मिळे। हरे परावें ॥ ८५ ॥
तें तें कर्म करितां। पापराशी जालिया अगणिता।
परंतु संपूर्णा अर्था। पुरुषु न पवे चि ॥ ८६ ॥
मग तो जाला व्यापारी। नीच सेवा हि अंगिकारी।
घातपात परोपरी। कल्पी परावे ॥ ८७ ॥
नाथिलें चि भय दावी। यापरी येकें दुभवी।
लांच रोकडा पालवी। क्रियेचा उधारु ॥ ८८ ॥
स्वामीद्रव्य चोरणें। तो विधु चि ऐसें माने।
परावया शब्दें हाणे। हरी सर्वस्व ॥ ८९ ॥
अपार द्रव्य जोडिलें। तें दंडाखंडावरी गेलें।
पाप अपार सांचलें। आपुलें तें चि ॥ ९० ॥
सेवा करितां येयापरी। येकु वेळ आलें जीवावरी।
परंतु तें [2] पैका पदरीं। बांधिजेतें नाहीं ॥ ९१ ॥

---

१ "व्हेळीं" श्री. रा. २ "तिपैकीं" श्री. "तेपैकीं" रा.

मग ते वृत्ति सोडून । उद्दिमावरी घातलें मन ।
क्रय विक्रय जाण । प्रवर्तला करूं ॥ ९२ ॥
सत्य वचन विसरला । स्नानसंध्यें उबगला ।
उगा चि करी गुरळा । पान खाये ॥ ९३ ॥
नीच संगु निरंतरु । नीचत्व पावला तो[1] नरु ।
कुडा वांकुडा वाग्व्यापारु । तो चि प्रवर्तला ॥ ९४ ॥
करूं नये तें करितां । करावें तें न करितां ।
पापराशी अनंता । संचित जालें ॥ ९५ ॥
तेणें अर्थु न मिळे । मग चोरीवरी मन घातलें ।
येणें प्रकारें केलें । नाना कर्म ॥ ९६ ॥
दिवस लागले विदेशीं । मग स्मरोनि स्त्रीपुत्रांसी[2] ।
जावें ऐसा मानसीं । निर्धारु केला ॥ ९७ ॥
वेगें द्रव्यांशु येकवटिला । मग तो पालवीं[3] बांधिला ।
सत्वरु स्वार जाला । आला स्वग्रामा ॥ ९८ ॥
देखोनि तया लागोनि । आनंदु केला स्वजनीं ।
ययातें हि अंतःकरणीं । जाला संतोषु ॥ ९९ ॥
सात पांच दिवस क्रमले । भेटीचें आरत गेलें ।
उपसर्ग सोडूं लागले । पुत्रादिक ॥ १०० ॥
अवघीं च ह्मणती जावें । स्त्री ह्मणे मुहूर्त पाहावें ।
हैवरें[4] नक्षत्र बरवें । आजी चि असे ॥ १ ॥
ऐसा नानाप्रकारीं । गृहस्थु घातला बाहेरी ।
तो मार्ते गमे तस्करीं । जैसा नागविला ॥ २ ॥
सर्वस्व तयाचें हरिलें । प्राणेंसीं शरीर सोडिलें ।
स्वजनीं ऐसें केलें । परी तो नेणे ॥ ३ ॥

---

१ "तेणें" श्री. रा. २ "परिग्रहासी" श्री. रा. ३ पदरांत. ४ हयवर. अश्विनी नक्षत्र तर नव्हे? ५ "मागुता" रा.

ना कीं संसारु सरिकतीचा । द्रव्यविभागु सकळांचा ।
पापवांटा ययाचा । तो यातें दिधला ॥ ४ ॥
येणें पाप चि करावें । मग तें येकलेनि च भोगावें ।
द्रव्य तें तया द्यावें । ऐसा वांटा ॥ ५ ॥
तो आपुलिया वासना । बळिकटु बांधला सुटेना ।
दुःख भोगी तें[1] नाना[2] । सुख चि मानी ॥ ६ ॥
यापरी देशांतराप्रति जाये । ते चि क्रिया करिता होये ।
तैसा चि मागुता स्वाश्रमा ये । जाय पुडती ॥ ७ ॥
वावडी उडे अंबरीं । सूत्र तें धारकाचां करीं ।
तैसा वासना ठेऊनि घरीं । तयांप्रति[3] ॥ ८ ॥
पुरुषु विदेशा जाये । वासनाबधें[4] पुडती ये ।
ऐसियापरी तारुण्य जाये । पावे वार्धक्य ॥ ९ ॥
जाणें येणें तें खुंटलें । तंवं पुत्र प्रबुद्ध जाले ।
तेहीं आपुलें आवरिलें । व्यवहारिक ॥ ११० ॥
बाह्य सामर्थ्य पुत्राचें । आश्रमीं सर्व सुनेचें ।
वचन मातापित्याचें । तें चालेचिना ॥ ११ ॥
दिवसेंदिवसु उदासीन । बोलती बोल कठीण ।
कोठें जावें निघोन । शरीरें क्षीणें ॥ १२ ॥
नित्य कलहो भांडण । मग तीं न घालिती अन्न ।
एवं आश्रमाबाहेरी लोटून । घातलीं दोघें ॥ १३ ॥
येक येकां न फुटती । मग तीं विदेशा जाती ।
भिक्षावृत्ति कंठिती । कष्टी काळु ॥ १४ ॥
स्त्रीतें आलें मरण । केलें तिणें प्रयाण ।
मागें जिणें कठीण । तया पुरुषाचें ॥ १५ ॥

---

१ "भोगी तें" ऐवजीं "भोगितां" रा. २ "मना" श्री. ३ "जाये पुडती" म ४ "बद्ध" रा. ५ "क्षये" श्री.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं.



काळु क्रमितां कष्टीं । रोगसमूह देहीं उठी ।
जनातें न पाहावे दृष्टीं । ऐसें जालें ॥ १६ ॥
मग ग्रामाबाहेरी घातला । अरण्यामाजी पडला ।
श्वानीं जंबुकीं तोडिला । जीतु चि तो ॥ १७ ॥
शरीर सोडून जातां । येकला पूर्वीं जैसा होता ।
तैसा चि जीऊ मागुता । उरला देहीं ॥ १८ ॥
जन्मोनि तेणें काय केलें । पाहिजे कीं तें विचारिलें ।
ययातें परावें आपुलें । तें पैं कवण ॥ १९ ॥
मरणावस्था जंवं पावें । तंवं परिग्रहाचें चि बरवें ।
दास्यत्व केलें आघवें । शरीरें अर्थें ॥ १२० ॥
माझी माझी ह्मणोन । केलें भाव[1] समर्पण ।
आतां ययाचें कवण । तें चि विचारितां ॥ २१ ॥
सात वरुषें वाढविली । ते कन्या नव्हे आपुली ।
दानीं जया समर्पिली । तयाची होये ॥ २२ ॥
तीवरी न चले सत्ता । आश्रमा तिचिया जातां ।
लोकां निंद्य समस्ता । वैरी होइजे ॥ २३ ॥
आतां ते पुत्र आपुले । ऐसें होतें मानिलें ।
तंव कन्येहूनि परतले । हे चि वैरी ॥ २४ ॥
कन्या देइजे येकातें । सामर्थ्य न चले आपुलें तेथें ।
पुत्रु वाढऊनि येकीतें । तैसा चि दीजे ॥ २५ ॥
तो तियेचे हातीचा । आपणु नव्हे दोघांचा ।
व्यर्थ चाळा ममतेचा । प्राणियासी ॥ २६ ॥
कन्या येकातें दिधली । तरि ते चि नव्हे आपुली ।
येके शरीरें गेली । परावेया गृहा ॥ २७ ॥
पुत्रु येकीतें दिधला । तो घर चि घेऊनि गेला ।
तिये आधीनु जाला । आपुला नव्हे ॥ २८ ॥

1 "भावें" रा.

विद्या हरिली हृदयींची । वित्त सामग्री अघवी चि ।
गृहादि पदार्थ दिवसा चि । हरिले पुत्रें ॥ २९ ॥
काजा नयेसें करून । दिधलें शरीर सोडून ।
घराबाहेरी घालून । सर्व हरिलें ॥ १३० ॥
तो पुत्रु कैसा आपुला । आतां स्त्री मानावी गा प्रेमला ।
तरी तिचेनि संगें लागला । येषणा परिग्रहो ॥ ३१ ॥
स्त्रीकरितां आश्रमु । लोक लौकिकु धर्माधर्मु ।
कन्यापुत्राचा आगमु । वनितेकरितां ॥ ३२ ॥
सकळा अनर्थांचें कारण । ते स्त्री चि मूळ जाण ।
बीजापासाव अपारपण । झाडाचें जैसें ॥ ३३ ॥
निर्वाणीं ते काय जाली । ठकूनि केउती गेली ।
जयाचा पाठीं बैसली । तयाची चि होये ॥ ३४ ॥
ऐसे किती पुरुष मोहिले । स्वहिता वैरी केले ।
तयांचिया न मिळे । आपण कर्मा ॥ ३५ ॥
विषयो ऐसा दाखवी । आंगाचा मोहो लावी ।
शब्दीं पुरुषातें गोंवी । करी आसक्त ॥ ३६ ॥
प्रथम तोडी स्वजनातें । क्रियेवरी घाली पुरुषातें ।
आचरवूनि पापातें । सांडी निर्वाणीं ॥ ३७ ॥
शरीर आपुलें मानावें । तरी तें सर्वथा नव्हे ।
बहुतांचें हें स्वभावें । होय ह्मणौनि ॥ ३८ ॥
शुक्ला रक्ताचें रचिलें । ह्मणौनि मातापितरांचें जालें ।
तंव आणिकांचें देखिलें । तेथ सामर्थ्य ॥ ३९ ॥
परिग्रहाची उपासना । करितां श्रमु वाहे नाना ।
आधीनु वर्ते आधीना । तें तयांचा होये ॥ १४० ॥
काळाचें होय ह्मणौन । काळीं पावे मरण ।
आलियां निवारण । तयाचें नव्हे ॥ ४१ ॥

---

१ ईषणा, इच्छा, वासना.

जंबुकीं भक्षिला स्वभावें । देहो तयाचा कैसा नव्हे ।
पांचभौतिकु अनुभवें । तें तयां पांचांचा ॥ ४२ ॥
प्रारब्ध कर्माचें समग्र । तरि प्रारब्धाचें चि तें साचार ।
परंतु नाना प्रकारीं शरीर । आपुलें नव्हे ॥ ४३ ॥
शरीरसंबंधें केलें । तें पापपुण्य चि आपुलें ।
पुढें मरणा राहिलें । उभें ह्मणौनि ॥ ४४ ॥
एवं आपणु आपुला निर्वाणीं । सखा ना मित्रु कव्हणी ।
आपण करी ते करणी । भोगी जीउ ॥ ४५ ॥
संसार नामें हें सांत । नाना वर्णाचे जन येथ ।
मीनले ते पावत । तयां अंगसंगातें ॥ ४६ ॥
नाना विद्यांचा पसारा । करिती आयुष्याचा विकरा ।
संचितार्थी अपारा । भरिती क्रियमाणातें ॥ ४७ ॥
आले तैसे चि गेले । आपुलालिया वाटा लागले ।
जीव स्वभावें वेगळे । येकट जातां येतां ॥ ४८ ॥
येथ विरक्तातें चि फावलें । योगु केणें[1] सांपडलें ।
अविरक्त नागवले । गेले सर्वस्वें ॥ ४९ ॥
ममता धरूनि पुत्रांची । द्रव्या आश्रमा स्त्रीची ।
बिगारी करितां तयांची । कैसें जाले ॥ १५० ॥
आयुष्य गेलें वोसरोनि । केली ते खोटी करणी ।
अरिष्टाची भरणी । ते चि भरली ॥ ५१ ॥
येकें आपणें चि भोगावें । कव्हणी स्वजन साह्य नव्हे ।
अमोलिक वय आघवें । गेलें व्यर्थ ॥ ५२ ॥
हा हा ह्मणे काय जालें । स्वजनतस्करीं नागविलें ।
ग्रंथी सोडूनि वय नेलें । सर्वस्व धन ॥ ५३ ॥
पालवीं बांधिलें पाप । ते विंचू किं काळसर्प ।
मातें जीर्ण दुःखरूप । माझें केलें ॥ ५४ ॥

---

1 पदार्थ, जिन्नस.

आतां तीं केउतीं पाहावीं । कवणाप्रति धरूनि न्यावीं ।
व्यवस्था ते सांगावी । प्रति कवणा ॥ ५५ ॥
ऐसें ते येक ठकले । तंव येरीकडे कैसें वर्तलें ।
व्यवहारे होते उतरलें । संसारसांते ॥ ५६ ॥
येक विरक्त तापसी । अपार वित्त तयापासीं ।
माणिका मोतियांचिया रासी । ऐसी क्रिया ॥ ५७ ॥
चहूं आश्रमाचे लोक । विहितें स्वहिताचे साधक ।
योगी सन्यासी येक । धनिक मोठे ॥ ५८ ॥
येकां सुवर्णाचा पसारा । साधा चि करिती विकरा ।
वय देऊनि मंत्र सारा । भरिलें जेहीं ॥ ५९ ॥
तयांतें पूर्वीं चि सव चोर । लागले होते अपार ।
काम क्रोध मद मछर । तस्कर ते ॥ १६० ॥
तेहीं येऊनि घाला घातलें । दिवसां चि सर्वस्व नेलें ।
घायें पाथर केलें । सज्जना तयां ॥ ६१ ॥
गर्वें हाणितलें मानेवरी । मग ते जाली स्तंभापरी ।
मोकळे चहुं पदरीं । वित्त गेलें ॥ ६२ ॥
हृदय भेदिलें क्रोधें । वदन तेणें अनुस्पंदे ।
नयन दोन्हीं तेणें खेदें । मोकळिती धारा ॥ ६३ ॥
चटपटिती कर चरण । आरक्त जालें वदन ।
सन्निपाताचें लक्षण । प्रवर्ततें जालें ॥ ६४ ॥
गेलियाचें दुःख नाहीं । व्यथा चि भोगितां देहीं ।
येकातें श्रवणीं दोहीं । पडली टाळी ॥ ६५ ॥
अभिमानें मस्तकीं हालें । ते अंध मूक बधिर जालें ।
तेणें आप परावें विसरले । पडले मूर्छित ॥ ६६ ॥
कामें हालें शरीरा । ते विकळ गेले गा कुमरा ।
आली तया विषम निद्रा । भोगिती स्वप्नें ॥ ६७ ॥

१ " सुवर्ण चि " श्री.रा. २ "साधु" म. ३ " मस्तक " रा. म.

येक ठेऊनि विसरले । जडत्वें अज्ञानें मातले ।
आलस्यें भ्रांत केले । उमजु नेघती ॥ ६८ ॥
ऐसें संसारसांते आले । ते अवघे चि नागवले ।
सर्वांप्रकारीं ठकले । उपचारतीचिना ॥ ६९ ॥
उद्यमु अपारु पाहिजे तैसा । परि चोरामैंदांचा वळसा ।
लाभु थोडा पुरुषा । हानी बहुसाळ ॥ १७० ॥
आपुलीं न्यायें वैरियें । मानावीं ऐसें येथ आहे ।
परंतु न कळे करणें काये । पामरांतें ॥ ॥ ७१ ॥
पंथीं चालतियां पांथा । संगती जाली असतां ।
आपुलालिया वित्ता । कव्हणी वांटी ॥ ७२ ॥
येके गांवीं राहिले पांथ । ते स्वतंत्र आपुलाले समस्त ।
येकयेकां जनक सुत । कांहीं होतीं ॥ ७३ ॥
पाहतां चि ते समस्त । आश्रयिती आपुलाले पंथ ।
तेथें वियोग दुःख अत्यंत । तें कवणाचें कवणा ॥ ७४ ॥
यात्रा भरोनि वोसरली । पुरीं पुराडे भेटलीं ।
संयोगु वियोगु पावलीं । तेणें न्यायें ॥ ७५ ॥
रुणानुबंधाचीं सोयरीं । मीनलीं असतां येके घरीं ।
प्राचीन तें प्रतिशरीरीं । वेगळें तयांचें ॥ ७६ ॥
प्रारब्धास्तव योगु घडे । प्रारब्धक्षयें वियोगु पुढें ।
कर्में भ्रमण चहूंकडे । ययापरी जीवां ॥ ७७ ॥
पवनें हालती शुष्क पर्णें । तवी चेष्टती पराधीनें ।
योगु वियोगु तेणें गुणें । पावती तीं ॥ ७८ ॥
तैसें अविद्यागुणकार्यवन । जीव भ्रमती कर्माधीन ।
योगु वियोगु अनुभऊन । पुडती जैसे तैसे ॥ ७९ ॥
कवण मातापितर कवणा । कन्या पुत्र हे विकल्पना ।
कांहीं संमंधु चि असेना । परस्परां जीवांतें ॥ १८० ॥

१ " नायें " श्री. रा. २ ग्रामीं " श्री. म.

ऐसें असोनि वर्तमान । जीवातें आपुलें पूर्वाज्ञान ।
तें ममत्वें चि तेणें करून । बद्ध जाले ॥ ८१ ॥
कर्मास्तव शरीरधारण । सर्वथा तें नव्हे आपण ।
अव्यक्ता जीवा अवलंबन । व्यक्तीचें जें ॥ ८२ ॥
तें चि आत्मत्वें मानून । परस्परा संग करून ।
जीव परम अज्ञान । ते काय करिती ॥ ८३ ॥
काम क्रोध वाढविती । मद मछर अवलंबिती ।
शोक मोह आश्रयती । वियोगयोगें ॥ ८४ ॥
आ[1]शा तृष्णा कामना । प्रपंचु भोगवासना ।
प्रतिकूळ जे गुण नाना । संकल्पादिक ॥ ८५ ॥
ते आश्रयूनि बद्ध होती । केलीं कर्में भोगिती ।
ऐसे ते हि सद्गुरूप्रति । शरण येतां ॥ ८६ ॥
आत्मविवेका आश्रयावें । देहाभिमाना सांडावें ।
कामक्रोधें नेदावें । विटाळूं मन ॥ ८७ ॥
मी कवणाचा माझें कवण । करितों हें काय आचरण ।
केवळ हित तें कासेन । माझें असे ॥ ८८ ॥
ऐसें विचारूनि मानसीं । सांडूनि ममते प्रीतीसी ।
[2]पूर्णज्ञानें वैराग्यासीं । काय करावें ॥ ८९ ॥
आपुलां ठाईं अज्ञान । आहे ऐसें जाणून ।
आपुली चि क्रिया आपण । मानावीना ॥ १९० ॥
जा[3]णणें तें अज्ञान कार्य चि । करीन तें नव्हे कांहीं चि ।
ऐसें मानूनि अवघी चि । स्वयुक्ती सांडावी ॥ ९१ ॥
गुरु मानूनि सर्वेश्वरु । सेवावा कृपासागरु ।
वैराग्यें शुद्धसत्वें श्रीसद्गुरु । प्रेमें आराधावा ॥ ९२ ॥

---

१ " निद्रा " श्री. " निद्रा " रा. म. २ " पूर्व " श्री. रा. म.
३ " जाणेन " श्री. " जाणोनि " रा. म.

मग तो प्रसन्न होईल । अधिकारें तत्व उपदेशील ।
वचन येक सांगेल । उपदेशाचें ॥ ९३ ॥
तें चि हृदईं धरितां । तदनुसार चि वर्ततां ।
युक्ति संसारु तरतां । आयासु नाहीं ॥ ९४ ॥
वैराग्य नाहीं शरीरीं । मावेचें भजन करी ।
कामक्रोधाचां सागरीं । बुडोनि गेला ॥ ९५ ॥
तयातें न संगती गुरु । न तरे नरु तो संसारु ।
संगु तयाचा निरंतरु । बाधी सत्यत्वें ॥ ९६ ॥
श्वान सरड जंबुक । तैसे मिनले सकळैक ।
कव्हणाचें कव्हणा सुख । नसे परस्परा ॥ ९७ ॥
येथें सद्गुरूचेनि उपदेशें । भवतम हरावें कैसें ।
कुपथ्य औषधाचिसरिसें । चालतें[2] असतां ॥ ९८ ॥
आतां ययाचेनि भावें । मनुष्य हे कैसे मानावे ।
म्हणसील तरी स्वभावें । सांगिजैल ॥ ९९ ॥
मुखाचां ठाईं मधुरता । सानेपण आणि सर्वथा ।
मागें वर्मघायें हाणतां । तो वृश्चिकु जाणावा ॥ २०० ॥
स्पर्शु करितां चि शब्दाकारें । फडे काढी फुस्कारें ।
मुखा चि वरी उत्तरें । बोले विषाऐसीं ॥ १ ॥
ऐसा जो नित्य क्रोधी नरु । तो कृष्णसर्पु महा थोरु ।
जया नाहीं उतारु । लागलियांवरी ॥ २ ॥
देखोनि चि लागे पाठीं । शब्दाचिसरिसा उठी ।
अपार करी तोंडपिटी । भांडे तो सुणा ॥ ३ ॥
हृदईं पूर्ण अज्ञान । गर्वें तुकी मान ।
तें सरडा तयाचें लक्षण । पुरुषीं वर्ते ॥ ४ ॥

---

१ " न पविजे " श्री. रा. व म. प्रतींत चवथा चरण " आपण आधीं " असा आहे. २ " नाशु पावे " म.

सन्मुखे बालों न शकिजे । खवळला मग नुमजे ।
जया देखोनि भीईजे । समग्रीं जनीं ॥ ५ ॥
ऐसा प्रतापें आगळा । उठोनि ये आंगवळा ।
तो व्याघ्रनरु कल्पिला । येथे संसारीं ॥ ६ ॥
दुर्बळांप्रति दाटुगा । सबळांप्रति जो कोटगा ।
तो जंबुकु मानावा गा । शिष्यशिरोमणी ॥ ७ ॥
अशक्तु आणि कुचरु । जाणावा तो ग्रामसूकरु ।
परावगुणवादी नरु । कुश्चिळु तो ॥ ८ ॥
उगा चि फुगारा देहीं । जयातें न करवे कांहीं ।
मनुष्य नव्हे तो गोही । ऐसा जाणावा ॥ ९ ॥
मनुष्य दिसती वेषें । परंतु गुण जयांचे ऐसे ।
तयांचेनि संगें असे । सर्वस्वें विनाशु ॥ २१० ॥
कायसी तयांची संगति । त्रासोनि गुरु चि पळती ।
आतां तुझी प्रकृति । ते तैसी नव्हे ॥ ११ ॥
तूं विरक्तु आणि सात्विकु । भावें पुसतासि भाविकु ।
तरि सांगिजैल विवेकु । मानसीं धरी ॥ २१२ ॥

ॐमिति दिगंबरानुचरिते गुरुशिष्यसंवादे ग्रंथराजनामग्रंथे । भजनवैराग्यलक्षणंनाम तृतीयं प्रकरणं समाप्तं ॥ ३ ॥

---

## ॥ प्रकरण चवथें ॥

### ॥ श्रीकालाग्निशमनाय नमः ॥

ऐसें बोलोनि सद्गुरुनाथु । तेणें शिष्येसी येकांतु ।
करूनि क्रमें परमार्थु । बोलता जाला ॥ १ ॥
गुरु बोलती शिष्यातें । सकळां वेदांचेनि मतें ।
तत्वार्थनिरोपण तें । जाणावें महावाक्यें ॥ २ ॥

---

१ बलाढ्य. २ कोडगा, निर्लज्ज किंवा दुर्बळ. ३ "प्रेमें" रा.

अद्वैतप्रतिपादक वचन । तें चि महावाक्य जाण खूण ।
तयाचें नित्य अनुचिंतन । करिती यती ॥ ३ ॥
सांडूनि कर्मयोगाचीं साधनें । ब्रह्म जाणावयाकारणें ।
संन्यासी सेविती जाणे । महावाक्यें तीं ॥ ४ ॥
तया महावाक्यामाझारी । येक सांगेन वरवियापरी ।
तें जाणतां येरीं । काज चि नसे ॥ ५ ॥
जलस्थानें अपारें । तयांमाजी येक चि तें पुरें ।
तृषा हरलियावरि चतुरें । कासया भ्रमावें ॥ ६ ॥
येक वाक्य सांगेन । ह्मणसील आतां तें कवण ।
तरी तत्त्वमसि हें वचन । महावाक्य जें ॥ ७ ॥
हा चि घेईं तूं उपदेशु । विचरें सर्वत्र उदासु ।
इतुलेनि हा संसारपाशु । छेदैल तुझा ॥ ८ ॥
वाक्योपदेश घेऊनि । विश्वासु तेथें चि ठेऊनि ।
शिष्यराजु तो मागुतेनि । काय बोलता जाला ॥ ९ ॥
अहो जी देवा सद्गुरु । मातें सांगितला जो मंत्रु ।
काय पां तयाचा निरंतरु । जपु करावा ॥ १० ॥
गुरु बोलती वचन । ऐसें ही येक अज्ञान ।
मंत्राऐसें भाऊन । जपु चि करिती ॥ ११ ॥
ते विवेकहीन परियसें । तुवां न करावें तैसें ।
पदार्थपूर्वक असे । ययाचें ज्ञान ॥ १२ ॥
तत्वमसि वाक्य येक चि । परंतु तीन पदें ययाचीं ।
आइके विवंचना तेथिची । सांगिजैल ते ॥ १३ ॥
तत्पद येक जाण खरें । त्वंपद तें येथें दुसरें ।
असिपद तें तिसरें । आइकें बापा ॥ १४ ॥
वाक्याचीं पदें तीं ऐसीं । आतां तूं अर्थ परियसीं ।
तत्पदें निश्चयेसीं । बोलिजे ब्रह्म ॥ १५ ॥
त्वंपदार्थें जीवात्मा जाण । असिपद उभयालागून ।
येकत्व ऐसें निरूपण । वाक्यार्थें जाणावें ॥ १६ ॥

उपदेशिलें आम्हीं तूतें । तें जाण येणे चि मतें ।
तो चि अभिप्राओ आतां येथें । बोलिजैल ॥ १७ ॥
वेदीं शास्त्रीं उपपादिलें । जगत्कारण संचलें ।
परोक्षवादें आइकिलें । बोलतां जें ॥ १८ ॥
तें तूं होसी केवळ । जीवत्व तुझा ठांई निर्मूळ ।
ययें उपदेशीं निश्चळ । मानस करीं ॥ १९ ॥
हें वचन श्रीगुरूचें । परंतु नव्हे शिष्याचें ।
जपतां वर्म ययाचें । उफराटें पडे ॥ २० ॥
म्हणौनि वाक्य आइकावें । पदार्थपूर्वक स्मरावें ।
तिया चि स्थिति असावें । स्वभावें तुंवां ॥ २१ ॥
आइकोनि इतुलें निरोपण । शिष्यु बोलता जाला वचन ।
देवा पदार्थपूर्वक ज्ञान । घेतां वाक्याचें ॥ २२ ॥
मी ब्रह्म ऐसा सिद्धांतु । मातें उपजला परमार्थु ।
तो शाब्दिकु बोधु अद्वैतु । निर्धारें जी ॥ २३ ॥
तेणें चि निर्धारें असतां । आशंका उपजती अनंता ।
तिया चि मी सद्गुरुनाथा । आतां बोलैन ॥ २४ ॥
ब्रह्म सर्वांचें कारण । विश्व जालें ब्रह्मापासून ।
मी येकदेशी देही ह्मणौन । ब्रह्म कैसा ॥ २५ ॥
ब्रह्म परमात्मा सर्वेश्वरु । सकल सृष्टीतें आधारु ।
मी औट हात साकारु । मनुष्य कीं जी ॥ २६ ॥
ब्रह्म पाळी विश्वातें । आणि माझेनि न रखवे मातें ।
तें ब्रह्म मी मतें । कवणें होईन ॥ २७ ॥
सकळ संहारु सृष्टीचा । हा धर्मु परमात्मयाचा[1] ।
मी आड पडिलीया काडीचा । छेदु न करीं ॥ २८ ॥
ब्रह्म तारी मी तरें । ब्रह्म मारी मी मरें ।
ब्रह्म जिरवी मी जिरें । ब्रह्माचा उदरीं ॥ २९ ॥

---

१ "परब्रह्माचा" श्री.

ब्रह्म परमात्मा वेदकर्ता । मी अज्ञानासक्त[1] संसारभोक्ता ।
यातें तेणेसीं येकात्मता । हें कैसेनि घडे ॥ ३० ॥
ऐसे संदेह नाना । हृदई उपजती कल्पना ।
निष्ठा न वैसे मना । तेणेंकरितां ॥ ३१ ॥
ऐसें परिसोनियां बोलणें । शिष्याचें नेणतेंपणें ।
सद्गुरु तो काय ह्मणे । तये काळीं ॥ ३२ ॥
सांगितलें तूंतें ज्ञान । न पवसी चि तूं तेथिची खूण ।
येणेंचिकरूनि तुझें मन । पावलें आशंकेतें ॥ ३३ ॥
ब्रह्म जें आह्मीं बोलिलें । तें माहामायेहूनि वेगळें ।
तुवां मायायुक्त मानिलें । ह्मणतासी परमात्मा ॥ ३४ ॥
लक्षूनि मायेचे गुण । मग तयाचें कर्तव्य गहन ।
तयाचें करितासि आरोपण । ब्रह्माचां ठाई ॥ ३५ ॥
अविद्येपासाव जो तूं परु । तो नेणोनि आपुला विचारु ।
अविद्यागुण कार्यविकारु । लक्षूनियां ॥ ३६ ॥
येथें करूनि आत्मभावना । वाढवितासि असंभावना ।
ते मिथ्या तुझी कल्पना । कुमरा गा ॥ ३७ ॥
तो तारी मी तरे । तो मारी मी मरे ।
तो नित्यमुक्त मी संसारें । बद्धु निरंतरु ॥ ३८ ॥
ऐसी भावना करितासी । ते औपाधिक परियसी ।
उपाधिरहिता शुद्धासी । भेदु चि नसे ॥ ३९ ॥
घटाकाश मठाकाश । हे भेद जैसे व्योमास ।
उपाधिसंमंधें परियस । परी तात्विक न होती ॥ ४० ॥
अविद्यागुणीं संवेष्टितु । चैतन्य हें घनीभूतु ।
जीउ ऐसें बोलिजतु । तया तत्वातें ॥ ४१ ॥
मायागुणीं शबल जालें । तें ब्रह्म परमात्मा बोलिलें ।
जीवत्व तेणेंसी वेगळें । ऐसें गमे[2] ॥ ४२ ॥

---

१ " अज्ञु अशक्तु " श्री रा. २ " भासे " श्री. रा.

येक चि जैसें सुवर्ण । अलंकारभेदें भिन्न ।
कटक आणि सिंहासन । येणें प्रकारें ॥ ४३ ॥
उपाधिदृष्टि भासे भेदु । निरुपाधिकीं सिद्धु अभेदु ।
तो चि प्रतिपादी वेदु । येणें महावाक्यें ॥ ४४ ॥
उपाधिद्वयाचीं लक्षणें । लक्षूनि तें सत्य मानणें ।
ते चि जीवेश्वर कल्पणें । नित्य संत ॥ ४५ ॥
हें भेदवादियाचें मत । तयातें न मनी वेदांत ।
ययालागीं तें समस्त । विरुद्ध वेदेंसीं ॥ ४६ ॥

श्रुतिः ॥ अयमात्मा ब्रह्म ॥ ७ ॥ सर्वं खल्विदं ब्रह्म ॥ ७ ॥ एक-मेवाद्वितीयं ब्रह्म ॥ ७ ॥ ब्रह्मेदं सर्वं ॥ ७ ॥ अहमस्मि ब्रह्म ब्रह्माहमस्मि ॥ ७ ॥ ब्रह्मविद्ब्रह्मैव भवति ॥ ७ ॥ मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ॥ ७ ॥ तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वंतिके ॥ ७ ॥ यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ॥ ७ ॥

ऐसीं वेदाचीं वचनें । यये अर्थीं प्रमाणें ।
विशेषें विविक्तात्मतत्त्वज्ञान । भेदु मिथ्या ॥ ४७ ॥
वेदप्रतीति आत्मप्रतीति । भेदु मिथ्या गुरुप्रतीति ।
म्हणौनि जाणावयाची युक्ती । वेगळी च ते ॥ ४८ ॥
जालें हि तत्त्वंपदार्थज्ञान । परंतु पूर्वपदद्वयशोधनेंविण ।
असिपदार्थैं ऐक्यज्ञान । प्रतीति न ये ॥ ४९ ॥
हें चि जाणोनि तात्पर्य । वेदांतीं बोलिलें लक्षणत्रय ।
तें चि आतां प्रमेय । सांगेन संक्षेपें ॥ ५० ॥
येक तें जहल्लक्षण । दुसरें अजहल्लक्षण ।
तिसरें जहदजहल्लक्षण । ऐसें लक्षणत्रय हें ॥ ५१ ॥
जहल्लक्षण तें त्यागलक्षण । अत्यागु तें अजहल्लक्षण ।
त्यागात्यागु तें जाण । लक्षण तिसरें ॥ ५२ ॥

जहल्लक्षणें ऐक्य साधितां । न मिळे तें वाक्यार्थी ।
ते चि युक्ति तूं आतां । करीं श्रवण ॥ ५३ ॥
मायोपाधी तो परमात्मा । अविद्योपाधी तो जीवात्मा ।
उपाधिनिरासीं उभयात्मा । मिथ्या चि होये ॥ ५४ ॥
उपाधिद्वयनिरासें । जीवेश्वरभावशून्य ऐसें ।
ब्रह्म चि केवळ असे । ऐसा परमार्थु ॥ ५५ ॥
तेथें असिपदार्थें सर्वथा । उभय ऐक्य न ये साधितां ।
उभयाभाव दर्शन तत्वता । अत्यागेंविण ॥ ५६ ॥
ह्मणौनि तें जहल्लक्षण । वाक्यार्थीं न ये प्रयोजन ।
आतां बोलोनि अजहल्लक्षण । ऐक्य साधूं ॥ ५७ ॥
तरि उपाधिद्वया न निरसणें । जीवेश्वरत्व सत्य मानणें ।
औपाधिकु परि अवलंबणें । भेदु चि घडे ॥ ५८ ॥
ऐक्यसाधनविरोधी । अतएव मत न घडे तें कधीं ।
एवं त्यागात्याग असंबंधी । वाक्यार्थाचे ॥ ५९ ॥
ह्मणौनि जहद्जहल्लक्षण । येणें चि मतें ऐक्यसाधन ।
तें त्यागात्याग प्रकरण । सांगिजैल ॥ ६० ॥
अविद्या बोलिजेत द्विविध । शुद्ध शबल हे तिचे भेद ।
माया ते हि तथाविध । शुद्धशबलभेदें ॥ ६१ ॥
प्रकृतिद्वयाचेनि भेदें । जीवेश्वरत्व हि द्विविध नांदे ।
शुद्ध शबल येणें शब्दें । बोलिजेतें हि ॥ ६२ ॥
शबल तो वाच्यु बोलिजे । शुद्ध तो लक्ष्यु ह्मणिजे ।
तत्वंपदार्थु अवगमिजे । द्विविधु ऐसा ॥ ६३ ॥
वाच्यु जडु वेद्यस्थानीं । लक्ष्यु अजडु त्याचां कारणीं ।
तत्वं पदगतार्थ दोन्ही । ऐसे असतां ॥ ६४ ॥
वाच्यु जडभागु त्वंपदीचा । तैसा चि सांडावा तत्पदीचा
चैतन्यांशु चि तेथीचा । शुद्धु घ्यावा ॥ ६५ ॥

उभय वाच्यांशपरित्यागें । उभय लक्ष्यांशाचेनि योगें ।
जीवा ईश्वरा प्रसंगें । जाणावें ऐक्य ॥ ६६ ॥
एवं स्थूलोपाधिनिरासें । स्वस्वरूप ज्ञानांशें ।
जीवां ईश्वरातें असे । सिद्ध चि येकपण ॥ ६७ ॥
येणें प्रकारें वेदांतीं । ऐक्य तें साधिलें आथि ।
तथापि अनुभवाची युक्ति । वेगळी च ते ॥ ६८ ॥
आतां स्वस्वानुभवेंकरून । जीवेश्वरा अभेदज्ञान ।
आइकें तें मी सांगेन । येणें काळें ॥ ६९ ॥
अविद्या प्रकृति जीवाची । शुद्धता शबलता ती चि ।
सांगेन जैसी तैसी चि । मानसीं धरीं ॥ ७० ॥
वेद्य प्रकृति साभास । जड गुणमयी पुरुषास ।
शबल तें आतां परियस । लक्षण शुद्धेचें ॥ ७१ ॥
चैतन्यरूपी जे प्रकृति । ते शुद्धकळा स्वयंज्योति ।
पुरुषा आपुली ज्ञप्ति । शुद्ध ते तें ॥ ७२ ॥
शबल प्रकृतीसीं युक्तु । शबल पुरुषु तो व्यक्तु ।
देहावस्था गुणसंघातु । तेथीचा भोक्ता ॥ ७३ ॥
देहसंगी अवस्थासंगी । गुणसंगी कर्मसंगी ।
तें चि होऊनि जगीं । व्यवहारे आत्मत्वें ॥ ७४ ॥
शुद्धे प्रकृतीचेनि योगें । ज्ञानरूपु जो निजांगें ।
भान जाणूनि अवघें । आपणु निराळा ॥ ७५ ॥
शबल प्रकृतीसी अंतरंगु । शुद्ध तो साक्षित्वें चि असंगु
अवघा प्रकृतिगुणविभागु । तयाचा ज्ञाता ॥ ७६ ॥
शबल दशेसीं विलक्षणता । जाणावी चि मात्र तत्वता ।
परंतु न कळे[1] शुद्धता । क्रियारूपें निवडणें ॥ ७७ ॥
चैतन्यगुणें जो युक्तु । तो पुरुषु सहज अलिप्तु ।
सकळु दृश्यु गुणसंघातु । तयाचा भोक्ता[2] ॥ ७८ ॥

१ 'न लभे' श्री. २ 'साक्षी' श्री. रा.

सहजें शब्दा हि पूर्वी । शबलांशु तो नलगे जीवीं ।
इतुलेनि शुद्धता अघवी । ते चि सिद्ध ॥ ७९ ॥
सहजें असतां शुद्ध दशा । अभेदु जीवां ईश्वरां अपैसा ।
तो चि प्रसंगु शिष्येशा । आह्मीं निरोपिला ॥ ८० ॥
नेणोनि आपुलें शुद्धपण । शबल दशा मानून ।
मग तें आत्मत्वें अवलंबून । गुणाचिया मतीं ॥ ८१ ॥
ह्मणतासि तें मी नव्हे । हें जाणितलें आह्मीं बरवें ।
तरि तो चि प्रसंगु स्वभावें । करूं पां तुजसीं ॥ ८२ ॥
मी ब्रह्म नव्हे ह्मणतासी । तरी तूं कवणु होसी ।
हे येकी पुसी आह्मासी । स्वयुक्ति सांग पां ॥ ८३ ॥
ऐसें ऐकोनि बोलणें । श्रीगुरुप्रति काळें तेणें ।
शिष्यु स्वानुभवाचीं वचनें । बोलता जाला ॥ ८४ ॥
विवेकयुक्ती बोलतां । प्रतीति न ये तैसी चित्ता ।
यालागूनि मी आतां । येक करीन ॥ ८५ ॥
सांडूनि ज्ञान शाब्दिक । बोलेन प्रतीतिपूर्वक ।
तंव गुरु म्हणती आईक । ऐसें चि पाहिजे ॥ ८६ ॥
अनुभउ ऐसें अभिधान । तें प्रतीतीचें चि असे जाण ।
येर तें श्रवणज्ञान । शाब्दिक सर्व ॥ ८७ ॥
वैद्यें नाडिका पाहिली । रोगाची परीक्षा केली ।
परंतु प्रतीति आपुली । तेथें अनारिसी ॥ ८८ ॥
प्रतिज्ञेसीं देईजे मात्रा । आणि ते गुण नेदी शरीरा ।
तैं औषधीचा पसारा । तो काय करावा ॥ ८९ ॥
म्हणोनि प्रतीति असैल । तितुलें चि बोलणें बोल ।
येर सांडीं विवेकजाल । शाब्दिक जें ॥ ९० ॥
ऐसें ऐकोनि निरोपण । शिष्यु बोलता जाला वचन ।
देवा तरी माझें मन । निर्धारेंसीं ॥ ९१ ॥

दृश्य देह जें साकार । जें करी सकळ व्यापार ।
तें चि मी निरंतर । ऐसें भावीं ॥ ९२ ॥
गुरु बोलती निर्धारें । तूं स्थूळ शरीर हें खरें ।
तरि साक्षित्व ययाचें स्फुरे । तें चि कवणा ॥ ९३ ॥
मी देहो ऐसें ज्ञान । देहातें न वर्ते जाण ।
अनुभवितां निद्रा मरण । देह कैसें ॥ ९४ ॥
अस्थिमांसत्वचामय । स्थूळ देह जड ज्ञेय ।
षड्भाव विकारी कार्य । कर्मज हें ॥ ९५ ॥
काष्ठवत पडे क्षितीं । नाहीं आपुली ययातें स्फूर्ति ।
होतां बाधा प्रतीति । दुःखाची नव्हे ॥ ९६ ॥
आतां दृश्य देह तूं तत्वता । कीं यया जडाचा जाणता ।
जागृती देह प्रकाशिता । विलक्षणु जो ॥ ९७ ॥
शिष्यु बोले वचन । यया जडवर्गाचें जया ज्ञान ।
चैतन्यरूप तो मी आपण । जो वागवी शरीरा ॥ ९८ ॥
गुरु बोलती वचन । यया स्थूळदेहाचें ज्ञान ।
चेष्टा आणि स्फुरण । वर्ते लिंगशरीरीं ॥ ९९ ॥
जेणें लिंगशरीरेंवांचून । यया स्थूळातें ये मरण ।
निद्राकाळीं देह सांडून । लिंगदेह जाये ॥ १०० ॥
भोगी अवस्था स्वप्नाची । ते व्यवस्था स्थूळ नेणे चि ।
आश्रयि ते व्यक्ती ययाची । तें हें उठे ॥ १ ॥
म्हणौनि निद्रिता उठवी । उठलियातें जागवी ।
जागतयातें लावी । नाना व्यापार ॥ २ ॥
ऐसें लिंगशरीर येक । विचारितां तत्वात्मक ।
या स्थूळातें प्रकाशक । सर्वसेन ॥ ३ ॥
तें चि मी ऐसें वचन । सर्वथा तुझें अप्रमाण ।
जया विलक्षण तत्वाचें ज्ञान । तो तूं आत्मा ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ...

तत्वांची विलक्षणता । तें त्रिपुटीरूप विचारितां ।
कार्य कारण कर्ता । येणें आकारें ॥ ५ ॥
विषयपंचक ज्ञेय । लिंगीं तें वासनामय ।
दृश्यरूप तमोकार्य । ऐसें मानावें ॥ ६ ॥
चेष्टा ज्ञान कर्माकारें । त्रिविधकरण जें स्फुरे ।
तत्वें पंधरा चतुरें । जाणावीं तीं ॥ ७ ॥
करण तें रजोगुणें । आतां कर्ते ज्ञाते सत्वगुणें ।
तें सांगिजैल प्रकारें येणें । श्रवण करीं ॥ ८ ॥
अंतःकरणादि वृत्तिविकारु । तत्वां पांचांचा प्रकारु ।
तो सत्वगुणें अहंकारु । बोलिजे कर्ता ॥ ९ ॥
येक चि अहंकरण । गुणभेदें त्रिविध भिन्न ।
तत्वें पंचेवीस तयापासून । उपजतीं जालीं ॥ ११० ॥
तया विलक्षणांचा तूं साक्षी । आत्मत्वें तीं न लक्षी ।
सांगिजैल तें परियसीं । युक्ति बापा ॥ ११ ॥
विषयपंचकाचा तूं ज्ञाता । आश्रयो आणि भोक्ता ।
तें पंचक चि तूं तत्वता । ऐसें न घडे ॥ १२ ॥
तूं जाणता शब्दातें । स्पर्शरूपरसगंधातें ।
विषय जड ते तूंतें । जाणती च ना ॥ १३ ॥
तूं वाचा कीं तूं वक्ता । कर तूं कीं घेता देता ।
पादचालणें कीं चालता । आश्रयो तूं ॥ १४ ॥
पायु ना ते शिश्न । यया करणाचें तूंतें ज्ञान ।
एवं साक्षित्वें चि कर्म करण । अपर जाण पां ॥ १५ ॥
तूं श्रोत्र कीं तूं श्रोता । श्रवणधर्मातें तूं जाणता ।
त्वचा कीं स्पर्शज्ञु तत्वता । साक्षीस्वरूपा ॥ १६ ॥
नयनु तूं कीं रूपद्रष्टा । जाणसी नेत्रांची प्रतिष्ठा ।
दृश्या अनिष्टा इष्टा । जाणता जो ॥ १७ ॥
रसना तूं कीं रसज्ञु । नव्हसी गंधु तेवीं चि घ्राणु ।
ज्ञानकरणाचा जो जाणु । तो तें चि कैसा ॥ १८ ॥

रूपधर्म परिछिन्न । पंचविध ज्ञानकरण ।
आनाचा धर्मु आन । संपादूं न सके ॥ १९ ॥
श्रोत्रु नेणे रूपातें । नेत्रु रूपेंविण पदार्थातें ।
त्वचा सीतोष्ण चि येकातें । आपण जाणे ॥ १२० ॥
रसने शब्दु न कळे । घ्राणरंध्र तें आंधळें ।
तया समस्तांचा कळे । तूंतें चि धर्मु ॥ २१ ॥
ज्ञानकरण तूं होतासी । तरी सकळ धर्म नेणतासी ।
आणि पंचविधत्व येकासी । ऐसें न घडे ॥ २२ ॥
आतां तूं म्हणसी मी प्राणु । तरि तूं येकु तो पंचधा भिन्नु ।
धर्मु तया विलक्षणु । प्राणा आपुलाला ॥ २३ ॥
विलक्षण भेद साक्षित्वें । वेगळा जो ज्ञानमयु आत्मत्वें ।
तो तूं कवणु कर्तृत्वें । संस्फुरता जो ॥ २४ ॥
केवळ कर्तृत्व स्फुरण । तें हि पंचविध भेदें भिन्न ।
अहंकारु बुद्धि चित्त मन । अंतःकरण पांचवें ॥ २५ ॥
आपुलिया अहंकाराची । प्रवृत्ति निवृत्ति जाणता तूं चि ।
अनुसंधानवृत्ति चित्ताची । तिचा साक्षी ॥ २६ ॥
बुद्धीचें निर्धारात्मक स्फुरण । तयाचें तूंतें चि प्रवर्ते ज्ञान
संकल्पात्मक हें माझें मन । म्हणौनि जाणसी ॥ २७ ॥
निर्विकल्प विषयस्फुरण । तूं जाणतासि तें अंतःकरण ।
वृत्तिमात्राचें हि परिज्ञान । तें केवळ तूंतें ॥ २८ ॥
तत्वभेदें विलक्षण । गुणधर्म परिछिन्न ।
वृत्तिरूप कार्यानुसंधान । स्फुरण तुजपासाव ॥ २९ ॥
ऐसें लिंग शरीर तत्वता । तूं आश्रयो तयातें जाणता ।
याचेनि आंगें स्वप्नावस्था । ते तूंतें चि स्फुरे ॥ १३० ॥
माझें म्हणतासि अंतःकरण । बुद्धि चित्त अहंकारु मन ।
घ्राण श्रवण नयन । कर चरण हीं ॥ ३१ ॥
ययाचेनि धर्मत्यागें । जाण तूं आपणातें आंगें ।
कवणु कैसा हें प्रसंगें । प्रकट करीं ॥ ३२ ॥

ऐसें गुरु अनुवादले । तंव शिष्यें विचारिलें ।
स्फुरणत्यागें आपुलें । स्वरूप तें कैसें ॥ ३३ ॥
जें स्फुरण तें विषयोन्मुख । तेणें न प्रकाशे स्वसंवेदक ।
तत्त्यागें अवेदक । तें केवळ विस्मरण ॥ ३४ ॥
विस्मरणें आपणां जाणावें । ऐसें सर्वथा न संभवे ।
एवं मी मातें नेणवे । जाणो प्रवर्ततां ॥ ३५ ॥
इतुलें मानसीं धरूनि । शिष्यु बोलता जाला वाणी ।
देवा मी वृत्तित्यागेंकरूनि । नेणे आपणातें ॥ ३६ ॥
ऐकोनि तें शिष्यवचन । गुरु बोलती मागुतेन ।
हें चि तुझें अज्ञान । जाणितलें तुवां ॥ ३७ ॥
सांडूनि वृत्तिस्फुरणातें । पृथक् जाणतां आपणातें ।
तुजवेगळें तूंतें । तूं तें कवण ॥ ३८ ॥
जाणावयाचीं नव्हे हे खूण । हें चि केवळ अज्ञान ।
तुझिया ज्ञाना येऊन । आड जालें ॥ ३९ ॥
जाणों नेणोनि जाणणें । केवळ तें नेणपणें ।
तें नेणपण हि परि आत्मज्ञानें । तूं चि प्रकाशितासि ॥१४०॥
नेणे मी आपणातें । ऐसें जाणपण आइतें ।
तुझां ठाईं वर्ते । तें चि कैसें पां ॥ ४१ ॥
ज्ञानें अवलंबूनि मीपण । अज्ञान धरितासि तेणेंकरून ।
मी मातें नेणे म्हणौन । ऐसेनि वचनें ॥ ४२ ॥
अज्ञान नेणे अज्ञाना । आत्मा ज्ञानरूपु तो देखणा ।
आतां धरिलीया अज्ञाना । आधारु तूं ॥ ४३ ॥
नेणणें चि तूं सर्वथा । कीं तया नेणपणाचा जाणता ।
ज्ञानरूपु मी म्हणता । साक्षी पुरुषु ॥ ४४ ॥
असो ज्ञानातें केवळ दिसे । ऐसें अज्ञान तें कैसें ।
कवणु तुझा ठाईं असे । तें दृश्य दावीं ॥ ४५ ॥
जाणोनि पाहातां अज्ञान । तेथें वर्ते सर्वज्ञान ।
सूर्यें धरी तें[2] रात्रीमान । तें नसे कोठें हि ॥ ४६ ॥

---

१ " कवळलें " श्री. २ " तैं " श्री.

दीपाचेनि प्रकाशें । अंधकारु परीक्षितां कैसें ।
नेणणें आपुलें हें तैसें । आपण जाणतां ॥ ४७ ॥
हें चि अविद्यारूप जाण । शरीर तुझें महाकारण[1] ।
मिथ्याभूत अज्ञान । नाथिलें[2] कलेंर ॥ ४८ ॥
मिथ्या असतां अज्ञान । तत्कार्य अन्यथाज्ञान ।
देहद्वयाचें स्फुरण । तें हि मिथ्या ॥ ४९ ॥
अज्ञान देहीं तत्वता । सुषुप्तीचा तूं चि जाणता ।
असो अज्ञानवादु वृथा । संकल्पु ज्ञानीं ॥ १५० ॥
आतां मिथ्या अज्ञान तें तूं । किं तत्साक्षी ज्ञानवंतु ।
ऐसा हा येकु सिद्धांतु । बोल पां गा ॥ ५१ ॥
ऐसें आइकोनि निरूपण । सच्छिष्यु बोले वचन ।
देवा तें मिथ्या अज्ञान । अन्यथाज्ञानेंसीं ॥ ५२ ॥
देहत्रय अवस्थात्रय । हें ज्ञानरूपा जयातें ज्ञेय ।
तो मी आत्मा तत्व ध्येय । मानलें ऐसें ॥ ५३ ॥
एवं देहत्रय जड स्वभावें । तेथें ज्ञानरूप जें संभवे ।
तें चि मी आत्मा अनुभवें । जाणवलें ऐसें ॥ ५४ ॥
ऐसें आइकोन शिष्यवचन । गुरु बोलती सत्य म्हणौन
तुझें निरसलें अज्ञान । तुझेनि ज्ञानें ॥ ५५ ॥
तूं बोलतासि जें ज्ञान । तयाचें आश्रयरूप सांगे कवण
ज्ञानाचें हि परि ज्ञान । वर्ते जया ॥ ५६ ॥
जाणतासी तरि तें जाणणें । तुजवीण नुरावें तेणें ।
आतां जाणणयाचें जाणणें । जाणतासी तूं ॥ ५७ ॥
तूं बोलतासी संज्ञान । परि मूला विद्या ते हि अज्ञान ।
शरीर महाकारण । आत्मयांचें ॥ ५८ ॥
ज्ञान तें अज्ञान कैसें । म्हणसील तरि परियसें ।
जाणतें वर्म न प्रकाशे । जाणणेंन तेणें ॥ ५९ ॥
डोळा उघडूनि पाहे । ते दृष्टी द्रष्टा लाहे ।
नाना जेथींचीं तेथें सामाये । तैंवांचूनि ॥ १६० ॥

---

१ "कारण" श्री. रा. २ नसलेलें, लटकें, मिथ्या.

आपुलेनि प्रकाशें । सूर्या सूर्यातें दिसे ।
तरि अंधकारें गवसे । ऐसें चि जालें ॥ ६१ ॥
तैसा आत्मा ज्ञानाचा । ज्ञान हे प्रकाशु जयाचा ।
जेणेंविण ययाचा । अभावो वर्ते ॥ ६२ ॥
तो जाणतां तेणें ज्ञानें । जाणणें तें होय नेणणें ।
दीपु लाऊनि पाहाणें । पाहिजे जयापरी ॥ ६३ ॥
ययालागीं तें ज्ञान । सांडीं जैसें अज्ञान ।
शरीर महाकारण । मानूनि यांतें ॥ ६४ ॥
तया ज्ञानाचेनि संगें तूंतें । अवस्थात्रय साक्षित्व वर्ते ।
जाणोनि देहत्रयातें । भोगिसी द्रष्टेपणें ॥ ६५ ॥
ज्ञानसंगु सांडितां । निरसली ते तुरियावस्था ।
देहत्रय अवस्थात्रय आतां । दृश्य कैंचें ॥ ६६ ॥
विलक्षणु तूं येणेंसी । साक्षी द्रष्टा हि न होसी ।
मग सहजें कैसा अससी । तें चि सांगें ॥ ६७ ॥
इतुलें श्रीगुरूचें वचन । शिष्यें तेणें आइकोन ।
पुनरपि तें अज्ञान । आश्रयिता जाला ॥ ६८ ॥
शिष्यु बोले जी स्वामी । ज्ञानाश्रयो तो कैसा मी ।
हें नेणें वरि ज्ञानधर्मी । सुटे हि ना ॥ ६९ ॥
मजवेगळें माझें ज्ञान । जाणें मी युक्ती च्चि करून ।
ज्ञानाश्रयो मी हें बोधन । तेणें चि प्रकारें ॥ १७० ॥
वांचूनि ज्ञान सोडूनि असतां । न ये मातें सर्वथा ।
तेणें मी कवणु तत्वता । ऐसें नेणें ॥ ७१ ॥
गुरु बोलती वचन । तुवां अवलंबिलें अज्ञान ।
तरी पुनरुक्त मागुतेन । तें चि बोलावें ॥ ७२ ॥
अज्ञानातें तूं जाणु । ज्ञानमयु तद्विलक्षणु ।
सांडीं तेथींचा अभिमानु । ज्ञानरूपु उरे ॥ ७३ ॥
शिष्यु बोले बरें । मी ज्ञानरूपु हें खरें ।
अज्ञान मिथ्या मद्आधारें । नसे कांहीं चि ॥ ७४ ॥

गुरु बोलती वचन । तैसें चि तूं नव्हेसी ज्ञान ।
येरु बोले मागुतेन । यथार्थ जी ॥ ७५ ॥
गुरु बोलती बरें । तरि ज्ञानाज्ञोपसंहारें ।
आपुलें स्वरूप खरें । तें चि निर्धारीं ॥ ७६ ॥
नेणें ऐसें बोलसी । तरी अज्ञानडोहीं पडसी ।
ज्ञानरूपत्व भाविसी । तें हि बंधन ॥ ७७ ॥
ज्ञानाज्ञानविलक्षणु । आत्मा तो तूं कवणु ।
ऐसें पुसतां तो अज्ञानु । मौनें ठेला ॥ ७८ ॥
ज्ञान सांडितां अज्ञान । अज्ञान सांडितां लागे ज्ञान ।
उभय भाव विलक्षण । स्वरूप न प्रकाशे ॥ ७९ ॥
आतां नेणें हें कैसें म्हणावें । अज्ञान मिथ्या ज्ञानभावें ।
जाणों तें जाणणें नव्हे । आपुले प्रकाशक ॥ १८० ॥
सांडावें केवळ ज्ञान । तरि तें न कळे चि खूण ।
न कळे ऐसें वचन । कैसें बोलावें ॥ ८१ ॥
ऐसिया करितां कल्पना । शिष्यातें उसंतु असेना ।
मग बोलवितां हि प्रतिवचना । नेदी सर्वथा ॥ ८२ ॥
मग सद्गुरुनाथें जाणोन । केलें हासतें वदन ।
बोलता जाला वचन । तें चि कैसें ॥ ८३ ॥
बापा ऐसा हा अतद्वादु । येणें होये शाब्दिकु बोधु ।
परंतु साक्षात्कारें आत्मप्रबोधु । ते खूण वेगळी ॥ ८४ ॥
येणें अतद्वादें करून । आत्मसंशय होती दहन ।
निर्धारु पावे मन । गुणातीतीं ॥ ८५ ॥
येणें होतां साक्षात्कारु । तरि कासया लागता गुरु ।
ग्रंथांचिवरूनि विचारु । कळों येता ॥ ८६ ॥
तिये अनुभवाचिये युक्ती । इतुला आयासु तो नाथी ।
तेथें युक्तिमात्रें चि शांति । होय सर्वां विद्येची ॥ ८७ ॥
स्थूळेंसीं वेगळेंपण । तें चि लिंगाचें निरसन ।
कारण देह आत्माज्ञान । छेदणें चि नलगे ॥ ८८ ॥

ते चि अवस्थात्रयाची सांडणी। बैसावें तुरियेचां स्थानीं।
प्रपंचाभावदर्शनीं। वृत्ति बैसे ॥ ८९ ॥
प्रपंचाभावदर्शन। तें साक्षात्कारें चि करून।
जेथें पाहातां प्रपंचभान। आडळेना ॥ १९० ॥
अदृश्य होये दृश्य। तें स्फुरे अदृश्य।
त्रिपुटीचें सामरस्य। तें तयावरी ॥ ९१ ॥
ज्ञेय सकळ संहारे। ज्ञान कारणीं चि जिरे।
अधिष्ठान सहजें उरे। ब्रह्म आत्मा ॥ ९२ ॥
ऐसी अनुभवाची कळा। तो प्रकारु असे वेगळा।
आइकें शिष्या प्रेमळा। सांगिजैल तो ॥ ९३ ॥
ऐसी आज्ञा देऊनि। तयातें अभिमुख करूनि।
आसन मुद्रा संपादूनि। तत्व उपदेशिलें ॥ ९४ ॥
तें गुरुशिष्यांचें बोलणें। आइकावें गुरुमुखें चि तेणें।
त्यापरी सद्गुरुनाथें आतमखुणें। शिष्यु अनुग्रहिला ॥१९५॥
ॐ इति श्रीमद्दिगंबरानुविरचिते ग्रंथराजनाम ग्रंथे गुरु-शिष्यसंवादे चतुर्थप्रकरणं समाप्तम् ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

---

## ॥ प्रकरण पांचवें ॥

### ॥ श्रीयोगीजनवल्लभाय नमः ॥

सद्गुरुनाथें अनुग्रहिला। शिष्यराजु स्थिति पावला।
निर्विकल्पें ठेला। समाधी तो ॥ १ ॥
भावाभाव अभावले। स्वभाव स्वभावें निमाले।
पूर्णानंदमय उरलें। सहजात्मतत्व ॥ २ ॥
निर्विकल्प स्वरूपनिष्ठता। अनुभऊनि उन्मनी अवस्था।
गुणसाम्यस्थितीं असतां। शिष्यराजु तो ॥ ३ ॥
गुणसाम्यावस्थेची प्रकृति। आश्रयूनि स्वरूपज्ञप्ति।
गुणारूढत्वें पूर्वस्थिति। आला देहावरी ॥ ४ ॥

मग श्रीसद्गुरूचे श्रीचरण । देखोनि तयाचें मन ।
प्रेमें कवळित होऊन । आप विसरलें ॥ ५ ॥
तेणें प्रेमानंदें निवाला । क्षणा येका सावधु जाला ।
मग अनुवादों लागला । तेणें सद्गुरूसी ॥ ६ ॥
शिवशिवा जी सत्यमूर्ति । अगम्यरूपा पुण्यकीर्ति ।
न वर्णवे तुझी महंती । अप्राज्ञा मातें ॥ ७ ॥
ब्रह्मा विष्णु महेश्वर । करिती सृष्ट्यादि व्यापार ।
ते क्षणार्धमात्रें समग्र । मिथ्या केलें ॥ ८ ॥
अनंत माया ईश्वराची । खाणी अनंता ब्रह्मांडांची ।
ते अवघी कल्पना चि । ऐसें केलें ॥ ९ ॥
ईश्वरु मायेचा नियंता । ऐसी आइकिली होती कथा ।
तो प्रकारु अवघा वृथा । ऐसें केलें ॥ १० ॥
जाणतां मी आपणातें । मजवेगळें कांहीं चि न वर्ते ।
सत्य सर्वत्र ब्रह्म तें । मी चि केवळ ॥ ११ ॥
जाणणें न जाणों विसरावें । तरी च तें जाणों जाणावें ।
अनुभवेंवांचूनि अनुभवे । स्वस्वरूप ॥ १२ ॥
अभावाचिऐसें स्वभावें । परि अभावाचेनि अभावें ।
भावना ग्रासूनि आघवें । जालें सर्वत्र ॥ १३ ॥
शशिसूर्य हारपले । प्रपंचगगनअभ्र वितुळलें ।
स्थिर पूर्ण उरलें । मी चि केवळ ॥ १४ ॥
मीपणाचा भाउ विरे । परंतु आत्मेतर न स्फुरे ।
स्फुरण स्वरूपीं जिरे । जीत चि पैं ॥ १५ ॥
मरणाऐसी वाटे खूण । परंतु मरणाचें केवळ मरण ।
जीत जीवाचें उछेदन । विचारितां ॥ १६ ॥
महाप्रळयाचेनि उपमानें । वर्ते जें संपूर्णपणें ।
परंतु अभावाचेनि इंधनें । प्रदीप्त सदा ॥ १७ ॥
उदकाऐसें निरंतर । कीं काश्मिराचें जैसें अंतर ।
अरूप परी सर्वत्र । संपूर्ण सदा ॥ १८ ॥

सन्मात्र सर्वगत ऐसें । चैतन्यघन सर्व असे ।
आनंदमय विशेषें । विमळ तत्व ॥ १९ ॥
निद्रे चि ऐसा आनंदु । परंतु न वर्ते तेथें अबोधु ।
मी चि मी आत्मा स्वयंबोधु । ऐसी प्रतीति ॥ २० ॥
जेणें सुखें सुखावलें । मन तें विरों चि लागलें ।
विसरेंविण विसरलें । आपणें आपणयातें ॥ २१ ॥
जितुलें पूर्णत्व तितुलें हि । व्योम चि जाणों कांहीं ।
काश्मिराचां हृदयीं । जैसें वर्ते ॥ २२ ॥
निराकार निरंतर । सोज्वलपणें सर्वत्र ।
तया दर्पणाची समग्र । निर्मलता चि काय ॥ २३ ॥
सोज्वलपण भिंगाचें । रूपें विटाळलें दर्पणाचें ।
यया गगनाकार पूर्णाचे । अनुपम्य तें ॥ २४ ॥
निर्मळ सोज्वळ निरंतर । ज्ञानानंदमय चि समग्र ।
माझें स्वरूप अपार । अंतादिविहीन ॥ २५ ॥
देवा प्रसन्नत्वें तुझेनि । प्रकाशलें माझां स्थानीं ।
संशय तो मागुतेनि । नसे ये अर्थीं ॥ २६ ॥
परंतु माझेनि मनें । येक घेतलें पुसणें ।
तें मी आतां येणें चि क्षणें । विनवीन जी ॥ २७ ॥
प्रपंचु होता निमाला । तो मागुतेनि कैंचा आला ।
यथापूर्व आभासला । अवस्थेसीं ॥ २८ ॥
तें चि देह ते चि अवस्था । तो चि मी ऐसा मागुता ।
अत्यंताभाउ जाला असतां । हें कैसें घडलें ॥ २९ ॥
इतुलें बोलणें आइकोनि । सद्गुरु बोलती हांसोनि ।
भला गा भला म्हणौनि । संबोधनेसीं ॥ ३० ॥
केलें तुवां ऐसिया प्रश्ना । हे तुझी असंभावना ।
प्रकट जाली छेदना । कीजैल ईचिया ॥ ३१ ॥
अभावो बोलिजे प्रसिद्धु । जाणावा तो षड्विधु ।
आतां तयाचा भेदु । तो चि अवधारीं ॥ ३२ ॥

प्राग्भाउ तो जाण येकु । प्रत्यग्भाउ दुजा आणिकु ।
अन्योन्याभाउ येकु । तो हि तिसरा ॥ ३३ ॥
प्रध्वंसाभाउ चौथा । पांचवा अत्यंताभाउ तत्वता ।
पृथग् सद्भाउ सर्वथा । बोलिजे साह्वा ॥ ३४ ॥
पूर्वींचे अभाव चान्ही । भावाश्रित ते अवधारीं ।
यालागीं भाउ चि तया अंतरीं । वर्ते निरंतरु ॥ ३५ ॥
निर्माणापूर्वीं घटाभावना । तो प्राग्भाउ जाण सुजाणा ।
प्रस्तुत घटा आवर्तमाना । प्रत्यग्भाउ बोलिजे ॥ ३६ ॥
घटीं अभावना पटाची । पटीं अभावना घटाची ।
जाण अन्योन्याभावाची । ऐसी स्थिति ॥ ३७ ॥
प्रत्यक्ष घटाचा विनाशु । जाणावा तो प्रध्वंसु ।
अभावचतुष्टयाचा प्रकाशु । ऐसा आथी ॥ ३८ ॥
असतेनि पदार्थें भावनीय । ऐसें हें अभावचतुष्टय ।
यालागीं तें विज्ञेय । वर्ते भावान्वयें चि ॥ ३९ ॥
प्राग्भावा पूर्वापर । भावी घटभावना चि निरंतर ।
मध्यें अभावाकारें गोचर । ते चि वर्ते ॥ ४० ॥
म्हणौनि प्राग्भाउ तो भावो चि । घटभावना तेथें वर्ते चि ।
अतेव अभाउ नव्हे चि । युक्ती करितां ॥ ४१ ॥
प्रत्यग्भावाचें लक्षण । तें हि तद्वत चि जाण ।
पूर्वापर भावीं स्थान । असे भावातें ॥ ४२ ॥
मध्यें अभावाचेनि आकारें । भाउ चि तो केवळु स्फुरे ।
पटाभाव साक्षात्कारें । नातरी बोधता कीं ॥ ४३ ॥
अभावा भावा येकी याति । तेथें काइसी ते विभक्ति ।
तो भेदु चि आकृति । आणी भावातें ॥ ४४ ॥
अन्योन्याभावाचें लक्षण । अन्योन्यभावें चि करून ।
भाउ चि असे स्थान । अभावा तया ॥ ४५ ॥
प्रध्वंसु तो जें खरा । तें घटाभाउ आला आकारा ।
पूर्वापर भावी निराधारा । आधारु अभावातें ॥ ४६ ॥

मध्यें अभाउ ऐसा स्फुरे। तो खरा तेणें चि आकारें।
यालागीं तो बा रे। अभावो न ह्मणावा ॥ ४७ ॥
ऐसें हें अभावचतुष्टय । भावाश्रित नित्य ज्ञेय।
आतां स्वरूप ध्येय । अत्यंताभावाचें ॥ ४८ ॥
अत्यंताभाउ तो कैसा। वंध्येचा पुत्रु जैसा।
फळ मुहुरु आकाशा। नाथिला शब्दु ॥ ४९ ॥
अत्यंत अभाउ तो ऐसा। आतां घटाचा जो तैसा।
अभावाश्रितु शिष्येशा। भासला हि ॥ ५० ॥
भावरूपें चि सत्य स्फुरे। आतां तो कवणें प्रकारें।
सांगिजैल तें खरें। मानीं वचन ॥ ५१ ॥
अत्यंताभावकल्पना। घटाभावें ते असेचिना।
नसतयाचिया नाहींपणा। आहेपण नव्हे ॥ ५२ ॥
अत्यंताभाउ घटाचा। ह्मणतां घटु आश्रयो तयाचा।
आन न स्फुरे आनाचा। ह्मणौनियां ॥ ५३ ॥
वंध्येतें पुत्रु नाहीं। ऐसा शब्दु जये ठायीं।
तेथें भावना नसतां काई। अभावरूप ॥ ५४ ॥
वंध्या ते वंध्या चि खरी। पुत्रु तो पुत्रु अवधारीं।
उभय भाव निर्धारीं। अभावो तो ॥ ५५ ॥
वंध्येतें पुत्रु हे भावना। वरि नाहीं ह्मणतां अभावना।
भावसापेक्षित कल्पना। भावरूप ते ॥ ५६ ॥
न वदतां वरी तो नाहीं। वदतां भाउ जाला कांहीं।
आतां भावनारूपु तो हि। नव्हे कां पुत्रु ॥ ५७ ॥
पुत्रपणाची भावना। आणि मातृत्वाची कल्पना।
हे तंव सत्य आपणा-। ऐसी भासे ॥ ५८ ॥
ह्मणौनि अभावाश्रितु परी। भाउ वर्ते तया अंतरीं।
आतां अभाउ तो कवणेपरी। कैसा जाणावा ॥ ५९ ॥
तरी पृथग् सद्भाउ ह्मणौन। केवळ अभावाचें लक्षण।
तयाचें कैसें विवरण। तें चि अवधारीं ॥ ६० ॥

मृत्तिका ते आदिअंतीं । मध्यें घटाची आकृती ।
मृत्तिकेवेगळी तिची व्यक्ति । ते काय असे ॥ ६१ ॥
मृत्तिकास्थानीं घटु चि नाहीं । भावाभाव तयाचे काइ ।
प्रत्यक्षु दृष्टी पडला हि । न वर्ते घटु ॥ ६२ ॥
पाणियावेगळे कल्लोळ । किरणावेगळें मृगजळ ।
आभासलें हि केवळ । नसे कांहीं ॥ ६३ ॥
आभासु असतां हि परी । नीलवर्णु नाहीं अंबरीं ।
वर्तमानु दोरु दोरीं । सर्पत्व वावो ॥ ६४ ॥
तैसा प्रपंचाकारु आभासे । परंतु सत्यत्वें कांहीं च नसे ।
विवर्तु मृगजळ जैसें । किरणस्थानीं ॥ ६५ ॥
भावनेसी अभावना । अभावनेसी भावना ।
ऐसी कव्हणी येकी कल्पना । प्रपंचु हा ॥ ६६ ॥
मिथ्या मृगजळाचा पुरु । तेथें कासया योजावें तारु ।
तैसा आभासतां हि संसारु । भान मिथ्या ॥ ६७ ॥
ब्रह्म चि सत्य अधिष्ठान । निःप्रपंच निरंजन ।
तें येणें विवर्तेंकरून । अनारिसें नव्हे ॥ ६८ ॥
ना प्रपंचु ऐसें जें भान दिसे । तें ब्रह्म चि परि आन नसे ।
सत्य किरण मात्र जैसें । मृगजळाचां ठांई ॥ ६९ ॥
तैसा भासतां भेदु निजाकारें । अभेदु वर्ते सत्याकारें ।
ब्रह्म सर्व येकाकारें । तेणेंसीं सिद्ध ॥ ७० ॥
असतां मृगजळाचे कल्लोळ । किरण चि सर्वदा निश्चळ ।
भान तें तेणेंसीं वेगळें । नसे कांहीं चि ॥ ७१ ॥
यया असतें सत्यपण । तैं सत्य हातें निरसन ।
मृगजळ तें जीवन । काये मा उपसावें ॥ ७२ ॥
यालागुनि भान भासे । अवस्थादिक जैसें तैसें ।
परंतु समाधी जे तुझी असे । निर्मळ ते ॥ ७३ ॥
परमानंदा ईश्वराचें । आपुलिया सद्गुरूचें ।
वचन आइकोनि उपदेशाचें । शिष्यराजु बोले ॥ ७४ ॥

देवा हें विवर्तरूप भान । न घडे ययाचें निराकरण ।
हें असतां चि अभिन्न । स्वरूप जाणावें ॥ ७५ ॥
हां जी हा काळुवरि हें भान । समाधी गेलें हारपोन ।
असतां पुडती मागुतेन । तें कां स्फुरलें जी ॥ ७६ ॥
गुरु बोलती यथार्थ । भान प्रपंचाचें समस्त ।
तें गुणकार्य अवस्थाजनित । भासे अवस्थेद्वारां ॥ ७७ ॥
आणि समाधीचें स्फुरण । तें चहुं अवस्थाविलक्षण ।
केवळ गुणातीत चैतन्य । निर्मळ जेणें ॥ ७८ ॥
स्फुरे सच्चिदानंदमय । ह्मणौनि भान हें न वर्ते ज्ञेय ।
स्वप्नभान मिथ्यामय । जागृतीं जैसें ॥ ७९ ॥
जागृतीचें स्वप्नीं नाथी । स्वप्नीचें जेवि जागृतीं ।
उभय भान सुषुप्ती । जेणें प्रकारें ॥ ८० ॥
तैसें चि तुरियावस्थे । सर्वत्र अभाव वर्ते ।
ते हि परी अन्यथा अवस्थे । नुरे अभान[1] ॥ ८१ ॥
मा अवस्थागुणनिरासीं । आश्रयो कवणु भानासी ।
ह्मणौनि अभावना ऐसी । भासली तूतें ॥ ८२ ॥
अभावनेप्रती हें कारण । पुनर्भान आतां कवण ।
शिष्यराया सांगेन । अवधारीं तें ॥ ८३ ॥
करितां गुणाचें निरसन । ज्ञप्तिमात्र उरे जें स्फुरण ।
जयाचें नव्हे छेदन । प्रत्यक्ष करितां ॥ ८४ ॥
तें गुणसाम्य प्रकृतीचें । केवळ ब्रह्म चि सांचें ।
महावाक्य वेदाचें[2] । ऐसें मत ॥ ८५ ॥
श्रुतिः ॥ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म । प्रज्ञा प्रतिष्ठा प्रज्ञानं ब्रह्म ॥ ७ ॥
ऐसेनि येणें वेदवचनें । गुणसाम्य तें ब्रह्म चि मानणें ।
ज्योतिसहवर्तमान रत्नें । वर्तिजे जयापरी ॥ ८६ ॥

---

१ " अभान " श्री. २ " स्फुरण शुद्ध स्वरूपाचें । ब्रह्म चि तें वेदाचें । " असें दुसरें आणि तिसरें चरण श्री. रा. प्रतींत आहे.

तया गुणसाम्यापोटीं वा रे । निरस्तगुण तदाकारें ।
वर्तत असती हें खरें । वर्म जाण पां ॥ ८७ ॥
ते चि उन्मनी अवस्था । ये रीतीं या अंतर्भूता ।
येणें प्रकारें असतां । निर्विकल्प समाधी ॥ ८८ ॥
पूर्वाभ्यासेंकरून । गुणाचें होय स्फुरण ।
अवस्थेद्वारां दर्शन । पूर्व प्रपंचाचें ॥ ८९ ॥
जवळूनि पाहतां दृष्टी । नाहींसें स्फुरे सृष्टीं ।
मृगजळ आटे किरणाचे पोटीं । तेथें चि असोनि[1] ॥ ९० ॥
तें निर्धाराचें देखणें । केवळ मंद जालेंपणें ।
पुनरपि आपुलेनि गुणें । मृगजळ जैसें तैसें ॥ ९१ ॥
येवं भानीं अथवा अभानीं । विवर्तु तो असे चि अधिष्ठानीं ।
तो स्वरूपाचिये हानी । करूं न शके चि ॥ ९२ ॥
भान आणि अभान । मिथ्या विवर्तांचे समान ।
तुझें शुद्ध अद्वय अखंडपण । निर्दोष तें ॥ ९३ ॥
ऐसें आइकोनि बोलणें । शिष्यु प्रेमळु तो काय ह्मणे ।
देवा विवर्ताचेनि भानें । अभानें अचाड ॥ ९४ ॥
ऐसें हें सत्य वचन । तरी ययाचें कां निरसन ।
अतद्वादेंकरून । पूर्वी करणें ॥ ९५ ॥
गुरु बोलती कुमरा । अवधान देईं चतुरा ।
तुझा निश्चयो होय खरा । परंतु येक ॥ ९६ ॥
लवण दशे आलें । तेणें उदकें चि उदक झांकलें ।
कां जें जळ पालवीं बांधलें । ऐसें न घडे ॥ ९७ ॥
लहरिया फेन कल्लोळ । तरंगादि अवघें जळ ।
परंतु तेणें आकारें केवळ । न कल्पिजेतें ॥ ९८ ॥
प्रतिमा जे सुवर्णाची । ते निखळ अवघी सोनें चि ।
परंतु आकृती ते कांचनाची । ऐसें न घडे ॥ ९९ ॥

---

[1] " जवळूनि पाहातां दृष्टी । मृगजळ आटे किरणाचा पोटीं । तें तेथें चि असोनि सेवटीं । नाहींसें स्फुरे ॥ " श्री. रा.

मृगजळीं सत्य किरण । यालागीं तें चि तें साच जाण ।
परंतु उदक चि तयालागून । रूप न कल्पावें ॥ १०० ॥
तैसें गुणकार्य अवस्थेद्वारा । आभासे जे कीं चतुरा ।
नामें रूपें गुणें कुमरा । धर्मकर्मेंसीं ॥ १ ॥
तें ब्रह्म चि सर्व विचारितां । आन कांहीं नसे तत्वता ।
परंतु तेणें रूपें मानितां । नव्हे कांहीं चि ॥ २ ॥
ब्रह्मातें न घडे आकारू । नाम रूप गुण समग्रु ।
कर्मधर्मु व्यवहारू । मायिकु जो ॥ ३ ॥
मन चि स्वप्नीं भानाकारें । परि न मानिजे मन तेणें आकारें ।
जें तें निजरूपें खरें । जाणों अपेक्षिजे ॥ ४ ॥
ह्मणोनि निरसन देहाचें । गुणा आणि अवस्थांचें ।
करूनि यया प्रपंचाचें । अभाउ देखावा ॥ ५ ॥
नामरूपगुणाभावें । शुद्ध ब्रह्म आधीं जाणावें ।
मग स्वभावें वेगळें नव्हे । तेणेंसि सर्व ॥ ६ ॥
करूनि तरंगाचें निरसन । तैसें चि लहरिया बुद्बुद फेन ।
निवारूनि तत्कारण । उदक जाणावें ॥ ७ ॥
सुटलें सकळां आकारीं । उदक जाणिजे वरवियापरी ।
मग तें निजरूपें सर्वाकारीं । सर्व अवघें ॥ ८ ॥
तैसें शुद्ध ब्रह्म गुणातीत । जाणोनि अवस्थारहित ।
मग अन्वयें तें चि समस्त । ऐसें जाणावें ॥ ९ ॥
येणें व्यतिरेकान्वयें ज्ञानें । सर्व ब्रह्म आत्मा जाणणें ।
जाणोनि सत्य मानणें । निजाकारें चि सर्व ॥ ११० ॥
भान अथवा अभान । ब्रह्म चि जाणावें सर्वसमान ।
परंतु निर्विकल्पीं चि मन । निश्चळ करावें ॥ ११ ॥
अळंकाराभावु अविलोकूनि । लक्ष ठेवावें सुवर्णीं ।
सुवर्ण नेणतां शिष्यशिरोमणी । पडे विभ्रमु ॥ १२ ॥
सोनयाचा नागु कीजे । तयाचा आकारु चि मानिजे ।
तैं नाथिलें परी कां नुपजे । मानसीं भय ॥ १३ ॥

नागु दृष्टी पाहोन । मग मानिजे हें सुवर्ण ।
तें ते जीवाची जतन । आवडे करूं ॥ १४ ॥
तेवि शुद्ध ब्रह्म जाणोन । तन्मय विश्व मानून ।
विश्वेसींसहित निर्गुण । तें चि ध्यावें ॥ ११५ ॥

ॐ इति श्रीमद्दिगंबरानुचरविरचिते ग्रंथराजनाम ग्रंथे गुरुशिष्यसंवादे भावनाखंडणं नाम पंचमं प्रकरणम् ॥ ५ ॥

---

## ॥ प्रकरण सहावें ॥

### ॥ श्रीज्ञानसागराय नमः ॥

इतुलें सद्गुरूचें वचन । आइकोनि ब्रह्मनिरूपण ।
आत्मानुभवाचें दृढीकरण । पावला शिष्यु ॥ १ ॥
पुढतीं सप्रेमें बहुतें । स्तऊनि तया श्रीगुरूतें ।
पुसता जाला सर्वज्ञातें । शिष्यराजु तो ॥ २ ॥
देवा तूं कृपेचा सागरु । ज्ञानविज्ञानगुणभास्करु ।
माझिये हृदईचा अंधकारू । फेडिला तुवां ॥ ३ ॥
आतां जी माझेनि मनें । घेतलें येक पुसणें ।
तें विनवीन ये चि क्षणें[1] । कृपा कीजे ॥ ४ ॥
वेदीं शास्त्रीं स्तविला । जगत्कारण जो उपपादिला ।
तो परमात्मा मजवेगळा । कवणु कैसा ॥ ५ ॥
हें करावें मातें निरोपण संदेहभूत माझें मन ।
तंव इतुलियावरी हांसोन । बोलिले सद्गुरू ॥ ६ ॥
परमात्मा ऐसा ह्मणिजे । तो मायागुणसमूह मानिजे ।
मायोपाधी सहजें । अतात्विकु ॥ ७ ॥
अविद्याविवर्तु जयापरी । माया तेवीं चि अवधारीं ।
शुद्धब्रह्मीं निराकारीं । अन्यथाभासु तो ॥ ८ ॥

---

१ " ये चि क्षणें " ऐवजीं " मजकारणें " असा पाठ, श्री. रा.

स्वाविद्येचें करितां निरसन । अविद्यारहित निर्गुण ।
पूर्ण ब्रह्म सनातन । तें चि उरलें ॥ ९ ॥
केवला अद्वया शुद्धातें । विवर्ताचें भान चि न वर्ते ।
माया अविद्या तेथें । अभावलें मृगजळ ॥ १० ॥
घटोपाधि परिछिन्न । घटाभावें तें गगन ।
जेथींचें तेथें संपूर्ण । ऐसें असतां ॥ ११ ॥
मठाकाश तें कैसें । निजस्वरूपें तया दिसे ।
आपुलिया रूपा अनारिसें । सत्य निर्धारितां ॥ १२ ॥
तरंगदशेची सांडणी । करूनि असतां पाणी ।
कल्लोळु तो आपणाहूनि । वेगळा पाहे ॥ १३ ॥
ना स्वप्नीं भूपालु सेविला । तो जागृतीं पाहों गेला ।
तो तया आपणा नृपाला । लाहे तया ॥ १४ ॥
तुझें निरसतां अज्ञान । ब्रह्म तें तूं चि सनातन ।
मायाअविद्याभान । तत्काळें चि नासलें ॥ १५ ॥
मायोपाधि परमात्मा । आणि अविद्योपाधि जीवात्मा ।
हे द्विविध गुणमहिमा । विवर्तु जाली ॥ १६ ॥
तया विवर्ताचेनि परिग्रासें । निर्गुण ब्रह्म तूं जैसें तैसें ।
तया सोपाधिक दृश्य काईसें । आभासेल मा ॥ १७ ॥
जागृता स्वप्न चि वावो । तैसा बुझ अभिप्रावो ।
जाणतां आपुला सद्भावो । ब्रह्म तें आत्मा ॥ १८ ॥
तया ब्रह्मातें पुडती । ब्रह्म तें दुसरें नाथी ।
जीव ईश्वर हे भ्रांती । कैंची कल्पना ॥ १९ ॥
तथापि तुझी कल्पना । गुणाध्यासें पूर्व वासना ।
ईश्वर ऐसी भावना । कव्हणी येकी ॥ २० ॥
हृदयामाजीं उपजली । ते स्वहिता कारण जाली ।
निर्मूळ पाहिजे केली । ज्ञानहेतु ॥ २१ ॥
न करितां तिचें छेदन । संदेहा होईल स्थान ।
ययालागि निरोपण । अवधारी तें ॥ २२ ॥

प्राकृत गुणनिरासें । शेष गुणसाम्य जैसें ।
तुझां ठाईं असे । ज्ञप्तिमात्र स्फुरण ॥ २३ ॥
आत्मा ब्रह्म तूं निर्गुण । तें चि गुणसाम्य अधिष्ठान ।
स्वरूपाध्यासें मी म्हणौन । संस्फुरतासी ॥ २४ ॥
तैसें गुणसाम्य मायेचें । ज्ञप्तिमात्र स्फुरण साचें ।
सामरस्य गुणाचें । कव्हणी येकु ॥ २५ ॥
शुद्धें अधिष्ठिलें असतां । अहमित्याकारें स्फुरे तत्वता ।
सर्वेश्वरु ऐसें सुता । तो चि म्हणिजे ॥ २६ ॥
येणें चि प्रकारें जाण । अनंता जीवांचें मीपण ।
प्रकृतिगुणाध्यासेंकरून । स्वतंत्र स्फुरे ॥ २७ ॥
तूतें स्वस्वरूपाचें ज्ञान । जैसें देह महाकारण ।
अनंता जीवां स्वसंवेदन । आपुलालें तैसें चि ॥ २८ ॥
ईश्वरु तो येकु तैसा चि । स्वरूपज्ञानकळा तयाची ।
महामाया स्वभावें चि । देह बोलिजे ॥ २९ ॥
महाकारणीं वर्ततां । तेथें तूतें तुरियावस्था ।
तैसें चि साक्षित्व विचारितां । असे सर्वेश्वरीं ॥ ३० ॥
महाकारण तुरिया प्रत्यगात्मा ।
हे अविद्यैक शुद्धसत्वाचा महिमा ।
महामाया साक्षित्व परमात्मा ।
तैसें चि शुद्धसत्व मायावी ॥ ३१ ॥
महाकारण तुरिया दोनी । येथींचा आत्मा तूं अभिमानी ।
तैसा चि परमात्मा तये स्थानीं । येकु जाणावा ॥ ३२ ॥
स्वस्वरूपाचें अज्ञान । जैसें तुझें देह कारण ।
माया शरीर जाण । तैसें चि ईश्वरीं ॥ ३३ ॥
तूतें कारण शरीरीं । सुषुप्तिअवस्था जयापरी ।
प्रलयावस्था माया शरीरीं । तेवीं चि ईश्वरीं ते तया॥३४॥
कारणीं सुषुप्तीं तूं प्राज्ञु । मायाप्रळयीं त्रिनयनु ।
अभिमानी तैसा चि आपणु । परमात्मा तो ॥ ३५ ॥

कारण सुषुप्ति प्राज्ञु । त्रिविधु अविद्येचा तमोगुणु ।
मायाप्रळयो त्रिनयनु । तैसा चि मायेचा ॥ ३६ ॥
लिंग शरीर जीवाचें । तेवी च हिरण्यगर्भ ईश्वराचें ।
तेणें चि प्रकारें स्वप्रकृतीचें । जाण आपुलां ठाईं ॥ ३७ ॥
लिंगीं अवस्था स्वप्न । हिरण्यगर्भीं स्थिति जाण ।
हें कार्य तें कारण । ह्मणौनि सारिखें ॥ ३८ ॥
लिंगीं स्वप्नीं तैजसु । अभिमानी आत्मा पुरुषु ।
हिरण्यगर्भीं स्थिति ईशु । श्रीविष्णु तैसा ॥ ३९ ॥
लिंगीं स्वप्नीं तैजसु । हा सत्वगुणाचा आभासु ।
अविद्या कार्य विशेषु । निर्धारें जाणावा ॥ ४० ॥
हिरण्यगर्भीं स्थिति विष्णु । मायावी सत्वगुणु ।
शुद्ध नव्हे तमःप्रधानु । प्रपंचनिष्ठत्वें ॥ ४१ ॥
जैसें पांचभौतिक साकार । तुझें हें स्थूल शरीर ।
तैसें चि जाण साचार । तया परमात्मयाचें ॥ ४२ ॥
साकार पांच भौतिक । शरीर विराट नामक ।
चतुर्दश भुवनात्मक । पात्र विश्वाचें ॥ ४३ ॥
स्थूळीं अवस्था जागृति । तूतें बाह्य व्यापारस्फुर्ति ।
विराटीं अवस्था उत्पत्ति । विश्वाचिया[1] ॥ ४४ ॥
स्थूला जागृतीचिया स्थानीं । विश्वु आत्मा अभिमानी ।
विराट उत्पत्ति ये दोन्ही । ईश्वरीं जीं ॥ ४५ ॥
तेथींचा कर्ता अभिमानी । ब्रह्मा तो सर्वेश्वरु मानी ।
हा प्रपंचु रजोगुणी । अविद्येचा जैसा ॥ ४६ ॥
तैसा चि रजोगुणु तो मायेचा । जाण पां त्रिविधु साचा ।
एवं कार्य आणि कारणाचा । ऐसा भेदु ॥ ४७ ॥
त्रिपुटीचेनि आकारें । तुझां ठाईं व्यापारु स्फुरे ।
तेणें चि जाण प्रकारें । व्यापारु ईश्वरीं ॥ ४८ ॥
आपुलें स्थूल शरीर । न होसी तूं जैसें साकार ।
तैसें चि परमात्मयातें इतर । विराट दृश्य ॥ ४९ ॥

---

1 "ईश्वरातें तैसीः" श्री.

जागृतीचा जाणता । जागृति तूं न होसी सर्वथा ।
तैसा उत्पत्तीचा वेत्ता । ईश्वरु साक्षी ॥ ५० ॥
स्थूला जागृतीचेनि अभावें । विश्वु न होसी तूं स्वभावें ।
विराट उत्पत्तिवीण नव्हे । ब्रह्मा हि ईश्वरु ॥ ५१ ॥
साक्षी तूं रजोगुणाचा । स्वप्रकृतीच्चिया साचा ।
तैसा चि रजोगुणु मायेचा । प्रकृति पुरुष जो[1] ॥ ५२ ॥
तयाचा साक्षी सर्वेश्वरु । अतएव तेणेंसीं इतरु ।
राजसु सर्गु समग्रु । नव्हे परमात्मा ॥ ५३ ॥
तत्वात्मक लिंगशरीर । नव्हसी तूतें गोचर ।
हिरण्यगर्भ देह साचार । देवतामय जें ॥ ५४ ॥
तें तैसें दृश्य ईश्वरातें । अतएव तो नव्हे जाण निरुतें ।
साक्षीविलक्षण भेदातें । आपुलिया तो ॥ ५५ ॥
स्वप्नद्रष्टा स्वप्न न होसी । तैसा चि जाणता ईश्वरुस्थितीसी ।
साक्षीविलक्षणु ऐसी । युक्ति मानावी ॥ ५६ ॥
लिंगदेह स्वप्नावस्था । उभयाभावें तत्वता ।
तैजसु अभिमानी भोक्ता । न होसी तें तूं ॥ ५७ ॥
हिरण्यगर्भ स्थिति दोनी । विष्णुत्व नाहीं ययावांचूनि ।
ह्मणौनि परमात्मा ईश्वरू स्वस्थानीं । नव्हे श्रीरमणु ॥५८॥
स्वविद्येचा सत्वगणु । ययातें तूं जाणु ।
यालागीं तूं विलक्षणु । तेणेंसीं तूं जैसा ॥ ५९ ॥
तैसा चि ईश्वरु परियसीं । सात्विका सर्गाचा साक्षी ।
विलक्षणु तेणेंसीं । विचारें पाहतां ॥ ६० ॥
स्वस्वरूपाचें अज्ञान । तूतें दृश्य देह कारण ।
ज्ञानरूप जयाचें स्फुरण । तो तूं वेगळा ॥ ६१ ॥
तैसा चि मायेचा जाणता । ईश्वरु माया नव्हे तत्वता ।
कारणीं सुषुप्तिअवस्था । नव्हसी तें तूं ॥ ६२ ॥
तैसा चि मायेचा[2] जाणु । परमात्मा तद्विलक्षणु ।
आतां अभिमानी प्राज्ञु । तेथींचा जो ॥ ६३ ॥

१ " प्रवृत्तिरूपु जो " श्री. २ " प्रलयाचा " श्री.

ch1027 e2



तो तूं नव्हेसी जैसा । परमात्मा रुद्र नव्हे तैसा ।
देहाद्यवस्था विशेषा । विलक्षणु जो ॥ ६४ ॥
अविद्येचा तमोगुणु । तूं जैसा तद्विलक्षणु ।
तैसा चि परमात्मा जाणु । माईक तामसाचा ॥ ६५ ॥
स्वस्वरूपाचें संज्ञान । तें नव्हसी तूं देह माहाकारण ।
आश्रयो साक्षी ह्मणौन । वेगळा जैसा ॥ ६६ ॥
तैसा चि परमात्मा मानीं । वेगळा महामायाहूनि ।
आश्रयो साक्षी ह्मणौनि । शिष्यराजा ॥ ६७ ॥
आत्मा तरी येविलक्षणु । परमात्मा हि साक्षित्वातें जाणु ।
आश्रयत्वें वर्ते आनु । निराळा तेणेंसीं ॥ ६८ ॥
महाकारण तुरियावस्था । प्रत्यगात्मा तूं दोहींकरितां ।
दोहींचां वियोगीं पाहातां । मीपण चि वावो ॥ ६९ ॥
अविद्येक मिथ्या जीवपण । ब्रह्म चि आत्मा निर्गुण ।
तुझें शुद्ध स्वरूप जाण । सन्मात्र जैसें ॥ ७० ॥
तैसा महामायेचा साक्षी । परमात्मा असंगु तेणेंसीं ।
सर्वज्ञता हि नापेक्षी । सांडी स्वस्फुरण ॥ ७१ ॥
तें तदंगत्वें जोडलें । तें सर्वेश्वरत्व वावो जालें ।
सत्य ब्रह्म चि उरलें । तये ठाईं ॥ ७२ ॥
एवं शुद्धसत्व अविद्येचें । आणि निरसतां मायेचें ।
जीवा आणि ईश्वराचें । तुरे नाममात्र हि ॥ ७३ ॥
मायोपाधी तो परमात्मा । अविद्योपाधी तो जीवात्मा ।
उपाधिद्वयाभावें उभयात्मा । ब्रह्म सत्य ॥ ७४ ॥
घटपरिछिन्न घटाकाश । मठपरिछिन्न मठाकाश ।
घटमठाभावें पूर्णाकाश । अखंड जैसें ॥ ७५ ॥
ना तरंगु आणि लहरी । हा आकारु मोडे सागरीं ।
तैं भेदवर्जित नीर नीरीं । निरंतर जैसें ॥ ७६ ॥
तेवि उपाधिद्वय विचारितां । मिथ्या विवर्तरूप सर्वथा ।
ब्रह्म अखंड तत्वता । निराभास ॥ ७७ ॥

यापरी भदु तो औपाधिकु । अभेदु तो तात्विकु ।
आतां आन येकु विवेकु । आइकें सांगिजैल तो ॥ ७८ ॥
उपाधिद्वयाचां निरासीं । जीवेश्वरा अभेदता ऐसी ।
तरी भेदु तो उपाधीसी । ऐसें मानेल ॥ ७९ ॥
यये अर्थीं विवरण । उपाधिद्वयाचें ज्ञान ।
तुजप्रति सांगेन । निर्धारेंसीं ॥ ८० ॥
कारणोपाधी ते माया । कार्योपाधी अनंता या ।
अविद्या प्रकृति जीवाचिया । जियां बोलिजती ॥ ८१ ॥
कारणापासाव कार्य जाण । तयाचें कैसें निर्माण ।
प्रथम आधीं निरोपण । अवधारीं तें ॥ ८२ ॥
ईश्वरा स्वस्वरूपाचें ज्ञान । तें मूळप्रकृति महामाया जाण ।
तिचेनि आंगें स्वानुसंधान । वर्तता सर्वेश्वरीं ॥ ८३ ॥
तेथें तमोगुणप्रभावें । अनवधान स्वरूपीं संभवे ।
तें चि मायारूप मानावें । अव्यक्त तुवां ॥ ८४ ॥
अनवधाना तयापासूनि । तमपूर्वक सत्वें करूनि ।
प्रपंचोन्मुख स्वभावें तेथूनि । उठे स्फुरण ॥ ८५ ॥
तें निर्विकल्प प्रपंचस्फुरण । महत्तत्व ऐसें जाण ।
तैसें गुणत्रय प्रधान । सविकल्प होये ॥ ८६ ॥
तें तो त्रिगुणा अहंकारु । गुणत्रयाचा तेथें विकारु ।
तो त्रिपुटीचा आकारु[1] । ऐसें जाणावें ॥ ८७ ॥
सात्विकीं अहंकारीं ज्ञानमयता । ते चि ज्ञानशक्ति गा तत्वता ।
तो चि ज्ञाता भोक्ता कर्ता । साधकु चेष्टकु ॥ ८८ ॥
क्रियारूपता रजोगुणी । क्रियाशक्ति ते चि मानीं ।
वृत्ति ते करणस्थानीं । तया गुणाची ॥ ८९ ॥
तामसें अहंकारीं जडता । द्रव्यमय पदार्थमयता ।
द्रव्यशक्ति प्रेमवंता । ते चि ह्मणितली ॥ ९० ॥
सात्विकें अहंकारें तत्वें होतीं । तीं कर्तीं भोक्तीं ज्ञातीं ।
पांच हि आतां पुढतीं । राजसें तेणें ॥ ९१ ॥

---

1 " अंकुरु " श्री.

राजसें तेणें अहंकारें । क्रियाशक्तीचेनि आधारें ।
तत्त्वें स्फुरतीं समग्रें । करणें चि तीं ॥ ९२ ॥
तामसें द्रव्यशक्तीद्वारें[1] जालीं । तीं द्रव्यें कार्यें बोलिलीं ।
आतां अभिधानें वेगळालीं । तयांचीं कवणें ॥ ९३ ॥
सात्विकें अहंकारें कर्ता । तेथूनि पंचतत्वांची प्रगटता ।
अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंता । येणें आकारें ॥ ९४ ॥
राजसा अहंकारापासून । जालें तें त्रिविधकरण ।
चेष्टा ज्ञान कर्म जाण । येणें आकारें ॥ ९५ ॥
तेथें व्यानु समानु उदानु । प्राणु आणि अपानु ।
हा पंचविधु पवनु । बोलिजे चेष्टाकरण ॥ ९६ ॥
श्रोत्र त्वक् चक्षु रसना घ्राण । हें ज्ञानकरणपंचक जाण ।
आतां कर्मकरण तें चि सांगेन । तें चि अवधारीं ॥ ९७ ॥
वाचा पाणि पाद शिश्न पायु । हा कर्मकरणपंचक ज्ञेयु ।
द्रव्यपंचकु साभासमयु । आतां तो कैसा ॥ ९८ ॥
शब्द स्पर्श रूप रस गंधु । हा विषयपंचकु अगाधु ।
पंचवीस तत्वांचा भेदु । ऐसा त्रिपुटीरूपें ॥ ९९ ॥
एवं कर्ता कार्य कारण । ऐसें त्रिपुटीचें जें स्फुरण ।
अहंकार म्हणौनि जाण । बोलिजे जें ॥ १०० ॥
कार्य विषयपंचकापासून । महाभूतांचें निर्माण ।
तामसु अहंकारु जाण । कारण तया ठाईं ॥ १ ॥
तामस अहंकारापासून । शब्दगुण जाहलें गगन ।
गगनीं पवनाचें निर्माण । स्पर्शगुण तेणें ॥ २ ॥
पवनीं रूप तेज गुण । तेजीं आप रस तेणें ।
उदकीं पृथ्वीचें होणें । गंधगुणास्तव ॥ ३ ॥
कार्याचें होतां निर्माण । कार्यभूतां व्यापी कारण ।
ययालागीं कारणाचे गुण । वर्तें कार्यीं ॥ ४ ॥
व्योमीं शब्द येक गुण । स्पर्शें वायु द्विगुण ।
रूपें करूनि दहन । आभासला तीं गुणीं ॥ ५ ॥

---
1 " द्वारें " श्री.

रसें उदक चतुर्गुण । गंधें पृथिवी पंचगुण ।
कार्य व्याप्य कारण । ऐसें असतां ॥ ६ ॥
पांचा गुणांची धरणी । भूतपंचक तिच्या स्थानीं ।
तेणें योगें मिळणी । पंचवीसा सूक्ष्माची ॥ ७ ॥
तो स्थूळसूक्ष्मसंयोग । येकत्व असतां न पेवे योग ।
येक बहिरंग येक अंतरंग । भाग वेगळे चि ॥ ८ ॥
कार्य स्थूल चैतन्य । अतएव तें विलक्षण ।
भूतपंचक सूक्ष्माहून । बहिरंग वेगळें ॥ ९ ॥
अव्यक्त सूक्ष्म चैतन्यमय । भूतपंचक तया ज्ञेय ।
अतएव अंतरंग साभासमय । वेगळें चि तें ॥ ११० ॥
सुक्ष्म अंतरंग वर्तमान । तयाचें देह जालें निर्माण ।
तें हिरण्यगर्भ सगुण । तत्वतामय ॥ ११ ॥
अंतःकरण विष्णु चंद्रमा मनु । बुद्धि ब्रह्मा चित्त नारायणु ।
अहंकारु तो त्रिनयनु । ऐसे हे कर्ते ॥ १२ ॥
ब्रह्मांडावर्ती पवनु । तो चि पंचधा भेदें प्राणु ।
हिरण्यगर्भ सगुणु । देहो देवाचा ॥ १३ ॥
तेथें श्रोत्र दिशा चक्षु भानु । त्वकु वायो रसना वरुणु ।
अश्विनौ देवता घ्राणु । परमेश्वरातें ॥ १४ ॥
वाचा अग्नि पाणी इंदु । पाद वामन शिश्न प्रजेंद्रु ।
नैरुत्य देवता आकारु । तेथें वायूचा ॥ १५ ॥
सूक्ष्म तत्व वासनामय । साभास विषय ज्ञेय ।
ऐसें तत्वात्मकमय । शरीर परमात्मयाचें ॥ १६ ॥
बाह्य स्थूलभूतांचें । स्थूलदेह ईश्वराचें ।
विराटनाम तयाचें । भरवसेनें ॥ १७ ॥
सूक्ष्में स्थूल उपजलें । स्थूलीं सूक्ष्म मिसळलें ।
स्थूल चि आपण जाहलें । ऐसें असतां ॥ १८ ॥
सूक्ष्मातें पावली स्थूलता ।
उपजली स्थूला कार्याची आस्था ।
ते चि स्फुरणअवस्था । उत्पत्ति ह्मणिजे ॥ १९ ॥

जीवसृष्टीचें उत्पादन । ऐसें उपजलें जें स्फुरण ।
तें पुरुषा आंगें स्वप्न । स्फुरे जयापरी ॥ १२० ॥
स्वप्नीं आकारु जो जो स्फुरे । मन चि सर्व तेणें आकारें ।
द्रष्टा चि दृश्यत्वें अवतरे । ऐसें जालें ॥ २१ ॥
दर्पणु पाहातां नयनीं । द्रष्टा चि प्रतिबिंबे तये स्थानीं ।
तैसा चि जीवरूपें होऊनि । परमात्मा चि तो ॥ २२ ॥
आपणु आपणातें भासला । दृश्य द्रष्टा स्वयें चि जाला ।
तेथें प्राकृत तो भेदला । गुणभासु कीं ॥ २३ ॥
कवण प्रतिबिंब कवणाचें । ऐसें सांगेन साचें ।
मुख्य बिंब प्रतिबिंबाचें । दैवत बोलिजे ॥ २४ ॥
विराट पांचभौतिक निरुतें । तयाचीं प्रतिबिंबें अनंतें ।
पांचभौतिकें जीवातें । स्थूल शरीरें जालीं ॥ २५ ॥
विराटीं अवस्था उत्पत्ति । प्रतिमा तिचिया जाग्रतीं ।
जीवाचां ठाईं वर्तती । निर्धारेंसीं ॥ २६ ॥
ब्रह्मा उक्त अभिमानी । अनंत विश्व तयापासूनि ।
अनंत रजोगुणु रजोगुणीं । उपजले मायेचां ॥ २७ ॥
हिरण्यगर्भ सूक्ष्म वा रे । त्याचीं अंशभेदें अपारें ।
जीवाचीं लिंगशरीरें । जालीं उपजतीं ॥ २८ ॥
तेथें अध्यात्म अंतःकरण । अधिभूत निर्विकल्प स्फुरण ।
विष्णु अधिदैवत जाण । तये ठाईं ॥ २९ ॥
अध्यात्म मन खरें । मंतव्य अधिभूत निर्धारें ।
चंद्रमा दैवत वा रे । तये ठाईं ॥ १३० ॥
बुद्धि अध्यात्म केवळ । बोद्धव्य अधिभूत निर्मळ ।
ब्रह्मा दैवत समूळ । वर्म जाण पां ॥ ३१ ॥
अध्यात्म बोलिजे चित्त । चेतव्य अधिभूत तेथ ।
नारायणु तो दैवत । तये ठाईं ॥ ३२ ॥
अध्यात्म अहंकारु । अहंतव्य अधिभूत विकारु ।
अधिदैवत रुद्रु । वर्म जाणावें ॥ ३३ ॥

येका वायोचे अनेक । जीवातें प्राण पंचक ।
धर्म कर्म सकाळिक । तेणें चि प्रकारें ॥ ३४ ॥
अध्यात्म श्रोत्र जाण । श्रोतव्य अधिभूत ह्मण ।
दिशा अधिदैवत श्रवण । भेद दिशांचे ॥ ३५ ॥
त्वक् अध्यात्म निश्चित । स्पर्श ज्ञातव्य अधिभूत ।
वायो तेथें दैवत । देवलोकींचें ॥ ३६ ॥
चक्षुरध्यात्म जाण खरें । द्रष्टव्य अधिभूत तेथें घा रे ।
अधिदैवत सत्याकारें । जाणावा सूर्यो ॥ ३७ ॥
अध्यात्म रसना जाण । रसितव्य अधिभूत ह्मण ।
वरुण रसनेलागून । दैवत खरें ॥ ३८ ॥
घ्राण अध्यात्म सत्याकारें । घ्रंतव्य अधिभूत खरें ।
अश्विनौदेव वा रे । तेथें देवता ॥ ३९ ॥
वाचा अध्यात्म बोलिजे । वक्तव्य अधिभूत सहजें ।
अग्निदेव उपपादिजे । तये ठाईं ॥ १४० ॥
पाणी अध्यात्म जाण वर्म । अधिभूत ते तयाचे धर्म ।
इंद्र दैवत उत्तम । तये ठाईं ॥ ४१ ॥
पाद अध्यात्म विशेषें । गंतव्य अधिभूत तेथें असे ।
वामनु देवत हें कायसें । पुनःपुनः बोलणें ॥ ४२ ॥
अध्यात्म आतां शिश्न । आनंदतव्य अधिभूत ह्मण ।
प्रजापतिरूप सगुण । देवता तेथें ॥ ४३ ॥
पायु अध्यात्म शिष्येशा । विसर्गु अधिभूत भरंवसा ।
दैवत नैर्ऋत्य हें मानसा- । माजीं निर्धारीं ॥ ४४ ॥
अधिदेवताचेनि अंशें । आत्मा प्रतिबिंब जालें आपैसें ।
तयाची वृत्ति भूतीं प्रकाशे । अधिभूत तें ॥ ४५ ॥
एवं हिरण्यगर्भ येकें । लिंगें जालीं अनेकें ।
स्थिति चि अंशत्वें फांके । स्वप्नें होतीं ॥ ४६ ॥

---

१ "अध्यात्म" श्री.

येकु श्रीविष्णु भेदला । अनंत तैजसु तो चि जाला ।
ऐसा सत्वगुणु देखिला । तिये मायेचा ॥ ४७ ॥
माया शरीर ईश्वराचें । अनंत कारण देह भेद तिचे ।
अज्ञानांश जीवाचें । आत्मविषई जे ॥ ४८ ॥
ईश्वरीं जे प्रळयावस्था । त्याची सुषुप्ति अनंता ।
मायेचा नियंता कर्ता । प्रळयाचा जो ॥ ४९ ॥
तो रुद्र अभिमानी । अनंत प्राज्ञ तयापासूनि ।
सुषुप्तीं आणि कारणीं । नियंते जे ॥ १५० ॥
तमोगुणु येकु मायेचा । अनंतधा भेदु तयाचा ।
तो चि तिये अविद्येचा । स्वभावो तामसु ॥ ५१ ॥
महामाया चि भेदली । अनंते महाकारणें जाली ।
साक्षित्व कळा पांकली । जाली तुरिया ॥ ५२ ॥
एवं येकु चि परमात्मा । अनंतधा जाला जीवात्मा ।
भेदली मायामय महिमा । शुद्धसत्वाची हे ॥ ५३ ॥

श्रुतिः ॥ एकं संतं बहुधा कल्पयंति ॥ ७ ॥

ऐसें हें वेदाचें वचन । ययें अर्थी प्रमाण ।
भेदलें येक चि कारण । जालीं कार्यें ॥ ५४ ॥
येक चि जैसें पाणी । अनंत तरंग तयापासुनी ।
आणि ते तयाचां चि स्थानीं । वर्तत असतां ॥ ५५ ॥
भेदु तो कैसा कल्पावा । यालागीं मिथ्या मानावा ।
उपाधिभेदु विचारावा । तंव तो ऐसा ॥ ५६ ॥
एवं उपाधीचेनि निरासें । शुद्धाशुद्धा भेदु नसे ।
घटाकाश मठाकाश जैसें । घटमठाभावीं ॥ ५७ ॥
उपाधिभेदु उपाधीसी । भावना अघट हे हि ऐसी ।
घटीं मठीं मृत्तिकेसी । येकत्व जैसें ॥ ५८ ॥
आतां उपाधी आणि शुद्धातें । ह्मणसी नित्य भेदु वर्ते ।
गगना आणि पृथ्वीतें । घटमठाकारीं ॥ ५९ ॥

तरि अवधारीं पां वचन । पार्थिव घट मठ ह्मणौन ।
स्वतंत्र गगनेंसीं विलक्षण । स्वतंत्र हें ॥ १६० ॥
आतां भान प्रकृतीचें कैसें । पृथग संत मृगजळ जैसें ।
कांहीं चि अधिष्ठानीं नसे । किरणावेगळें ॥ ६१ ॥
कार्यसहित कारण । सकळ हि प्रकृतीचें भान ।
तें विवर्तरूप ह्मणौन । पृथग सन्मय ॥ ६२ ॥
करितां सत्याचा निर्धारु । तयाचा सहजें उपसंहारु ।
मृगजळापरि तो आकारु । ब्रह्मीं च सामावे ॥ ६३ ॥
तेथें सत्यावेगळें कांहीं । भान तें सर्वथा नाहीं ।
हा अनुभव तुझा ठाईं । तुवां जाणितला ॥ ६४ ॥
येथींचें मृगजळ मिथ्या येथ । किरणीं जालें भेदवर्जित ।
तेवि चि तेथींचें तेथ । किरणीं अभावलें ॥ ६५ ॥
आतां किरणभेदीं मृगजळासी । भेदु नाहीं निर्धारेसीं ।
एवं सर्वत्र अभेदता ऐसी । जाणावी तुवां ॥ ६६ ॥
भेदाचें भान भासे चि । विचारितां तें सत्य नसे चि ।
बुद्धि ह्मावळ जयाची । तो तें मानी ॥ ६७ ॥
विवर्ताचें लक्षण । अभान करितां बळें भान ।
सेवटीं निर्धारितां साचपण । नसे कांहीं चि ॥ ६८ ॥
आतां भासे तें चि मानावें । कीं असे तें सत्य ह्मणावें ।
हें यथार्थ जाणावें । विवेकें तुवां ॥ ६९ ॥
आभासे भुजंगु थोरु । पाहातां असे तेथें दोरु ।
तरी देखणा चतुरु । तेणें काय मानावें ॥ १७० ॥
यापरी मिथ्या भेदु । आतां सांडीं तो अनुवादु ।
श्रीगुरु परमानंदु । ऐसें बोलिला ॥ १७१ ॥

इति श्रीमद्दिगंबरानुचरविरचिते ग्रंथराजनामग्रंथे गुरु-शिष्यसंवादे सर्वत्राभेददर्शनं नाम षष्ठम प्रकरणं समाप्तम् ॥

## ।। प्रकरण सातवें ।।

### ।। श्रीदत्तगुरवे नमः ।।[1]

ऐसें सद्गुरूचें बोलणें । आइकोनि सच्छिष्यें तेणें ।
परमाद्वैतीं मनें । निश्चयो केला ॥ १ ॥
पुडती तो बोले वचन । सद्गुरूतें प्रसन्नऊन ।
देवा माझें अज्ञान । निमालें कायैसीं ॥ २ ॥
आतां येक आर्थी पुसणें । देवदेवें कृपा करणें ।
आदिदेवें नारायणें । तुवां स्वामी ॥ ३ ॥
देवें सांगितलें ज्ञान । जालें तेणें समाधान ।
परंतु योगीं तये मन । स्थिर न बैसे ॥ ४ ॥
चंचळ जाये निघोनि । काळ व्यर्थ जाये बुडोनि ।
निष्ठं आणीं[2] मागुतेनि । दुःख थोर ॥ ५ ॥
आतां तें तेथें चि स्थिरावें । ऐसें करावें देवदेवें ।
वर्म कांहीं सांगावें । यया मनाचें ॥ ६ ॥
आइकोनि हें शिष्यवचन । गुरु बोलती मागुतेन ।
आइकें बापा साधन । तया मनोजयाचें ॥ ७ ॥
बहुसाल शास्त्रश्रवण । आणि वक्तुत्वाची शक्ति गहन ।
स्वाधीन न करितां मन । व्यर्थ चि तें ॥ ८ ॥
वार्ता सांगोनि योगांचिया । आणि आइकोनि शिष्यराया ।
प्रयोजन नाथि येका यया । न जिंकी[3] मनातें ॥ ९ ॥
कटकट चि किती करणें । योगपरिग्रहो मेळवणें ।
योगसिद्धि चंचळें मनें । तें तंव नसे ॥ १० ॥

---

1 " श्रीविश्वंभरावधूताय नमः. " श्री. 2 " आणितां. " श्री.
3 " जिंकितां " श्री.

शिष्य अपार मेळवणें। ते तये ख्यातिचिकारणें।
परंतु स्वकार्य तेणें। तें काय असे ॥ ११ ॥
मन मानी ते समाधि। मन करी ते योगसिद्धि।
ह्मणौनि मन चि तें आधीं। आपुलें करावें ॥ १२ ॥
तया मनोजयाकारणें। येकांतीं[1] आधीं विचारणें।
आतां तयाचीं चिन्हें। विवंचितां ॥ १३ ॥
पावित्रु पाहिजे प्रदेशु। कव्हणीयेकु क्षेत्रविशेषु।
जेथें बैसला सहजपुरुषु। योगी शोभे ॥ १४ ॥
जेथें योगियातें वाधा। न करी कव्हणी सर्वदां।
विक्षेपु नव्हे बोधा। ऐसें क्षेत्र ॥ १५ ॥
निगूढ करूनि येक स्थान। तेथें प्रतिष्ठावें आसन।
मृदु सुखदमान। पवित्र रोगहर ॥ १६ ॥
तेथें पुरुषु वैसावा। आतां तो कैसा असावा।
तयाचा अधिकारु बरवा। सांगैन मी ॥ १७ ॥
वैसोनि आपणु येकांतीं। बाहे[2] प्रपंचीं चित्तवृत्ति।
येकांतु ऐसा तो तयाप्रति। नेदी फळातें ॥ १८ ॥
योगीमन अनासक्तु। मायावी बैसे ध्यानस्थु।
अभासु[3] तयाचा व्यर्थु। सकळु होये ॥ १९ ॥
योगपरिग्रहु अनादरु[4]। कीं कवित्वाची वरि भरु।
योगी नव्हे तो नरू। श्रमाचें पात्र ॥ २० ॥
ह्मणौनि परिग्रहो सांडी। वासनेतें दंडी।
आळिवृत्ति मोडी। तो चि साधकु ॥ २१ ॥
परिग्रहो दुःखाचें कारण। तेथें अशक्त धरी मन।
तरि योगुअभ्यासु मुद्रा आसन। तें काये करील ॥ २२ ॥

---

१ "एकांतु" श्री. २ "बाह्य." श्री. ३ "अभ्यासु." श्री. ४ "आदरु." श्री. ५ "आसक्ति" श्री.

दुःख परिग्रहो मेळवितां । दुःख तयातें पाळितां ।
तयाचेनि विनाशें व्यथा । परम दुःख होये ॥ २३ ॥
स्त्रीपरिग्रहाचें कारण । न करवे तिचें संगवर्जन ।
तरि योगाचें विसर्जन । केलें पाहिजे ॥ २४ ॥
वरि संगु पुत्राचा । आणि येरा परिग्रहाचा ।
मायावी योगु तयाचा । भवेंसेन ॥ २५ ॥
परिग्रहीं आसक्त मन । आंगीं योगाचें अवरण[1] ।
दांभिकाचें लक्षण । तें चि जाणावें ॥ २६ ॥
द्रव्य परावें हरणें । आणि तस्करत्व लागों नेदणें ।
तरि तें ऐसें करणें । जाण बापा ॥ २७ ॥
अंतरीं रोग असतां । बाह्य दावी आरोग्यता ।
तयाची क्रिया वृथा । सर्व होये ॥ २८ ॥
ह्मणौनि परिग्रहाचेनि नांवें । तृणपत्र तें हि नसावें ।
आतां परिग्रहो तो चि जो जीवें । मानिला होय ॥ २९ ॥
परिग्रहो सांडोनि समस्तु । सांडावा वाग्व्यापारु ।
श्रवणीं शब्दाचा संचारु । हों चि नेदावा ॥ ३० ॥
शब्दवादीं लागे मन । मग तें गोडी धरी जाण ।
काढितां सहसा तेथून । न धरी परती ॥ ३१ ॥
ह्मणौनि येकांतु तो येकाचा चि । संगु दुजयाचा नसावा चि ।
कळा वाढे अभ्यासाची । तेणें योगें ॥ ३२ ॥
संगु दुःखाचें कारण । संगु मनाचें मोहन ।
कलहा होय प्रवर्धन । मत्छराचेनि संगें ॥ ३३ ॥
अभ्यासु करूं अपेक्षिजे । तरि येकलें येकांतीं बैसिजे ।
शरीरसुख न पाहिजे । तया हि वरी ॥ ३४ ॥
शरिर सुखें ठेवणें । अणुमात्रु क्लेशु न करणें ।
ऐसें आपुलेनि मनें । घेतलें असतां ॥ ३५ ॥

---

1 " अवतरण " श्री.

योगीं कीजे प्रवृत्ति । तें धूलिका होये माती ।
योगा तयाची विभूति । वारेन उडे ॥ ३६ ॥
मृदु कठिण न मनणें । पडलें शीतोष्ण साहणें ।
देहप्रीति सांडणें । केवळ जे ॥ ३७ ॥
रूपदर्शनअरिष्ट । नव्हे तें योगातें इष्ट ।
यालागीं लावावें कपाट । दोहीं नयनीं ॥ ३८ ॥
जवं जवं अदेखणें बाहेरी । तवं तवं देखणें होय अंतरीं ।
यालागीं रूपदर्शन वैरी । सांडावें तें ॥ ३९ ॥
रसनेचा ठाईं आलुकेंपण । जया पुरुषालागून ।
तया योगु नाहीं जाण । वरवयापरी ॥ ४० ॥
नाना रसीं आवडी । आठवी भोजनाची परवडी ।
तयातें योगाची गोडी । लागेचिना ॥ ४१ ॥
जयातें बहु क्षुधा १सळे । खाये धान्य कंदमुळें ।
अन्न खाऊनि त्यावेगळे । भलतें कांहीं ॥ ४२ ॥
तयातें नाहीं योगु । पालवी तया अयोगु ।
यालागीं सर्व भोगु । सांडावा गा ॥ ४३ ॥
योगमुद्रेचें शरीर । नसावा तेथें मत्सर ।
काम क्रोध माहावीर । वैरी योगाचे ॥ ४४ ॥
कामें त्रासली मुद्रा । योगाची गा कुमरा ।
क्रोधाचा लागतां वारा । उलंडे योगु ॥ ४५ ॥
मदु हाणे धारणेतें । मत्सरू तिये समाधीतें ।
ययापरीं अवगुणातें । सांडावें आधीं ॥ ४६ ॥
पात्र नसतां शुद्ध । अंतरीं घालिजे दुग्ध ।
तेणें तें नाशोनि दुर्गंध । पाणी होये ॥ ४७ ॥
गुणवृत्ति न जिंकवे । तेणें योगाचें नाम नेघावें ।
मन स्वतंत्र तयाचें नव्हे । योगु कैंचा ॥ ४८ ॥

---

१ "क्षुधा बहुसाल" श्री.

साधन अपेक्षित जीवीं । तरी योगयुक्ति जाणावी ।
आतां ते तूं अनुभवीं । आपुला ठाईं ॥ ४९ ॥
अत्यंत नेघावें अन्न । न करावें अत्यंत उपोशन ।
योगयुक्ति चि करून । शरीर रक्षावें ॥ ५० ॥
जितुलेनि संतोष वाटे । आसनीं बैसतां सुख वाटे ।
तितुलें चि तें योगश्रेष्ठें । अन्न घ्यावें ॥ ५१ ॥
अत्यंत निद्रा ना जाग्रति । ऐसी ते योगयुक्ति ।
आसनीं राहे स्थिति । तें चि करावें ॥ ५२ ॥
सांडावी देहाची प्रीति । तैसी चि केवळ अप्रीति ।
योगाची सर्वथा युक्ति । असे ऐसी ॥ ५३ ॥
प्रीतीं अभ्यासु न घडे । अप्रीतीं देहो चि पडे ।
योगसिद्धि ते न घडे । दोहीं पक्षीं ॥ ५४ ॥
सांडावे करणाचे व्यापार । तैसे चि ते अव्यापार ।
योगामृतजीवनसार । जतन करावें ॥ ५५ ॥
करणव्यापार अति करितां । योगाची दुर्लभ वार्ता ।
तैसा चि तो सांडितां । सकळु व्यापारु ॥ ५६ ॥
अवरोधदुःखेंकरून । योगातें चि विसरे मन ।
लावितां नलगे अनुसंधान । क्रियेचें लागे ॥ ५७ ॥
वैराग्यें विषयो सांडावा । योगा पाहिजे तरी तो घ्यावा ।
यत्नें योगु राखावा । मनोनिष्ठु हा ॥ ५८ ॥
संगु नसावा सर्वथा । आणि चाले योगु तेणेंचिकरितां ।
तरी योगानुकूळ तो तत्वतां । केला चि पाहिजे ॥ ५९ ॥
असो योगयुक्तीचें लक्षण । आपणु चि जाणे तयाची खुण[1] ।
कां जाण ये श्रवण । केवळ येथें ॥ ६० ॥
योगी सुख धरी मन । ऐसें जें जें आचरण ।
तें तें चि करावें वांचून । आन न करावें ॥ ६१ ॥
योगलक्षण रक्षणें । ऐसिया जे युक्ति मानें ।
तो चि उपावो करणें । योगयुक्ति गा ॥ ६२ ॥
योगयुक्तीचीं लक्षणें जाणोनि । जाणितलीं हृदईं धरूनि ।

१ "खूण" श्री.

मग बैसावें आसनीं । तें चि कैसें ॥ ६३ ॥
जाणोनि आसनाची धारणा । अनुकूळ माने जे आपणा ।
तयाची करावी संपादना । हें मुख्य मत ॥ ६४ ॥
तथापि सांगिजे तरी सिद्धासन । स्वस्तिकासन भद्रासन ।
साधे चि साधें पद्मासन । तरि तें हि हो ॥ ६५ ॥
धारणा संपादूनि आसनाची । संपादावी शरीराची ।
आकृति मोडूनि वक्र त्रयाची । नीट बैसावें ॥ ६६ ॥
मान माज आणि शिर । दंडापरी धरावें शरीर ।
अत्यंत बैसका वक्र । ते दे रोगातें ॥ ६७ ॥
सम करूनि प्राणापान । नासाग्रीं ठेवावे लोचन ।
बाह्य नारोपितां दर्शन । रूपावरी ॥ ६८ ॥
सोडूनि शरीरसंगातें । ठेवोनि निरावलंबीं मनातें ।
देहावलंबन अभावातें । पाववूनियां[1] ॥ ६९ ॥
बाह्यांतर वृत्तिव्यापार । सांडिले असतां समग्र ।
आत्मज्ञान अछिद्र । तें विस्मरण पडे ॥ ७० ॥
जाणोनि जाणु होयिजे । तेणेंसीं विलक्षण ठाईजे ।
ज्ञानरूपत्वें राहिजे । आपुल्या ठाईं ॥ ७१ ॥
तया हि संवेदना । जाणोनि आत्मा देखणा ।
मग जाणीव नेणीव उरेना । ऐसें असणें ॥ ७२ ॥
तेथें नेणणें तरी तें नव्हे चि । जाणणें जाणपण तैसें चि ।
सहजस्थिति आत्मयाची । स्वभावें ते ॥ ७३ ॥
जाणणें ना नेणणें । आठऊ ना विसरणें ।
करणें ना न करणें । अनुसंधान ॥ ७४ ॥
लयो लक्ष ना विक्षेपु । समाधि स्फुरण ना लोपु ।
मनाचा संकल्पु विकल्पु । गळोनि गेला ॥ ७५ ॥
सच्चिदानंदीं निमग्नता । मनातें तन्मयावस्था ।
केवळ जाली असतां । तैसें चि असावें ॥ ७६ ॥

---

१ " विलक्षण करण गण । तयाचें साक्षित्व पावोन । मग तया हि निरसन । दृश्याचें कीजे ॥ ७० ॥ " ही ओवी 'श्री' प्रतींत जास्त आहे.

तेथ विक्षेपु उठी । नवजावें तेणेंसीं भेटी ।
पाहावें वेगळया दृष्टीं । कार्य गुणांचें ॥ ७७ ॥
लयो चि होये वृत्तीचा । तो भाउ[1] तमोगुणाचा ।
आपणु साक्षी तयांचा । जाणावें ऐसें ॥ ७८ ॥
स्वस्वरूपाचें स्फुरण । तें हि सत्वगुणेंचिकरून ।
तत्साक्षित्वें आपण । स्थिरतां असावें ॥ ७९ ॥
विषयस्फुरण संस्फुरे । तें तमःपूर्वक सत्वें वा रे ।
मनोव्यापारु तो चतुरें । आठवावा ना ॥ ८० ॥
बहिर्मुख सावधानता । स्थूळें इंद्रियें लागती अर्था ।
ते रजःप्रवृत्ति होत असतां । आत्मा साक्षी ॥ ८१ ॥
ज्ञान अज्ञान अन्यथाज्ञान । वृत्तिमात्र जें जें स्फुरण ।
तें गुणकार्य दृश्य मानून । निरासु कीजे ॥ ८२ ॥
आलिये अवस्थेतें जाणु । ते चि क्षणीं विलक्षणु ।
योगी होतां क्षीणु । मनोधर्मु होये ॥ ८३ ॥
गुणीं वृत्ति उठितां । तेथें आपुली निर्विकारता ।
तत्साक्षित्वें असंगता । ते चि भोगावी ॥ ८४ ॥
पक्षी उडती गगनीं । गमन तें तयाचिलागूनि ।
परंतु निर्विकल्पता तेणेंकरूनि । न भंगे व्योमाची ॥ ८५ ॥
चालतयासवें चालणें । पृथ्वीतें नाहीं जाणें येणें ।
तें अधिष्ठान प्रकारें तेणें । करावी निष्ठा ॥ ८६ ॥
उपजले वृत्तिव्यापार । ते गुणांचे जाणोनि समग्र ।
द्रष्टेपणें चि आत्मइतर । मानावे ते ॥ ८७ ॥
आत्मा अधिष्ठान गुणांचें । आंगीचिये प्रकृतीचें ।
व्यापार तया सर्वांचे । न लगती यया ॥ ८८ ॥
गगनीं उडे धुळोरा । तो काय लागे तया अंबरा ।
आत्मा असंगु गुणव्यापारा । तैसा निर्विकारु ॥ ८९ ॥
अधिष्ठानसिद्धि साधितां । शीघ्र होये निर्मळता ।
यया मनातें निश्चळता । स्वस्वरूपीं ॥ ९० ॥

---

१ " उथळे " श्री.

मनाचिसवें जातां येतां । सत्य स्फुरे विक्षिप्ता ।
असंभावना तेणेंकरितां । रोकडी लागे ॥ ९१ ॥
जाता येता तो मी कवणु । शुद्ध स्वरूपेंसीं विलक्षणु ।
ऐसा संदेहो गहनु । नाथिला उपजे ॥ ९२ ॥
तो संदेहो असतां हृदंई । मनोजयो करितां हि ।
विपरीत भावना हि[1] । नव्हे क्षीण ॥ ९३ ॥
भेदीं उपजे विश्वासु । योगाचा होय विनाशु ।
ह्मणोनि तैसा अभ्यासु । तो नये करूं ॥ ९४ ॥
सिद्ध चि साक्षित्वआत्मस्थानीं । सिद्ध चि दृश्यत्व वर्ते गुणीं ।
तें हातींचें वर्म सांडोनि । मनोजयो काइसा ॥ ९५ ॥
आत्मा सहजें अधिष्टान । आत्माधारें प्राकृत गुण ।
ऐसें यथार्थ अनुसंधान । तें कां सांडावें ॥ ९६ ॥
अधिष्ठानसिद्धि न[2] साधितां । अभ्यासु करी योगवेत्ता ।
तो अमार्गं तत्वता । पडला जाणावा ॥ ९७ ॥
अधिष्ठानसिद्धि साधिली । तन्मय वृत्ति वैसली ।
समाधीं निष्ठा राहिली । ऐसियावरी ॥ ९८ ॥
अन्वयसिद्धीचें साधन । केलें पाहिजे तेथून ।
तयाचें कैसें लक्षण । तें चि अवधारीं ॥ ९९ ॥
गुणांचें करूनि निरसन । सकळां वृत्तींचें छेदन ।
सामाऊनि स्वस्वरूपें[3] स्फुरण । निर्विकल्प स्थिति ॥ १०० ॥
असतां आपुलां स्वस्थानीं । आत्मतत्वीं निर्गुणीं ।
वृत्तिस्फुरण मागुतेनि । होत असतां ॥ १ ॥
घेइजे तयाचें दर्शन । पाहिजे वृत्तीचें सत्यपण ।
तंव प्रथक्[4] संतभान । ऐसें गमे ॥ २ ॥
स्वस्वरूपाचें अनुसंधान । तयाचें कैसें भान ।
आत्मइतरत्वें ज्ञान । तयाचें करितां ॥ ३ ॥
स्फुरण तंव स्थिति आहे । परंतु वेगळें रूपातें न ये ।
निरसावें तेथें काये । योगियें गा ॥ ४ ॥

---

१ "कांहीं" श्री. २ 'श्री' प्रतींत हा 'न' जास्त आहे. ३ "स्वपर" श्री.
४ "पृथग" श्री.

केलें तरी चि तें होईल । न करितां स्वरूप चि केवळ ।
तया स्फुरणाचें मूळ । नसे आत्मयावेगळें ॥ ५ ॥
आत्मान्वयाव्यतिरेकें । तैसें तऱ्हीं तें कें ।
तेथें सत्यस्वरूपें चि येकें । आपण असिजे ॥ ६ ॥
साखरेचां पाखुडणीं । गोडी ते निवडी कव्हणी ।
आकाश उजलें कांडणीं । सांडी काळिमा ॥ ७ ॥
तरि च तें आपुलें स्फुरण । सांडूं शकिजे आपण ।
आपणावेगळें निवडून । रूपवंत ॥ ८ ॥
आत्मा चि स्फुरण आपुलें । तेणेंसीं परस्फुरण वेगळें ।
सत्य असेल मानलें । तरि येक अवधारीं ॥ ९ ॥
चैतन्यभेदु तो कैसा । आश्रयभेदु शिष्येशा ।
परस्फुरणाचा तैसा । पृथक् सद्भाऽ॰ पां ॥ ११० ॥
आश्रयान्वयें तें स्फुरण । चेतनान्वयें अभिन्न ।
पृथक् संत मानून । युक्ति न करीं ॥ ११ ॥
भिन्न चि तें जैं असतें । तै निरसलें कां नवचतें ।
ना निरसे चि तै मागुतें । कोठूनि होये ॥ १२ ॥
निरस्त चि पुनः स्फुरण । उठे तै अधिष्ठानाचिपासून ।
उठिलें तें हें ह्मणौन । वेगळें न दिसे ॥ १३ ॥
स्फुरण तैसी चि अवस्था । आश्रयाभेदें चि पाहतां ।
व्यक्ति दिसे परी सर्वथा । वेगळी नाहीं ॥ १४ ॥
आपणावेगळी जागृति । आणितां न ये व्यक्ति ।
स्वप्न तैसी चि सुषुप्ति । तुरिया तैसी चि ॥ १५ ॥
आत्मा अवस्थेचा जाणु । मानिजे तेणेंसीं विलक्षणु ।
तरि ते अवस्था तो प्रपंचु सगुणु[1] । निरसिला असतां ॥१६॥
पुडती ते अवस्था स्फुरे । तै कोठूनि वृत्ति अंकुरे ।
तिचेनि आकारें आकारे । तें तत्व कवण ॥ १७ ॥
तरि[2]स्ते अवस्थे आयन । आत्मा चि लयस्थान ।
उपजे तै आपणाचिपासून । अवस्था ते ॥ १८ ॥

१ "तो गुणु" श्री. २ "तरि निरस्त" श्री.

अवस्थेचेनि आकारें । आत्मचैतन्याकारें[1] ।
आत्मा चि निर्धारें निर्धारें । तियेचेनि[2] ॥ १९ ॥
ह्मणौनि आपणावेगळी कांहीं । अवस्था ह्मणिजे ते नाहीं ।
तिचा प्रपंचु तिचां ठाईं । तेणेंसीं येकु ॥ १२० ॥
अवस्थेचेनि निरासें । प्रपंचु तो अवघा ग्रासे ।
तै आत्माकारत्वें चि असे । ऐसें जाणावें ॥ २१ ॥
थिजलें तें चि वो वोघरिलें[3] । परंतु घृत तें नसे वेगळें ।
निर्गुण चि सगुण जालें । तैसें आत्मतत्त्व ॥ २२ ॥
प्रपंचु अभिन्नु अवस्थेसीं । अवस्था ते प्राकृते गुणेसीं ।
गुण तो आत्मप्रकृतीसीं । नसे विलक्षणु ॥ २३ ॥
प्रकृति ते आत्मस्फुरण । आत्मा चि आपुलें चैतन्य ।
परब्रह्म निर्गुण । सन्मात्र शिव ॥ २४ ॥
स्वस्वरूपाचेनि निर्धारें । वृत्तिभेदु साक्षात्कारें ।
भिन्नु पाहातां न स्फुरे । स्फुरे तो आत्मा ॥ २५ ॥
ऐसा आइकोनि विचारु । हृदईं मानूनि निर्धारु ।
उपजला वृत्यंकुरु । जाणावा आत्मान्वयें ॥ २६ ॥
सागरु असतां संपूर्णस्थितीं । तरंग लहरी या उपजती ।
फेन आवर्त व्यक्ति । वेगळालिया ॥ २७ ॥
ययांचे आभास नाना । ते सोडूं न शकती जीवना ।
जीवन जाणे आपणा । सहित तेणेंसीं ॥ २८ ॥
विचारितां मृगजळ । तयाचे वोघ वेग कल्लोळ ।
ते तेणें करणेसीं[4] वेगळ । न वर्तती कांहीं चि ॥ २९ ॥
तैसें आत्मयाचेनि आधारें । प्राकृत गुणकार्य स्फुरे ।
तयाचेनि व्यापारें । न चळता तो ॥ १३० ॥
तेणें भानेंसीं सहितु । अजु अव्ययो अखंडितु ।
जाणावा हा परमार्थु । धरीं हृदईं ॥ ३१ ॥

---

१ "आत्मचैतन्य चि आकारें" श्री. २ " तिये चेतनेचेन " श्री. ३ " वोथिजलें " श्री. ४ " किरणेसीं " श्री.

जें जें उपजे स्फुरण । तें प्रकारें येणें जाणोन ।
स्वरूपनिष्ठेपासून । चळावें चि ना ॥ ३२ ॥
व्यतिरेकें चि निष्ठा करितां । शुद्ध अनुष्ठान[1] चि भजतां ।
पुडतोपुडतीं निरस्तां । वृत्ति स्फुरती ॥ ३३ ॥
ते तेणें वृत्तिविकारें । असंभावना ते अंकुरे ।
मग तेणें चि विवेकें बा रे । पावे परिपुष्टीतें ॥ ३४ ॥
मग विपरीत भावना उठी । ते योगातें तळवटी ।
ह्मणौनि भेदाचिया तुटी । स्वरूप भजावें ॥ ३५ ॥
विषम अथवा सम जाण । तें आत्मयाचिपासाव स्फुरण ।
आत्माकारत्वें चि मानून । निष्ठा करावी ॥ ३६ ॥
ऐसी अन्वयसिद्धि साधितां । ते निष्ठा पावे स्थिरता ।
मग सहजसिद्धि सुता । साधावी ते ॥ ३७ ॥
जळीं वर्ततीया तरंगा । व्यतिरेकान्वयें गंगा ।
जाणेना तेथें गंगा । विकारु चि नसे ॥ ३८ ॥
निवडणें ना तें मिळणें । व्योमीं व्योमाकारणें ।
घटाकाश मठाकाश येणें । भेदें वर्ततां हि ॥ ३९ ॥
आंगीं वर्ततिया कल्लोळा । किरण नेणे मृगजळा ।
तैसा आत्मा संचला । तो जैसा तैसा चि ॥ १४० ॥
व्यतिरेकान्वय दोन्ही । गुणाचें कार्य जाणोनि ।
सहजस्थितीं सांडणी । करावी तयाची ॥ ४१ ॥
तेथें सांडणें ना मांडणें । निवडणें ना मिळणें ।
सहजस्थितीं असणें । आत्मयाचें ॥ ४२ ॥
गुणकार्य मात्र ना करणें । स्वानुसंधान तें चि करणें ।
ऐसीं निष्ठापूर्व साधनें । क्रमोनि गेलीं ॥ ४३ ॥
करणें न करणें दोन्ही । न वर्तती सिद्धाचां स्थानीं ।
तेथें सहज असणें स्वस्थानीं । निजाकारें ॥ ४४ ॥
सहजें सहजीं संस्फुरण । सहज जि तयाचें निरसन ।
धूमातें न धरी गगन । ना सोडी जैसें ॥ ४५ ॥

1 " अधिष्ठान " श्री.

सहज चि लयो वृत्तीचा । सहजीं आभासु तो कैंचा ।
सहज लोपु अवस्थांचा । सहजीं होये ॥ ४६ ॥
सहजेसहजीं स्वानंदु । सहजेसहजीं पूर्णबोधु ।
सहजीं भेदु ना अभेदु । ऐसें सहज होये ॥ ४७ ॥
सहजें सहजाचें ज्ञान । सहजस्थिति कें अज्ञान ।
सहजात्मस्थितीची खूण । जाणावी सहज चि ॥ ४८ ॥
कांहीं करणें ना न करणें । घेणें ना सांडणें ।
सहजसुखें असणें । ऐसी निष्ठा ॥ ४९ ॥
सहजस्थितीची ये[1] खूण । तिचें हें चि लक्षण ।
जें निजानंदें संपूर्णपण । अतेव समाधि ॥ १५० ॥
सांडी मांडी जंव ते असे । तंव सुख कैसें तें न दिसे ।
तेथ विवेकाचेनि पैसें । जिकावें मन ॥ ५१ ॥
जाल्यां मन स्वाधीन । सहज असतां सनातन ।
ते चि निष्ठा जाण । अखंड राहे ॥ ५२ ॥
तैं सहज निष्ठेचियापरीं । भावो नुरे शुद्धांतरीं ।
उरे सन्मात्र येक अवधारीं । दृशा ते ते ॥ ५३ ॥
अभेदावस्था ते समाधि । तेथें लय विक्षेप वर्तती आधीं ।
ते क्षणक्षणा बुद्धि । चाळिती मनातें ॥ ५४ ॥
निरंतर करितां अभ्यासु । लयविक्षेपा होये हरासु ।
तैसी तैसी पुरुषु । निश्चळता पावे ॥ ५५ ॥
ते चि स्थिति जाणावी । आतां दृशा ते आइकें बरवी ।
जेथें सांडी मांडी आघवी । राहिली क्रिया ॥ ५६ ॥
सहजात्मसिद्धीची अखंडता । दृशा ते जाणावी जाणतां ।
तेथूनि कुंठली वार्ता । अभ्यासाची ॥ ५७ ॥
दृशा पाविजे तंव साधन । कीजे योगाचें अभ्यसन ।
तेथ प्रवर्ततां मन । तें कैसें होये ॥ ५८ ॥
गुणारूढाचित्ता । प्रथम भूमिका विक्षिप्ता ।
त्रासु नुपजे[2] अभ्यासितां । येकांत योगु ॥ ५९ ॥

---

१ " येकी " श्री. २ " उपजे " श्री.

मन न बैसे येकांतीं । न रमे तें स्वरूपस्थितीं ।
दुःखाची होये संप्राप्ति । धारणा करितां ॥ १६० ॥
लयंगत होय मन । कां करी विषयानुसंधान ।
जाग्रतीमाजीं तें स्वप्न । कव्हणी येक ॥ ६१ ॥
कां आश्रयूनि करणांतें । पाहे बाह्य विषयांतें ।
अंतरीं अवघें रितें । योगु नाहीं ॥ ६२ ॥
खोकरे घटीं पाणी । न राहे दुतोंडा रांजणीं ।
तैसें मन अवरोधनीं । कोंडे चि ना ॥ ६३ ॥
खतखत आसनीं सुटे । योगु सांडावा हें चि वाटे ।
ते भूमिका नेटें । जिंकावी योगियें ॥ ६४ ॥
बळ करूनि श्रवणाचें । झाड न मांडावें[1] मनाचें ।
मग आंगीं तया वैराग्याचें । वारें खेळवावें ॥ ६५ ॥
सदसद्विवेकें सडकितां । योगु होये[2] संचरता ।
मग सिद्धराजु दैवता । बोलैल तेथें ॥ ६६ ॥
ऐसेनि योगबळें तेणें । मनाचा जयो करणें ।
तयापासाव पावणें । दुसरी भूमिका ॥ ६७ ॥
मन स्वरूपीं ठेवितां । क्षणेकु पावे स्थिरता ।
तेथूनि पूर्वाध्यासु मागुता । तो चि आश्रयी ॥ ६८ ॥
मनाचिये इछेसरिसें । तेथें हि न वर्तावें पुरुषें ।
कालु तो योगाभ्यासे- । वांचूनि न घलावा ॥ ६९ ॥
सांपडो अथवा जावो मन । परंतु न सोडावें आसन ।
ध्यान मुद्रा बंधन । सुटों चि नेदावें ॥ १७० ॥
देहनिर्वाहार्थ व्यापारीं । वर्ततां मन अंतरीं ।
ठेऊनि दृष्टि बाहेरी । धरावी मुद्रा ॥ ७१ ॥
ध्यान चालतां बोलतां । भोजनादि व्यवहार करितां ।
विश्रांतिलागीं निजतां[3] । तेणें चि प्रकारें ॥ ७२ ॥

---

१ श्रीं प्रतींत " झाड मोडावें " असें होतें, त्यांतील ' मो ' चा मात्रा मागाहून खोडली आहे. २ " होयिल " श्रीं. ३ " निद्रतां " श्रीं.

ऐसें करितां अभ्यसन । तिसरी भूमिका पावे मन ।
आतां ते भूमिकेचें लक्षण । अवधारीं पां ॥ ७३ ॥
समाधीं ठेविलें मन । तें अध्यासें उठे तेथून ।
विपयरस अनुभऊन । मागुतें ये ॥ ७४ ॥
विषयानुभवो घेतां । ते गोडी न पवे सर्वथा ।
मग आपण चि तें मागुता । आश्रयी योगु ॥ ७५ ॥
योगाभ्यासाचेनि संभ्रमें । तें हि जिंकितां अनुक्रमें ।
चौथी भूमिका अवगमे । साधकासी ॥ ७६ ॥
चौथिये भूमिकेचें लक्षण । समाधीं ठेवितां मन ।
तें नुठवितां नुठी तेथून । उठवितां नुठे ॥ ७७ ॥
व्यवहारीं प्रवर्ततां । संतोषु न वटे तया चित्ता ।
तें[1] आपणें चि मागुता । योगु अवलंबी ॥ ७८ ॥
योगें चि पावे सुख । योगेविण भावी दुःख ।
विसरों लागे ताहान भूक । आसक्तीं योगाचिया ॥ ७९ ॥
आनंदु उपजे स्थिति । विक्षेप लय न स्फुरती ।
ऐसी राहे स्वरूपस्थिति । ते चौथी भूमिका ॥ १८० ॥
जैसें जैसें स्थिरावें मन । इकडे तैसें तैसें आसन ।
धारणा मुद्रा बंधन । अचळ होये ॥ ८१ ॥
ते हि भूमिका जिंकितां । सहजस्थिति होय अखंडता ।
पुरुषु न चळे चाळितां । निष्ठेपासाव ॥ ८२ ॥
अखंडनिद्रा ते जाणावी । असावधानता गुण भावीं ।
स्वरूपीं जागृति मानावी । अचळ ते हि ॥ ८३ ॥
चरमदशा ते जाणावी । जाणोनि ते सत्यत्वें मानावी ।
मानूनि तुवां साधावी । अगा शिष्यराया ॥ ८४ ॥
सिद्धि योगाची हे चि जाण । दशा जीवन्मुक्ताची ह्मण ।
येयापासाव निरोपण । आतां पुरें जालें ॥ ८५ ॥

---

१ “उठों” श्री.

यया स्थिती वर्तता । ईश्वरेंसीं समानता ।
जीवन्मुक्तदशा तत्वता । हे तुवां जाणावी ॥ १८६ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्दिगंबरानुचरविरचिते । ग्रंथराजनाम ग्रंथे गुरुशिष्यसंवादे । साधनयोगनिरूपणंनाम सप्तम प्रकरणम् ॥ श्रीदत्तार्पणमस्तु ॥ प्रकरण ॥ ७ ॥ वोव्या ॥१८६॥
श्रीराम जयराम जयजयराम । गंगा तुळसी शालिग्राम ॥७॥

## ॥ प्रकरण आठवें[1] ॥

### ॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीदत्तगुरवे नमः ॥

ऐसें सद्गुरूचें बोलणें । ऐकोनि शिष्य तेणें ।
पुनरपि बोलाव्याकारणें । प्रारंभु केला ॥ १ ॥
शिष्यु ह्मणे जो देवा । जीवन्मुक्त सदाशिवा ।
सांगितला तो जाणावा । कवणा चिन्हीं ॥ २ ॥
जीवन्मुक्त जो नरु । तयाचा कैसा विचारु ।
स्वाभाविक देहविकारु । कैसा जाणावा ॥ ३ ॥
आइकोनि शिष्याचें बोलणें । सद्गुरु संतोषले निजमनें ।
मग तया मुक्काचीं लक्षणें । सांगों आदरिलीं ॥ ४ ॥
समाधि चि अखंडता । ते चि दशा गा तत्वता ।
अनुभवाची भिन्नता । ते आथीचिना ॥ ५ ॥
प्रथम प्रबोधी योगियातें । अनुभऊ कैसा वर्ते ।
हें तुझेनि अनुभवें तूंतें । उमजैल[2] सकळ ॥ ६ ॥
सन्मात्र शुद्ध निर्गुण । आत्मतत्व निरंजन ।
नित्य निर्विकल्प स्थिर पूर्ण । सर्वत्र संचलें ॥ ७ ॥

---

१ 'श्री' प्रतींत हें प्रकरण निराळ्या कागदावर, निराळ्या हस्ताक्षराचें लिहिलेलें आहे. कदाचित् मूळचें फाटलें गेलें असावें. २ "उमजलें" श्री.

तितुलें हि तें चिन्मय । सन्मात्र आनंदमय ।
ध्यातें चि ध्यान ध्येय । परंतु निर्विकार ॥ ८ ॥
ऐसी अनुभवाची खूण । ययाउपरी तें साधन ।
भूमिकात्रय योगेंकरून । जिंकणें जें ॥ ९ ॥
केवळ अभेदावस्थान । अनुभवाची प्रथम खूण ।
समाधि हें अभिधान । तें तिचां ठाईं ॥ १० ॥
अपर ते साधकावस्था । ऐसी जाणावी जाणतां ।
समाधीची चि दृढता । योगें करणें ॥ ११ ॥
साधन तें पावतां सिद्धि । अखंडता होय समाधि ।
लय विक्षेप विरोधी । नाशती संदेह ॥ १२ ॥
ते तुवां जाणावी दशा । तया जीवन्मुक्तता ये पुरुषा ।
परंतु अनुभऊ तो अनारिसा । ऐसें न घडे ॥ १३ ॥
निरंतरता समाधीची । दशा ह्मणिजे ते ते चि ।
मध्यें विषमता गुणवृत्तीची । ते चि जाये ॥ १४ ॥
परंतु निष्ठाभेदु सर्वथा । नाहीं साधका आणि मुक्ता ।
आतां समाधीची अवस्थां[1] । त्रिविध ते ॥ १५ ॥
एकि जाणावी संप्रज्ञात । एकि ते असंप्रज्ञात ।
सहजसमाधि बोलिजत । तिसरी ते ॥ १६ ॥
व्यतिरेकज्ञानेंकरून । अधिष्ठान सिद्धीचें साधन ।
करितां निरंतर मन । निर्विकल्प होये ॥ १७ ॥
ते असंप्रज्ञात समाधि । तिची जे नित्य सिद्धि ।
ते दशा पूर्ण बुद्धी[2] । निर्विकल्प जाण ॥ १८ ॥
तया निर्विकल्पा जो युक्तु । योगीदशा संप्राप्तु ।
तो देहभावविगलितु । वर्ते भ्रांतापरी ॥ १९ ॥
जडाऐसा वर्ते देहीं । मुद्रा निरंतर दृष्टीचां ठाईं ।
सुखदुःखादि अवघे हि । विसरला भाव ॥ २० ॥
शीतोष्ण आडळे देहीं । तयाची स्फूर्ति जया नाहीं ।
जितु चि मृतवतु देहीं[3] । जीवन्मुक्तु ॥ २१ ॥

---

१ "अखंडता" श्री. २ "बोधीं" श्री. ३ "तो अदेही" श्री.

तरी बाह्यांतरीं अज्ञान । ऐसें कल्पील तुझें मन ।
ह्मणोनि अवधारीं निरोपण । सांगिजैल ॥ २२ ॥
ज्ञानयुक्त होये परी । बुडाला स्वानंदसागरीं ।
तेणें सुखें देहावरी । न ये सहसा ॥ २३ ॥
निद्रेचिऐसें तें जाण । परंतु वर्ते आपुलें संवेदन ।
तें निजानंदीं निमग्न । परती नेघे ॥ २४ ॥
अन्वयसिद्धि साधिजे । ते प्रज्ञाबळें निष्ठा कीजे ।
संप्रज्ञात ह्मणिजे । समाधि ते पैं ॥ २५ ॥
तिये चि स्थितीं असतां । ते चि लागे अखंडता ।
सविकल्पदशा योगयुक्ता । संपादे ते ॥ २६ ॥
सविकल्पदशेचें लक्षण । तेथें नाहीं देहाचें विस्मरण ।
आणि देहात्मबुद्धीचें दहन । तें तंव जालें ॥ २७ ॥
सांडोनि घटाचें प्रावरण । सर्वांघटीं येक गगन ।
आप परावें विसरोन । सम चि सर्वत्र ॥ २८ ॥
तैसा सोपाधी गुणीं सुटला ।
तो सकळोपाधी व्यापकु जाला ।
देहो परावा आपुला । देखे सारिखा चि ॥ २९ ॥
आत्मान्वयें सोपाधीतें । जाणूं जाला जेणें मत्तें ।
तेणें सकळ हि उपाधीतें । देखे ब्रह्म चि ॥ ३० ॥
तरंग फेन कल्लोळ । जळाचें जळीं जळ ।
आत्मा ब्रह्म सकळ । तैसें जो जाणे ॥ ३१ ॥
तो देहेंसीं अदेही । परि अस्फूर्ति देहाची नाहीं ।
देहीं असोनि नव्हे देही । विदेही तो ॥ ३२ ॥
जाणणें चि तयाचें नेणणें । नेणणें तें हि परि जाणणें ।
करणें सर्व न करणें । ऐसें जाणावें ॥ ३३ ॥
न करूनि सर्व करी । करूनि कांहीं तो न करी ।
व्यवहारु तो व्यवहारापरी । न मनिजे तयाचा ॥ ३४ ॥

करूनि क्रियेतें उबगला । अकर्म साधितां हि भागला ।
नाना विपरीतें तो चि बोधला । कर्माकर्म ॥ ३५ ॥
कर्मेंसी जाणे अकर्म । अकर्म तें मानी कर्म ।
एवं प्रपंचु अथवा[1] ब्रह्म । ऐसें देखे ॥ ३६ ॥
सहजसिद्धि आत्मयाची । नित्य असतां समाधि तिये चि
अखंडता होय तैसी चि । योगाभ्यासबळें ॥ ३७ ॥
तो सहजमुक्त ऐसें जाण । सहजात्मदशा ते ह्मण ।
जीवाच्यां[2] ठाईं अति क्षीण । आदर जाले ॥ ३८ ॥
काये विसरणें जाणणें । काये करणें न करणें ।
घेणें काये सांडणें । स्वभावें चि ॥ ३९ ॥
भावना अभावना घटाची । गगन नेणें कांहीं चि ।
वर्ते जैसें तैसें चि । आपुलेनि स्वभावें ॥ ४० ॥
जाणावें तें काये कवणें । कैसें कैसें तें विसरणें ।
जाणतां जाणणें नेणणें । जाणवेंविना ॥ ४१ ॥
निष्ठा ते कैसी काये । अनिष्ठा केउती आहे ।
दशा अदशा ते न ये । आणितां व्यक्ती ॥ ४२ ॥
मृगजळ जळ मृगा तें चि । सत्य मिथ्या हें जनातें चि ।
परंतु किरणा स्फूर्ति तयाची । ते काये असे ॥ ४३ ॥
काळें कीं निळें गगन । वर्णू मिथ्या मानी आन ।
मूर्खांप्रति साचपण । असो वर्णाचें ॥ ४४ ॥
परंतु गगनाचां ठाईं । तयाचा विचारु असे कांहीं ।
तैसा आत्मा ब्रह्म चि तईं । निष्ठा ते कवणा ॥ ४५ ॥
सहजसिद्ध तो तूं जाण । सहजदशा ते ह्मण ।
तेया युक्ता लक्षण । कैसें पुरुषाचें ॥ ४६ ॥
सर्वत्र नाहीं आदरु । जयातें विचारा विचारु ।
स्वभावसिद्धु परमेश्वरु । तैसी निष्ठा ॥ ४७ ॥

---

१ " अवघा परब्रह्म " श्री. २ " जीवां " श्री.

योगायोगुवियोगें योगी । त्यागात्यागुत्यागें त्यागी ।
समानु दोहीं मार्गीं । सारिखा चि ॥ ४८ ॥
निर्विकल्पु तरि गिरिवरु । न चळे न ढळे मेरु ।
प्राकृत गुणव्यापारु । सांडोनि वर्ते ॥ ४९ ॥
तैसा चि सविकल्पपणें । करूनि अकर्म ब्रह्म जाणे ।
प्रपंचु हा ब्रह्म मानें । आत्मत्वें जया ॥ ५० ॥
व्यवहारीं अति चतुरु । आणि असंगु अकर्ता सर्वत्रु ।
तया व्यापाराचा अकारु । आसूनियां ॥ ५१ ॥
ऐसा करी तें अवघें चि । न करी तें कांहीं चि ।
ऐवं मिश्रभावें जयाची । देहीं चेष्टा ॥ ५२ ॥
आणि निष्ठेचे ठाईं कैसा । आदरु शून्य असंगु जैसा ।
चढु वोहट आकाशा । नसे जयापरी ॥ ५३ ॥
दोनी दशा दावितु । नदवी आत्मत्वें अलिप्तु ।
सहजसिद्धु नित्यमुक्तु । इच्छाचारी ॥ ५४ ॥
समाधि ते येक मुळीं । साधनभेदें त्रिविध जाली ।
तेथें जे निष्ठा स्थिरावली । ते चि दशा ॥ ५५ ॥
इतुलेंनि चि दशाभेदु । वांचोनि सर्वत्र आत्मबोधु ।
ऐसा जाणोनि सिद्धांतवादु । तूं येक करीं ॥ ५६ ॥
दशेचां ठाईं उच्चनीचपण । तें सर्वथा न भावीं येथून ।
त्रिविध निष्ठा समान । असे आत्मयाची ॥ ५७ ॥
प्राकृत गुणा अंतरंगु । आत्मा अव्ययो असंगु ।
ऐसा न मनी योगु । तो मूर्ख होये ॥ ५८ ॥
सत्यावेगळें कांहीं । नाम रूप भान चि नाहीं ।
म्हणोनि आत्मा ब्रह्म सर्व हि । हें ज्ञान सिद्ध चि ॥ ५९ ॥
व्यतिरेकें असर्वता । अन्वयें सर्वरूपता ।
आत्मा नव्हे कर्ता । ऐसिये निष्ठेचा ॥ ६० ॥
सहजमुक्तु सहजयुक्तु । सहजसिद्धु अद्वैतु ।
ऐसा केला सिद्धांतु । कवणें निवारावा ॥ ६१ ॥

त्रिविध येक आत्मस्फुरण । ह्मणौनि दशात्रय समान ।
कारण सर्वांचें साधन । तें चि करावें ॥ ६२ ॥
दशेचिया सांगे वार्ता । सुरसा अनुभवाचिया कथा ।
तयाचा जन्म वृथा । कटकटा कीं ॥ ६३ ॥
नित्य करावें श्रवण । तैसें नव्हे हें पुराण ।
येणें विचारें मन । प्रौढ करावें ॥ ६४ ॥
मग वैराग्याचिया आवडीं । त्यागाची भोगावी गोडी ।
योगाभ्यासु हा फुडाफुडी । सिद्ध करावा ॥ ६५ ॥
येक आइकोनि न मनिती । मानूनि येक न घेती ।
घेतला उपदेशु विसरती । सांडिती येक ॥ ६६ ॥
दिवा रात्रौ करितां श्रवण । सोडूं न शकती जे अवगुण ।
ते माहानदीचे पाषाण । ऐसें जाण पां ॥ ६७ ॥
हें सांगतेनें किती सांगावें । वरी बोलिजे ऐसें नव्हे ।
तें हि श्रीदत्तें देवदेवें । सोपान केलें ॥ ६८ ॥
आपण आपणा जाणावें । गुणाचां कर्मी न लिंपावें ।
आपण आघवें होआवें । इतुलें चि ज्ञान ॥ ६९ ॥
सांडोनि संगु द्वैताचा । जयो कीजे मनाचा ।
योगु तो पाल्हाळु कैंचा । इतुला चि हा ॥ ७० ॥
अनुकूळ योगातें घेइजे । योगा प्रतिकूळ तें सांडिजे ।
गुरु दावील जाइजे । तेणें पंथें ॥ ७१ ॥
कर्तव्य आपुलें तें इतुलें चि । बहुसाल कांहीं नसे चि ।
पुसापुसी पामराची । व्यर्थ चि ते ॥ ७२ ॥
पुसिलें चि किती पुसावें । किती सांगितलें चि सांगावें ।
करणी करूं प्रवर्तावें । हें चि मुख्य ॥ ७३ ॥
आतां तूं ऐसें ह्मणसी । न पुसतां सर्वज्ञता कैसी ।
आजन्म शास्त्रार्थासी । विचारित चि असावें ॥ ७४ ॥
तरी वेदशास्त्रपुराण । आजन्म श्रवण पठण ।
करितां तें सर्वज्ञपण । न ये सर्वथा ॥ ७५ ॥

अवघें चि तें विसरिजे । गुरूतें शरण रिघिजे ।
योगमार्गें जिंकिजे । आपुलें मन ॥ ७६ ॥

मग जाणतां चि आपणातें । सर्वज्ञत्व आइतें ।
अगम्य जें ब्रह्मादिकांतें । तें तत्व कळे ॥ ७७ ॥

तस्मात्पंडितः पाण्डित्यं निर्भिद्य बाल्येन तिष्ठासेत् ।
तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मणः ॥
स ब्राह्मणः केन स्यादेनः स्यात् । ( ? )
आत्मनो वा अरे दर्शनेन श्रवणेन मत्या विज्ञानेनेदं सर्वं विदितं भवति ।
यो वा एतदक्षरमविदित्वा गार्ग्यस्मिँल्लोके जुहोति ददाति तपस्यत्यपि बहूनि वर्षसहस्राण्यन्तवानस्य लोको भवति ।

इत्यादि वेदवचनें । जिये सर्वज्ञतेकारणें ।
उपपादिती तें मानणें । सर्वथा तुवां ॥ ७८ ॥

सर्वज्ञता चि पाहिजे जरी । तरी श्रीगुरूचे चरण दृढ धरीं ।
मग सर्वज्ञता ते सुखसागरीं । उपजोनि ये ॥ ७९ ॥

लहरीरूपें विरेल । सर्वज्ञ स्वरूप चि उरेल ।
श्रीसद्गुरु ऐसें करील । भवसेन ॥ ८० ॥

आतां तो सद्गुरु कवणु । तरी श्रीकृष्णश्याम कमलनयनु ।
अनुसूयेचा नंदनु । योगिराजु ॥ ८१ ॥

अत्रिवरदु अनंतु । कालाग्निशमन दत्तु ।
देवदेवेश्वरु विख्यातु । दिगंबरु जो ॥ ८२ ॥

तो आदिगुरु येकु ध्यातां । असर्वज्ञा सर्वज्ञतां ।
रोकडी होये अन्यथा । उपायें नव्हे ॥ ८३ ॥

तया श्रीअवधूतातें । नमन माझें दत्तातें ।
आदिगुरु कृष्णश्यामातें । साष्टांगीं हें ॥ ८४ ॥

देवा तुझेनि स्मरणें । ग्रंथु रचिला म्यां अज्ञानें ।
तो तुझिये भक्तीकारणें । उपयुक्त हो ॥ ८५ ॥

दिगंबरानुचरु ह्मणे । साधुजनीं कृपा करणें ।
आरुपें येथींचीं वचनें । संपादावीं ॥ ८६ ॥
ग्रंथकर्ता मी अचतुरु । नेणे काव्यमुद्राप्रकारु ।
येथीचा पारमार्थिकु विचारु । तो चि पाहावा ॥ ८७ ॥
श्रीदिगंबरदूत ह्मणे । सांप्रदाइकीं येक करणें ।
येरां ग्रंथांचीं वेष्टणें । सोडूनियां ॥ ८८ ॥
वावधणीतें उपणावें । येका ययातें संग्रहावें ।
स्वहित पाडाल ठावें । तरि तें येणें ॥ ८९ ॥
नव्हे हे मुद्रा वादाची । आणि ते चाड चातुर्याची ।
सांडोनि युक्ति परमार्थाची । ते चि बोलिली असे ॥ ९० ॥
पक्षपाताचें बोलणें । स्वकार्य तें काये तेणें ।
ह्मणौनि तयाचेनि वर्जणें । ग्रंथराजु हा ॥ ९१ ॥
अत्यंत नाहीं विस्तारु । गुरूपदेशु प्रसादमात्रु ।
निर्मळ ग्रंथु पवित्रु । ऐसें जाणा ॥ ९२ ॥
नाना शास्त्रें होतीं । परि अद्वैतशास्त्रा सरी न पवती ।
ययालागि वेदांतीं । ठेवावा विश्वासु ॥ ९३ ॥
जालें हि वेदांतशास्त्र । परंतु वादें मुद्रा ते श्रमकर ।
तयामाजीं योगसार । तें तत्वज्ञान चि ॥ ९४ ॥
शाब्दिक जालें तत्वज्ञान । परंतु तया सकळांहिहून ।
श्रीसद्गुरुमुखें निरूपण । तें चि आगळें ॥ ९५ ॥
गुरुवचन परमामृत । परंतु येकांतींचें तें अत्यंत ।
ब्रह्मसाक्षात्कारें शोभत । आगळें तें ॥ ९६ ॥
तयातें करावें जतन । तरी तें योगाभ्यासावांचून ।
सर्वथा न घडे ह्मणौन । सत्य जाणावें ॥ ९७ ॥
तो योगु वैराग्याधारें । बोलणें जाण हें निर्धारें ।
सत्वशुद्धि कारण दुसरें । तयाचिया यत्ना ॥ ९८ ॥

तो चि प्रसंगु येथ सूचिला । ह्मणौनि ग्रंथ हा आगळा ।
सांडोनि अत्यंत वाग्जाळा । आश्रयावा हा चि ॥ ९९ ॥

कवणीं ह्मणेल प्राकृत । नव्हे हें ब्राह्मणाचें मत ।
तरी ते मूर्ख अत्यंत । ऐसें जाणावें ॥ १०० ॥

अपार चातुर्य जालें । परि ते चाडा शरण गेलें ।
दारोदार लागले । उदरासाठीं ॥ १ ॥

चाड चि सर्वत्र गोड । चाड ते वाडाहूनि वाड ।
चातुर्य फैले तें उघड । जिंके चाड चि ॥ २ ॥

न वा अरे वेदानां कामाय वेदाः प्रिया भवंत्यात्मनस्तु कामाय वेदाः प्रिया भवंति ॥

न वा अरे सर्वस्य कामाय ॥ आत्मा वा रे द्रष्टव्यः ॥

इत्यादि वेदवचनें । सर्वथा येथ प्रमाणें ।
जें वेदशास्त्रें पुराणें । आदिकरूनि ॥ ३ ॥

आत्मार्थ चि प्रिय सकळ । जाणोनि ऐसें समूळ ।
विवेकें आत्मतत्त्व चि केवळ । जाणावें ऐसें ॥ ४ ॥

आतां आत्मज्ञानाचिया चाडा । सांडोनि व्युत्पत्ति उदंडा ।
वेदवादाचा हि दवडा । करूनियां ॥ ५ ॥

श्रीसद्गुरूचे चरण । हृदईं बळकट धरून ।
कानडें ना मऱ्हाटें वचन । आइकावें तयाचें ॥ ६ ॥

जेणें होतो ब्रह्मसाक्षात्कारु । तो चि जाणावा बीजमंत्रु ।
तेणेवीण वाग्व्यापारु । संस्कृत जें ॥ ७ ॥

तें भूस जाणावें निकण । कासया करावें कंडण ।
उपनतां चि तें वारेन । सर्व जाये ॥ ८ ॥

ब्रह्मज्ञानाचा विचारु । तेथें शब्दाचा काइसा व्यापारु ।
यालागीं तो पामरु । पंडितु नव्हे ॥ ९ ॥

१ "केलें"

श्री. म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
क्रो. क्र. ........ नों. दि. ..........
वि. ........ ग्रं. ..........

ह्मणोनि हें प्राकृत । परंतु तत्वज्ञान घनामृत ।
जतन करावें अत्यंत । ग्रंथाचेनि आकारें ॥ ११० ॥

श्रीदिगंबरानुचरु ह्मणे । आतां पुरे पुरे बोलणें ।
ग्रंथें ग्रंथराजें येणें । सिद्धांतु भोगावा ॥ १११ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्दिगंबरानुचरविरचिते । ग्रंथराजनाम ग्रन्थे । गुरुशिष्यसंवादे । जीवन्मुक्तदशाविवरणंनाम अष्टम प्रकरणम् ॥ श्रीमद्दिगंबरार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥ शुभं भवतु॥छ॥